पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, फेब्रुवारी-मार्च २०२५, खंड २३, अंक ११-१२, पृष्ठे ८४

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक

३ ■ चिंतन
५ ■ कृत्रिम प्रज्ञेचे नवे वादळ
१० ■ सहाव्या विलोपनाच्या दिशेने...?
१४ ■ संस्थात्मक शिक्षणाला नवा पर्याय
२० ■ आधुनिक शिक्षणाचे नवे प्रारूप
**अर्थबोधपत्रिका पुरवणी**
२७ ■ 'भाषा ही मानीव संकल्पना'!
डॉ. तारा भवाळकर

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.
वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २३ (अंक ११-१२)**
**फेब्रुवारी-मार्च २०२५**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी ?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते ?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# चिंतन

'अर्थबोधपत्रिके'च्या या जोडअंकात, बहुधा, पहिल्यांदाच एक प्रयोग केलेला आहे. परवाच्या फेब्रुवारी महिन्यात, देशाची राजधानी असलेल्या नवी दिल्ली येथील तालकटोरा मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या '९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'च्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांचे अध्यक्षीय भाषण या अंकात अंतर्भूत केलेले आहे. अर्थातच, मूळ भाषणाचा हा संपादित अंश आहे. आवश्यक तिथे अनिवार्य असे संपादकीय संस्कार डॉ. भवाळकर यांच्या लिखित भाषणावर या ठिकाणी केलेले आहेत. परंतु, मूळ संहितेमध्ये मात्र बदल कोठेही नाही. डॉ. भवाळकर यांच्या प्रतिपादनातील मुख्य गाभा प्रकर्षाने प्रकाशित व्हावा या हेतूने आजूबाजूचा काही अंश कमी केलेला आहे, इतकेच. परंतु, तरीही त्या संपादित अंशाने या जोडअंकाची मोठी जागा व्यापलेली आहे. किंबहुना, डॉ. भवाळकर यांचे विवेचन साकल्याने समाविष्ट करता यावे याचसाठी फेब्रुवारी आणि मार्च या दोन महिन्यांचे अंक एकत्रित स्वरूपात इथे सादर केलेले आहेत.

अगदी दुर्मीळ अपवाद वगळता, दर वर्षी नित्याने आयोजित करण्यात येणाऱ्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनां'च्या अध्यक्षीय भाषणांचा अंतर्भाव 'अर्थबोधपत्रिके'च्या अंकांत या पूर्वी कधी केलेला नव्हता. त्या अर्थाने, मग, हा जोडअंक अपवाद ठरतो. हा अपवाद करण्यास दोन-तीन मुख्य कारणे आहेत. 'लोकसंस्कृती' आणि 'लोकसाहित्य' या उभय प्रांतांच्या ज्येष्ठ अभ्यासक असा डॉ. तारा भवाळकर यांचा लौकिक आहे. 'लोकसाहित्य' या संकल्पनेबाबत आपल्या समाजातील वरच्या स्तरांत, अनेक रूपांत, अ-यथार्थ, प्रसंगी, भ्रामक धारणा नांदताना अनुभवास येतात. 'लोक' हा शब्द समूहवाचक आहे. समूहाच्या भावभावना, आशा-आकांक्षा, श्रद्धा-धारणा, प्रेरणा-कल्पना, विचार-आचार ज्या साहित्याद्वारे प्रगट होत राहतात त्याला 'लोकसाहित्य' अशी संज्ञा बहाल केली जाते. साहजिकच, लोकमानसाचे शब्दरूप असणाऱ्या अशा साहित्याचे कर्तेपण कोणा एकाच्या खात्यावर जमा होत नसते. अशा साहित्याचा कर्ता अनाम, अरूप असतो. कारण, समूहाला

चेहरा नसतो. त्या अर्थाने लोकसाहित्य अ-पौरूषेय गणावे लागते. लोकसाहित्याच्या या प्रांतातील अभिव्यक्ती, बरेचदा, निखळ मौखिक असते. साहित्याच्या या प्रांगणातील जो काही अंश लिखित स्वरूपात अवतरतो तोदेखील मुद्रित रंगरूप धारण करेल याचीही हमी नसते. त्यांमुळे, अशा साहित्यव्यवहाराशी निर्मिती, अभिव्यक्ती, आस्वाद अशा विविध अंगांनी निगडित असणाऱ्या घटकांबाबत समाजातील शैक्षणिक-सांस्कृतिकदृष्ट्या उच्चवर्गीय, उच्चवर्णीय स्तरांत निकोप स्वागतशीलतेचा घाऊक अभावच नांदतो. 'अभिजात' आणि म्हणूनच प्रतिष्ठित गणल्या जाणाऱ्या साहित्याच्या दालनात लोकसाहित्याला आणि लोकसाहित्यकारांना, त्यांमुळे, उपेक्षेचे पानच मांडले जात आलेले आहे. 'जन-साहित्य' आणि 'अभिजन-साहित्य' या द्वंद्वाची निपज याच तरतम भावातून झालेली दिसते. अशा लोकसाहित्याची अंग-प्रत्यंगे आस्थेवाईक चिकित्सेने न्याहाळण्यात उमर व्यतीत केलेल्या डॉ. तारा भवाळकर यांच्यासारख्या ज्येष्ठ अभ्यासकाची संमेलनाध्यक्ष म्हणून निवड-नियुक्ती होणे, ही तशी अ-पूर्व बाब ठरली व ठरते. ***(पान २४ वर)***

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# नव-तंत्रज्ञान

## कृत्रिम प्रज्ञेचे नवे वादळ

आगामी काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'आर्टिफिशियल इंटलिजन्स' (एआय) हे नवे तंत्रज्ञान म्हणजे सर्वांसाठीच परवलीचा शब्द बनणार आहे. प्रगतीचा त्याचा वेग अफाट आहे. त्यामुळे हे कृत्रिम प्रज्ञेचे वादळ वर्तमानासह पुढील प्रदीर्घ भविष्यकाळापर्यंत सारे काही आपल्या कवेत घेईल, अशी शक्यता वर्तवली जाते आहे. त्यामुळेच, प्रस्थापित अनेक गोष्टी मुळासकट बाजूला पडण्याची भीती आणि अनेक नवी आव्हाने एका बाजूला तर, दुसऱ्या बाजूला या नव्या तंत्रज्ञानातून निर्माण होणाऱ्या अनेकानेक नव्या संधी, अशा एका बिंदूवर सगळेचजण उभे आहेत. परंतु, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तेजाने आज उभे जग प्रभावित झालेले आहे ही मात्र वस्तुस्थिती आहे. त्यामुळे प्रत्येकालाच या तंत्रज्ञानात स्वतःचे वर्चस्व असावे असे वाटू लागले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेसंदर्भात फ्रान्समध्ये अलीकडेच झालेल्या एका महत्त्वाच्या जागतिक परिषदेमध्ये सर्वच प्रमुख राष्ट्रांचे प्रतिनिधी, जाणकार आवर्जून सहभागी झाले होते. नव्या तंत्रज्ञानाच्या उदयामुळे निर्माण होणाऱ्या नव्या संधी आणि आव्हाने यांचा उहापोह त्यामध्ये करण्यात आला. नव्या तंत्रज्ञानाची ही नांदी लक्षात घेऊन भारतानेही या परिषदेचे सहयजमानपद स्वीकारले होते. अनेक देशांचे उपाध्यक्ष, नेते, महत्त्वाचे मंत्री, कृत्रिम प्रज्ञेच्या क्षेत्रात अग्रेसर असलेल्या अनेक विख्यात कंपन्यांचे प्रमुख, जाणकार, संशोधक, तज्ज्ञ असे बरेचजण या परिषदेला उपस्थित होते. कृत्रिम बुद्धिमत्ता ही खरोखरीच नवी संधी आहे की भविष्याच्या दृष्टीने संकट, यावर या परिषदेत सविस्तर चर्चा झाली.

**परिषदेत नेमके काय घडले?**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्याबाबतीत या व्यासपीठावर सांगोपांग चर्चा झाली. या क्षेत्रातील विस्तार-विकासाच्या संधी लक्षात घेता कुणा एकाची मक्तेदारी या क्षेत्रात निर्माण

होऊ नये; या नव्या तंत्रज्ञानाचा लाभ सर्वांना मिळावा आणि त्या दृष्टीने त्याचा उपयोग करून प्रगती करण्याची संधी सर्वांना मिळावी, अशी अपेक्षा अनेक जाणकारांनी व्यक्त केली. हे तंत्रज्ञान जगभरात विस्तारणार असल्याने नफेखोरी होण्याची प्रमुख भीती विविध राष्ट्रांनी व्यक्त केली. या तंत्रज्ञानाच्या प्रसाराबरोबर इतर अनेक जे धोकेही संभवतात त्यांवरही साधक-बाधक अशी चर्चा घडली. सायबर गुन्ह्यांचा वाढता धोका कसा रोखायचा, व्यक्ती किंवा देशाच्या स्वातंत्र्यावरच घाला संभवेल अशा गोष्टींना पायबंद कसा घालायचा, कुणा एकाचीच मक्तेदारी निर्माण होऊन त्याने एखाद्या राष्ट्राची कोंडी होऊ नये म्हणून काय उपाययोजना असाव्यात या विषयावरदेखील या परिषदेत चर्चा करण्यात आली. कृत्रिम बुद्धिमत्ता हे एखाद्याच्या विरोधात वापरण्याचे शस्त्र न बनता ते शाश्वत विकासाचे माध्यम बनावे या दृष्टीने सर्वांनीच या परिषदेत आग्रह धरला. इथून पुढील काळात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात काय घडामोडी घडतात त्यावर लक्ष ठेवून ते अनुचित व अनिष्ट दिशेने जाणार नाही याची दक्षता घेण्यासंदर्भातील सुतोवाचही या परिषदेत करण्यात आले.

कृत्रिम बुद्धिमत्ता हा आधुनिक युगातील नवा आणि सर्वांत मोठा शक्तिशाली असा तंत्रज्ञानात्मक आविष्कार मानला जातो आहे. त्यामुळे हा आविष्कार विध्वंसासाठी वापरला न जाता तो विधायक कारणांसाठी आणि मानवाच्या कल्याणासाठी कसा वापरला जाईल याबाबत आगामी काळात अधिक सजग राहण्याची आवश्यकता परिषदेत आग्रहाने मांडण्यात आली. सद्य:स्थितीत जगभरातील अनेक प्रमुख घडामोडी या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या परिसंस्थेतच घडत आहेत. त्यामुळे या क्षेत्राविषयीचे कुतूहल वाढण्याबरोबरच त्याच्या प्रभावाकडे सर्वांच्याच नजरा लागलेल्या आहेत. विविध क्षेत्रांत या तंत्रज्ञानाचे उपयोजन सुरू झालेले असल्यानेच हे वादळ येणाऱ्या काळात काय काय त्याच्या कवेत घेईल या विषयीचे आडाखे बांधणे सुरू झालेले आहे. ही कृत्रिम बुद्धिमत्ता आपला प्रभाव नेमका कोठे, किती आणि कसा निर्माण करेल आणि त्याचे दूरगामी परिणाम नेमके काय होतील या विषयी जाणकारही आजमितीस तरी संभ्रमात आहेत.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कुठे होईल?**

सध्याच्या उपलब्ध सर्व तंत्रज्ञानांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता हे आधुनिक तंत्रज्ञान सर्वांत प्रभावी ठरले आहे. भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या देशासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे क्षेत्र संधीची नवी कवाडे उघडेल अशी आशा जाणकारांकडून व्यक्त केली जाते आहे. एकूणच जगभरात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झपाट्याने

वाढतो आहे. अमेरिका, चीन, या सारख्या प्रमुख देशांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील नवे संशोधन व विकास यासाठी प्रचंड मोठी गुंतवणूक केलेली आहे. Tesla, Waymo आणि Uber सारख्या कंपन्यांनी त्यांची स्वयंचलित वाहने विकसित करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर सुरू केला आहे. अमेरिका व चीनसारख्या देशांनी वाहतूक नियंत्रणासाठी 'स्मार्ट' यंत्रणा विकसित करण्याकरता कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर सुरू केलेला आहे. आरोग्याच्या क्षेत्रातसुद्धा कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत घेऊन अधिक सुधारित निदानप्रणाली विकसित करण्यावर भर दिला जातो आहे. त्याचप्रमाणे 'रोबोटिक' शस्त्रक्रिया व औषधांच्या संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता मोलाची भूमिका बजावेल असा अंदाज वर्तवला जातो आहे. IBM Watson आणि Google DeepMind सारख्या प्रणालींच्या माध्यमातून कर्करोगासारख्या गंभीर आजारांचे निदान तत्परतेने करण्याच्या दिशेनेही पावले पडू लागली आहेत. वित्तीय सेवा आणि बँकिंग क्षेत्रातही कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर नजिकच्या काळात वाढत जाण्याची शक्यता आहे. जोखीम व्यवस्थापन व आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी आता प्रगत प्रणाली विकसित होणे गरजेचे आहे. वाढत्या आर्थिक सायबर गुन्ह्यांना रोखण्यासाठीसुद्धा नव्या सक्षम तंत्रज्ञानाधारित प्रणालीची गरज निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे त्या बाबतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचे योगदान मोलाचे राहील असा अंदाज वर्तवण्यात येतो आहे.

मानवी संवादातील त्रुटी आणि दरी कमी करण्यासाठी भविष्यात 'चॅटबॉट'च्या माध्यमातून ग्राहकांशी नेमका संवाद साधण्यासाठी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बळावर नवे सल्लागार तयार करण्यासाठी त्या दिशेनेही पावले पडू लागली आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रातदेखील कृत्रिम बुद्धिमत्ता आपला दमदार ठसा उमटवेल याची चिन्हे आतापासूनच दिसू लागली आहेत. संशोधनाच्या क्षेत्रात संदर्भांसाठी, लेखनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे सहाय्य होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने नवे 'ई–लर्निंग' अभ्यासक्रम व आभासी प्रशिक्षण वर्ग अधिक अद्ययावत पद्धतीने विद्यार्थ्यांसमोर घेऊन जाणे शक्य होणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठी आणि तिचे विश्लेषण करण्यासाठी आवश्यक प्रणाली विकसित करण्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाचा वाटा मोठा असणार आहे. शेअर बाजार, म्युच्युअल फंड किंवा अन्यत्र गुंतवणूक करताना त्या संदर्भातील सुस्पष्ट धोरण आखण्यासाठी आणि गुंतवणुकीबाबत आवश्यक ते विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता भविष्यात खूप मोलाची कामगिरी बजावेल असा अंदाज आहे. विविध कारखान्यांमध्ये उत्पादनाचा वेग वाढवण्यासाठी

आणि उत्पादकता वृद्धिंगत राखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरूदेखील झाला आहे. 'रोबो'च्या मदतीने अधिकाधिक कामे हातावेगळी व्हावीत असाही प्रयत्न केला जातो आहे. त्यामुळे उत्पादनांची गुणवत्ता सुधारण्यास मोठा हातभार लागेल असा जाणकारांचा अंदाज आहे. ग्राहकांच्या नेमक्या गरजा, अपेक्षा आणि मागणीचे अंदाज जाणून घेण्यासाठी आणि एकूणच बाजारपेठेचे यथायोग्य आकलन होण्यासाठीदेखील हे तंत्रज्ञान भविष्यात उपयुक्त ठरेल.

आजच्या घडीला 'ऑनलाइन' खरेदी करण्याकडे लोकांचा कल दिवसेंदिवस वाढतो आहे. 'ॲमेझॉन', 'फ्लिपकार्ट' यांसारख्या विविध 'ई-शॉपिंग पोर्टल्स'वरून खूप मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जाते. परंतु त्यातही आता स्पर्धा वाढू लागली आहे. त्यामुळे 'ई-खरेदी' करणाऱ्या ग्राहकांच्या आवडी-निवडी, त्यांचा खरेदीचा कल, त्यांची क्रयशक्ती या सगळ्याचा अभ्यास करून ग्राहकांची इत्थंभूत माहिती संचयित करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान आगामी काळात मोठी कामगिरी बजावणार आहे. 'ऑनलाइन' खरेदी करणाऱ्या प्रत्येक ग्राहकाचे एक 'प्रोफाइलच' जणू कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बळावर तयार होऊ शकणार आहे.

वैयक्तिक पातळीवर संवादाची गरज भागवण्यासाठी किंवा मनोरंजनाची भूक भागवण्यासाठी Alexa, Siri आणि Google Assistant यांसारख्या प्रणाली विकसित करण्यात आलेल्या आहेत. विनोद ऐकवण्यापासून मनपसंत गाणे लावण्यापर्यंत हे सहायक मदत करतात. हवे ते छायाचित्र शोधून देणे, पाहिजे त्या व्यक्तीला फोन लावून देणे ही कामे विनासायास केली जातात. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जसजसा वाढत जाईल आणि 'चॅटबॉट' हे तंत्रज्ञान जसजसे प्रगल्भ होत जाईल तसतसे या सगळ्यांत कल्पनेच्या पलीकडे सुधारणा होत जातील. आजच्या घडीला, आज्ञा दिल्याबरोबर ती अमलात आणणारी ही यंत्रणा येणाऱ्या काळात आपल्या मनातील विचार ओळखून त्यानुसार तत्काळ कार्यवाही करू शकेल, अशा दिशेने या क्षेत्रातील संशोधन सुरू झालेले आहे. लेखन, 'व्हीडिओ' ध्वनिमुद्रण या क्षेत्रांमध्ये तर कृत्रिम बुद्धिमत्तेचा दबदबाच निर्माण होईल अशी शक्यता वर्तवली जाते आहे. वृत्तवाहिन्यांच्या क्षेत्रांत वृत्तनिवेदक म्हणून, मालिकांमध्ये एखाद्या भागाच्या तरुणपणीची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी, चित्रपटांमध्ये कलाकार म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बळावर खरेखुरे वाटावेत असे प्रयोग सुरू झालेले आहेत. 'चॅट जीपीटी', 'डीपसिक' यांसारख्या तंत्रज्ञानांच्या माध्यमातून मनातील प्रत्येक गोष्टीला उत्तर देणारी यंत्रणा विकसित होते आहे. त्यामुळे, एरवी ज्या कामांसाठी अडावे लागत होते त्या बाबी चुटकीसरशी

पूर्ण होऊ लागल्या आहेत. परिणामी त्या क्षेत्रांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक मोठे आव्हानवजा वरदान ठरेल असे मानले जाते आहे.

**जागतिक पातळीवरची स्पर्धा**

राष्ट्राध्यक्ष म्हणून अमेरिकेची धुरा नव्याने खांद्यावर घेतलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनीदेखील कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व लक्षात घेत ५०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करून 'स्टारगेट' ही नवीन कंपनी सुरू करण्याची घोषणा केली आहे. 'डेटा सेंटर्स'ची निर्मिती आणि 'मायक्रोचिप'चे उत्पादन यावर ही कंपनी भर देणार आहे. अमेरिकी युवकांना नवे रोजगार मिळवून देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात अनेकानेक नव्या संधी तयार होतील, असा विश्वास व्यक्त केला जातो आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे नवे तंत्रज्ञान कोण अधिक प्रभावीपणे वापरतो आणि कशा पद्धतीने त्यांद्वारे देशाचा विकास घडवून आणतो यावर 'महासत्ता' म्हणून जगात कोण ओळखले जाणार हीसुद्धा एक अंत:स्थ स्पर्धा सुरू झालेली आहे. त्याच पार्श्वभूमीवर, चीननेसुद्धा कंबर कसून तयारी सुरू केलेली आहे. 'डीपसिक' ही त्याची एक छोटीशी झलक होय. भारतानेही 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेशी कटिबद्ध राहून कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान नव्याने विकसित करण्याची घोषणा केलेली आहे.

येणाऱ्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील संशोधन आणि स्पर्धा तीव्र होत जाण्याची जणू नांदीच फ्रान्समध्ये आयोजित करण्यात आलेल्या जागतिक परिषदेद्वारे झाली आहे. या तंत्रज्ञानामुळे जगभरात आनंद, कुतूहल, भीती आणि चिंता अशा संमिश्र भावना निर्माण होत आहेत. प्रत्येक नवे तंत्रज्ञान दुधारीच असते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रत्यक्षात वापर चुकीच्या दिशेने होऊ नये, अशी प्रार्थना सर्वच स्तरांवर केली जाते आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान प्रचंड शक्तिशाली असल्याने त्याचा अनिष्ट पद्धतीने वापर झाल्यास त्याचे संभाव्य परिणाम अतिशय घातक असू शकतील अशी धास्ती सर्वांनाच आहे. या प्रभावी तंत्रज्ञानाची मक्तेदारी निर्माण होणे हे तर त्याहून धोकादायक ठरू शकणार आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर हा शाश्वत विकास, सर्वांगीण प्रगती, वैश्विक शांती व जागतिक समुदायाच्या पुढ्यातील अनेक जटिल समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्हायला हवा, असाच या जागतिक परिषदेचा बलवान सूर राहिला

# सृष्टीसंशोधन

## सहाव्या विलोपनाच्या दिशेने...?

आगामी काळात हे जग नष्ट होणार आहे, अशा प्रकारच्या चर्चा नेहमी होताना दिसतात. जगबुडी होणार, महाप्रलय येणार, दुसऱ्या ग्रहाशी टक्कर होणार अशा अनेक प्रकारच्या वावड्या नेहमी उठताना दिसतात. पृथ्वी नष्ट होणार असल्याची चर्चा २०१२ सालीसुद्धा जगभरात सुरू झालेली होती. परंतु, ही सगळी भाकिते खोटी ठरत आलेली असली आणि अशा वावड्या उठत असल्या तरी खरोखरीच पृथ्वीवरील जीवसृष्टी येणाऱ्या काळात नष्ट होऊ शकेल अशी भीती शास्त्रज्ञ आता अभ्यासाद्वारे वर्तवू लागले आहेत. जागतिक स्तरावर आताशा होत असलेल्या नव्या संशोधनात पृथ्वीवर राहणारी सजीवसृष्टी नामशेष होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. पर्यावरणाचा झपाट्याने होणारा ऱ्हास, वाढते प्रदूषण, वातावरणातील लक्षणीय बदल आणि जागतिक तापमानवाढ या बाबी त्यासाठी कारणीभूत ठरतील अशी भीती व्यक्त केली जाते आहे. पृथ्वीवरील सर्व खंड अस्थिर बनून काळाच्या ओघात एकमेकांपासून सुटे होऊन वाहायला लागतील आणि भविष्यात एकच महाखंड तयार होईल अशा प्रकारच्या संभाव्यता व्यक्त होताना दिसतात. त्याला Pangea Ultima असे नाव देण्यात आले असून या नव्या खंडनिर्मितीमुळे प्रचंड प्रमाणात उष्णता वाढेल आणि त्यामुळे मानव व सर्व सस्तन प्राणी नष्ट होतील, असा कयास संशोधकांनी व्यक्त केलेला आहे. यालाच शास्त्रज्ञांनी 'महाविलोपनाचा सहावा इशारा' (Sixth Mass Extintion) असे नाव दिले आहे.

ब्रिटनमधील University of Bristol मधील संशोधक Dr. Alexander Farnsworth यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांच्या चमूने हे संशोधन केले आणि पृथ्वीच्या आयुर्मानाविषयी काही निष्कर्ष काढले. Nature Geoscience या जगविख्यात नियतकालिकामध्ये हा संशोधन प्रबंध प्रसिद्ध झालेला आहे. त्यामुळे जगभरातील संशोधकांचे लक्ष या संशोधनाकडे वेधले गेले असून त्यावर अनेक

प्रकारची मतमतांतरे व्यक्त होताना दिसत आहेत. वातावरणातील सध्याच्या बदलांचा अभ्यास करून भविष्यात काय परिस्थिती राहणार आहे आणि पृथ्वीचे एकूण आयुर्मान किती राहील यावर या संशोधनामध्ये भर देण्यात आलेला होता. या अभ्यासात शास्त्रज्ञांना असे दिसून आले की, पृथ्वीवरील सर्व महत्त्वाचे खंड आता हळूहळू हलू लागले आहेत. भविष्यात हे बदल वाढत जातील आणि या सगळ्यांतून एकाच खंडाची निर्मिती होण्याची शक्यता संभवते. मानवाच्या आणि सजीवसृष्टीच्या अंताचे हे कारण ठरेल. अशा महाखंड निर्मितीमुळे पृथ्वीच्या हवामानात लक्षणीय असे बदल घडून येतील. त्यामुळे वातावरणात कोरडेपणा खूप मोठ्या प्रमाणावर वाढेल आणि उष्णताही वाढत जाईल. हे तापमान सजीवांना सहन होण्याच्या पलीकडचे असेल. त्यामुळे पृथ्वीवर जिवंत राहण्याजोगे वातावरण राहणार नाही आणि परिणामी सर्व सजीव नष्ट होत जातील, असा कयास आता व्यक्त करण्यात येतो आहे.

महाद्वीपीय प्रभाव, सूर्याचे वाढते तापमान आणि वातावरणात वाढत जाणारा कार्बन डाय ऑक्साइड यांच्यामुळे तापमानवाढ होत असते. हे सर्व परिणाम येणाऱ्या काळात तीव्र होणार असल्याने त्यात तग धरून राहणे पृथ्वीवरील सजीवांना शक्य होणार नाही. नवीन खंडनिर्मितीमुळे पृथ्वीच्या हवामानात लक्षणीय असे बदल घडून येतील. महाखंडाच्या निर्मितीनंतर समुद्रावरील तापमानही वाढत जाईल आणि त्यामुळे त्याचा परिणाम म्हणून बर्फ मोठ्या प्रमाणावर वितळू लागेल. हा सर्वांत मोठा महाद्वीपीय प्रभाव म्हणून गणला जाईल, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे.

अनेक खंडांचे विलिनीकरण झाल्याचेही दूरगामी परिणाम होत जातील. या सगळ्यातून जगात अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणावर निर्माण होईल. त्यामुळेदेखील सजीवांचे हाल हाल होत जातील. एकूणच जीवनासाठी प्रतिकूल असे वातावरण येणाऱ्या काळात तयार होत जाईल, असा अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तवलेला आहे. येत्या दहा लाख वर्षांमध्ये हे बदल होत जातील असे अनुमान हे अभ्यास वर्तवतात. त्या काळातील सूर्य अधिक आग ओकणारा असेल. ज्वालामुखीय क्रियाकलाप अधिक मोठ्या प्रमाणावर होतील आणि त्यातून कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण अधिक वाढत जाईल. पृथ्वीतलावर वाढत जाणारे हे तापमान ५० अंशांच्याही वर जाण्याची शक्यता असल्याने या तीव्र तापमानामुळे अनेक प्रजाती नष्ट होतील.

जीवसृष्टी नष्ट होत जाण्यामागे नेमकी कारणे कोणती असतील याचाही वेध घेण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञांनी केलेला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार, पर्यावरणाचा ऱ्हास हे त्यामागचे प्रमुख कारण असणार आहे. प्रामुख्याने मानवच या ऱ्हासाला

कारणीभूत ठरणार असून त्याच्या बेपर्वाईमुळेच हे संकट सजीवांच्या अस्तित्वाच्या मुळावर येणार आहे. वातावरणात होणारे बदल हे कल्पनेच्या पलीकडचे असतील आणि भयंकर अशा तापमानवाढीचा सामना सजीवांना करावा लागू शकेल, अशी भीती शास्त्रज्ञांना आहे. प्रचंड वेगाने आज वाढणारे हे प्रदूषणच भविष्यातील या महासंकटाचे कारण ठरू शकेल, असा इशाराही शास्त्रज्ञांनी दिला आहे.

कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण भविष्यात किती वाढेल याचा अंदाज घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी काही प्रयोग केले. Tectonic Plates Movement आणि Chemical Composition of Sea Water या दोन शास्त्रीय पद्धतींचा वापर करून भविष्यात कार्बन डाय ऑक्साइडची पातळी किती राहील याचा अभ्यास केला जातो. सध्याच्या परिस्थितीमध्ये कार्बन डाय ऑक्साइडची ही पातळी प्रति दशलक्षामागे सुमारे ४०० भाग (पीपीएम) इतकी आहे. येत्या काही वर्षांत ती वाढून ६०० पीपीएमपेक्षा अधिक होईल असा अंदाज शास्त्रज्ञांकडून वर्तवला जातो आहे. हे वाढणारे प्रमाण मानवजातीसाठी निश्चितच धोकादायक आहे. कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण अशाच पद्धतीने वाढत राहिले तर संपूर्ण मानवजातीच्या विनाशास ते कारणीभूत ठरू शकेल अशी भीती शास्त्रज्ञांना आहे. म्हणूनच त्या संदर्भात तातडीने पावले उचलणे आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे गरजेचे बनले आहे.

पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टी नष्ट होण्याच्या घटना या पूर्वीच्या काळातसुद्धा घडलेल्या असल्याचे दाखले मिळतात. सुमारे ४४३ दशलक्ष वर्षांपूर्वी असेच महाविलोपन घडून आलेले होते. त्यामध्ये ८५ टक्के सागरी जीवन नष्ट झाले होते. त्यास Ordovician-Silurian Extinction असे नाव देण्यात आले होते. दुसरी घटना म्हणजे Late Devonian Extinction या नावाने ओळखले जाणारे विलोपन. हे महाविलोपन ३६० दशलक्ष वर्षांपूर्वी घडले होते. त्यामध्ये सृष्टीवरील ७५ टक्के प्रजाती नष्ट झालेल्या होत्या. त्या नंतर, २५२ दशलक्ष वर्षांपूर्वी Permian Triassic Extinction या नावाने निर्देशित केले जाणारे महाविलोपन झालेले होते. त्यामध्येही असेच मोठे बदल घडून आले होते. या विलोपनाला The Great Dying असे म्हटले जाते. कारण पृथ्वीवरचे हे सर्वांत विनाशकारी विलोपन समजले जाते. २५२ दशलक्ष वर्षांपूर्वी Permian Triassic Extinction या नावाच्या विलोपनामुळे खूप मोठ्या प्रमाणावर सजीवसृष्टी नष्ट झालेली होती. त्या वेळी समुद्रातील तब्बल ९६ टक्के जीव नष्ट झालेले होते. त्या संदर्भात, अलीकडच्या काळात जागतिक स्तरावर झालेल्या संशोधनानुसार, त्याचेही प्रमुख कारण जागतिक तापमानवाढ हेच

होते. वाढलेल्या तापमानामुळे सजीवांना श्वास घेणे अशक्य होत गेले आणि परिणामी त्यांचा विनाश अटळ ठरला, असे संबंधित अभ्यासातून समोर आले आहे. University of Washington आणि Stanford University यांनी या संदर्भात महत्त्वाचे संशोधन प्रसिद्ध केले आहे. त्या वेळी प्राण्यांची बदलत गेलेली अवस्था आणि वातावरणाची स्थिती त्यामध्ये सादर केलेली आहे. जागतिक तापमानवाढीमुळे समुद्रातील पाण्याचे तापमान वेगाने वाढत गेले आणि त्याचा परिणाम होऊन समुद्री जीवांना श्वासोच्छवास करताच येईना. समुद्रातील ८० टक्के ऑक्सिजन संपून गेला होता. परिणामी, समुद्री जीवांचा श्वासोच्छवासाअभावी समुद्रातच मृत्यू झाला होता. त्या काळातील जीवाश्मांचा अभ्यास केला असता नेमके काय घडले असू शकेल याचा अंदाज येतो. तेव्हाचे समुद्री जीव आणि आताच्या काळातील समुद्री जीव यांची अशा परिस्थितीत तग धरून राहण्याची क्षमता लक्षात घेतली तर ती जवळपास समान आहे, असेही या संशोधनातून समोर आलेले आहे. ऑक्सिजनची मात्रा झपाट्याने कमी होण्याची अशीच काहिशी परिस्थिती जमिनीवरही उद्‌भवली होती व त्यामुळे तेथील सजीवांचाही तडफडून मृत्यू झाला असल्याची माहिती Stanford University मधील School of Earth Energy & Environmental Sciences विभागातील प्राध्यापक Jonathan Payne यांनी आपल्या संशोधनाद्वारे मांडलेली आहे.

आज लक्षावधी वर्षानंतर पुन्हा एकदा पृथ्वीला तशाच जागतिक तापमानवाढीचा धोका निर्माण झालेला असून त्याचे परिणाम काय संभवतात हे संशोधनातून समोर आलेले आहे. त्यामुळे, पृथ्वीवरील सजीवांच्या अस्तित्वाचाच गंभीर प्रश्न निर्माण होईल की काय अशी भीती शास्त्रज्ञांना आहे. वेगाने होणारे कार्बन उत्सर्जन, वाढते प्रदूषण या व अशा धोक्यांना वेळीच पायबंद घालणे ही त्यामुळेच काळाची गरज ठरणार आहे.

# शिक्षण

## संस्थात्मक शिक्षणाला नवा पर्याय

'कोविड-१९'च्या आव्हानानंतर विविध क्षेत्रांतील अनेक संदर्भ बदलले आहेत. हे केवळ एखाद्या देशापुरते मर्यादित राहिलेले नसून तर जगभरात त्याचे पडसाद उमटले. त्यातून अनेक गोष्टींच्या कार्यपद्धतीत बदल घडून आलेले आहेत. अगदी वानगीदाखल सांगायचे झाले तर, माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनेक कंपन्यांना 'वर्क फ्रॉम होम'चा पर्याय 'कोविड-१९'च्या काळात अपरिहार्यपणे स्वीकारावा लागला खरा; परंतु 'कोरोना' सरल्यानंतरही त्याची उपयुक्तता त्यांच्या लक्षात आली. कर्मचाऱ्यांकडून काम करवून घेण्यासाठी त्यांना प्रवास भत्ता देण्यासह अनेक बाबतीत तरतूद करावी लागते. 'इंटरनेट'सह आवश्यक असणाऱ्या सर्व पायाभूत सुविधा, बसण्याची जागा, कामाच्या ठिकाणी असणाऱ्या गरजेच्या गोष्टी अशी सर्व तयारी कंपनीला कर्मचाऱ्यांसाठी जय्यत ठेवावी लागते. त्यावर मोठा खर्चही होत असतो. परंतु जे काम कर्मचाऱ्यांकडून नियोजित कालमर्यादेत पूर्ण करवून घ्यायचे आहे ते काम ती व्यक्ती कंपनीत न येताही तिच्या घरात बसून 'लॅपटॉप'वर पूर्ण करू शकते; 'इंटरनेट' व 'कॉन्फरन्स कॉल' यांसारख्या माध्यमातून त्या कर्मचाऱ्यांवर सतत लक्षही ठेवता येते आणि हे सर्व घडत असताना उत्पादकता कमी न होता उलट कमी खर्चात अनेक गोष्टी साध्य होऊ शकतात, हे घरून काम करण्याच्या पर्यायामुळे लक्षात आले. त्यामुळे 'कोविड-१९'चे आव्हान संपुष्टात आल्यानंतर आणि टाळेबंदी संपल्यानंतरदेखील अनेक कंपन्यांनी आपल्या कार्यपद्धतीत बदल करून घरून काम करण्याची कार्यप्रणाली सुरू ठेवली. असेच काहीसे शाळांच्या बाबतीतही झाले. 'कोविड-१९'च्या काळामध्ये शाळा बंद होत्या आणि मुले घरात होती. या काळात मुलांसाठी आभासी शाळा (ऑनलाइन) भरल्या. परिस्थिती पूर्ववत झाल्यावर शाळा सुरू झाल्या खऱ्या; परंतु, आपल्या मुलांसाठी 'होम स्कूलिंग' हा खुल्या शिक्षणाचाही एक चांगला पर्याय असू शकतो आणि आपल्या

मुलांमध्ये होणारा विकास आपण स्वत: त्याद्वारे पाहू शकतो असे जगभरातील अनेक पालकांच्या लक्षात आले. त्यामुळे 'कोविड-१९' नंतर 'होम स्कूलिंग'चे प्रमाण जागतिक स्तरावर वाढले असल्याचे अलीकडील आकडेवारीतून समोर आले आहे.

अमेरिकेच्या संदर्भात सांगायचे झाले तर २०१९ साली सुमारे वीस लाख मुलांनी 'होम स्कूलिंग'चा पर्याय तिथे निवडला होता. अवघ्या चार-पाच वर्षांत ही संख्या आता ४० लाखांच्या वर गेली आहे. चीनसारख्या देशात 'होम स्कूलिंग' ही संकल्पना बेकायदेशीर गणलेली आहे. तरीही तिथे नव्याने स्थलांतरित होणाऱ्या स्थलांतरितांबरोबरच नवा विचार करणाऱ्या चिनी नागरिकांमध्ये आता 'होम स्कूलिंग'विषयी आकर्षण वाढते आहे. भारतासह इतरही अनेक देशांमध्ये त्याचे प्रमाण वाढू लागले आहेत. त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

आभासी शिक्षण हा एक प्रभावी मार्ग असू शकतो असे 'कोविड १९' नंतर लक्षात आल्याने आपल्या मुलांना हवे असणारे शिक्षण त्या माध्यमातून दिले जाऊ शकते असे पालकांच्या ध्यानात येत आहे. शाळेमध्ये जे शिक्षण मिळते ते सर्व शिक्षण जर मुलांना आभासी माध्यमातून देणे शक्य होत असेल, तर मुलांना शाळेत पाठविण्याची कसरत कशासाठी करा, असा विचार करून 'होम स्कूलिंग'चा अंगीकार करण्याकडे जगभरातील पालकांचा एकंदरीत कल वाढतो आहे.

समाजव्यवस्थेत आणि सांस्कृतिक पर्यावरणातही आज महत्त्वाचे अनेक बदल घडून येत आहेत. अर्थातच, त्याचा परिणाम लोकांच्या जीवनमानावरही होतो आहे. या बदलत्या सामाजिकतेमुळेसुद्धा घरातच मुलांना शिक्षण देण्याची सुविधा लोकांच्या पसंतीस उतरते आहे. स्वत:चे आयुष्य उभे करीत असताना पती-पत्नी या दोघांनाही त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात. ही सारी धावपळ एकीकडे सांभाळत असतानाच मुलांना शाळेत सोडणे, शाळेतून आणणे, त्या वेळेत घरी थांबणे, शाळेतील त्यांच्या प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवणे, पालकसभांना उपस्थित राहणे या बाबी पालकांना कराव्या लागतात. परंतु, मूल घरातच शिकत असेल तर त्याची प्रगती आपल्या डोळ्यांदेखत होत राहते. त्यामुळे हा पर्याय लोकांना जवळचा वाटू लागला आहे.

मुलांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने त्यांच्यातील गुण नेमकेपणाने हेरून त्यांना त्या प्रांतात प्रगतीची संधी देणे आवश्यक असते. परंतु शाळेत हे होईलच याची खात्री अनेकदा देता येत नाही. त्यामुळे मुलांचा विकास खुंटतो, अथवा इतर मुले करतात त्याचेच अनुकरण केले जाते. परंतु, त्यांपायी मुलांमधील

स्वत्व बाहेर येत नाही, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा खऱ्या अर्थाने विकास होत नाही. तो होण्याच्या दृष्टीने मुलांना शिक्षणाच्या संधी आणि त्यांना हवे असणारे अवकाश घरात उपलब्ध करून दिले तर मुलांची प्रगती चांगल्या रीतीने होऊ शकते, हे अभ्यासातून समोर आले आहे. त्यामुळे, चार भिंतींच्या चौकटीत बंदिस्त राहून मुलांना केवळ अभ्यासकेंद्री बनवण्यापेक्षा त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी 'होम स्कूलिंग'सारखा पर्याय अधिक प्रभावी ठरू शकतो, असा या क्षेत्रात काम करणाऱ्यांचा दावा आहे.

अनेकदा काही कौटुंबिक अडचणी किंवा अन्य काही कारणांमुळे मुलांना नियमितपणे शाळेत पाठवणे शक्य होत नाही. अशा वेळी शिक्षणाचे पर्यायी मार्ग महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे मुलांचे शिक्षण खंडीत होत नाही. अशा परिस्थितीमध्ये 'होम स्कूलिंग' हा पर्याय कुटुंब आणि मुले या दोघांच्याही दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरतो.

मुलांच्या शिकण्याच्या पद्धती आणि त्यांना शिकवण्याच्या पद्धती या दोन्हींमध्ये आता बदल होत आहेत. ते समजून घेत शिक्षणातही नवे काही बदल घडून येणे आवश्यक असते. शालेय चौकटीत अनेकदा साचेबद्ध किंवा एकाच ठरावीक पद्धतीने शिक्षण दिले जाते. परंतु, मुलांच्या गरजा समजून घेत त्यात लवचिकता आणणे आता गरजेचे आहे. हे 'होम स्कूलिंग'मध्ये निश्चितपणाने शक्य होते. विषय निवडीचे, अभ्यासाच्या कालावधीचे स्वातंत्र्य असल्याने एखादा मुलगा एखाद्या विषयात मागे पडत असेल तर त्याची त्या विषयातील अडचण नेमकेपणाने लक्षात घेऊन, त्यावर लक्ष केंद्रित करून त्याला त्यातून बाहेर काढता येऊ शकते.

**मुलांकडे व्यक्तिगत लक्ष**

अनेक शाळांमध्ये एकेका वर्गात ५०-६० विद्यार्थी असतात. अशा वेळी प्रत्येक विद्यार्थ्याकडे व्यक्तिगत पातळीवर लक्ष देणे शिक्षकांना शक्य होतेच असे नाही. शालेय जीवनात असे व्यक्तिगत पातळीवर दिले गेलेले लक्ष व्यक्तिमत्त्व विकासात फार महत्त्वाचे असते. 'होम स्कूलिंग'मध्ये व्यक्तिगत पातळीवर लक्ष देणे शक्य होते. त्यामुळे आपल्या मुलांमधील कलागुणांचा योग्य विकास करण्याच्या दृष्टीने किंवा त्यांच्याकडे व्यक्तिगत पातळीवर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने हा पर्याय पालकांच्या पसंतीस उतरतो आहे.

लहान मुलांचे आरोग्य हा सध्याच्या काळात पालकांसाठी खूप चिंतेचा विषय बनतो आहे. शाळेमध्ये अनेकदा मुले एकमेकांबरोबर खेळताना, जेवण करताना स्वच्छतेचे भान राखतातच असे नाही. त्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या अनेक समस्या

निर्माण होतात असे पालकांना वाटत असते. त्याचप्रमाणे, मुलांची सुरक्षितता हा मोठ्या शहरांतील कळीचा मुद्दा बनलेला आहे. रस्त्यावर होणारी वाहतूककोंडी, मुलांना ने-आण करण्याच्या संदर्भातील वाढत्या असुविधा, वाढती गुन्हेगारी, मुलांचे शोषण अशा अनेक बाबींमुळे मुलांना आपल्यापासून दूर कसे पाठवायचे या विवंचनेत पालक असतात. त्यांच्या सुरक्षिततेची काळजी पालकांना सतत लागलेली असते. अशा परिस्थितीत, मुले आपल्या डोळ्यासमोर असावीत असे त्यांना वाटते. त्या दृष्टीने 'होम स्कूलिंग' हा पर्याय पालकांना अगदी चांगला वाटतो.

'होम स्कूलिंग'द्वारे शिक्षण देत असताना पालकांना आपल्या मुलांना घरी शिक्षण देता येते. त्यासाठी कोणत्याही सरकारी अथवा खासगी शाळेत मुलांना भरती करण्याची गरज पडत नाही. मुलांची गरज आणि आवड लक्षात घेऊन मुलांसाठी त्यांच्या सोयीचा अभ्यासक्रम किंवा आवडीचे विषय पालक ठरवू शकतात. शिक्षणातून जी मूल्ये किंवा संस्कार मुलांपर्यंत पोहोचावेत असे पालकांना वाटते ते पोहोचवण्यासाठी त्यांना 'होम स्कूलिंग' हा पर्याय अधिक प्रभावी वाटत असल्याने त्याकडे ओढा वाढतो आहे, असे निरीक्षण समाजशास्त्रातील जाणकारांकडून वर्तवले जाते आहे. National Home Education Research Institute चे अध्यक्ष Brian Ray यांनी या संदर्भातील आपली भूमिका अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून मांडलेली आहे. त्यांच्या मते, मुलांच्या विकासाच्या दृष्टीने 'होम स्कूलिंग' हा पर्याय नेहमीच उपयुक्त ठरत आला आहे, हे इतिहासाने दाखवून दिले आहे. घरच्या घरी शिक्षण घेऊनसुद्धा अनेक उद्योजक, कलाकार, व्यावसायिक, शिक्षक, खेळाडू, राजकारणी तयार झालेले आहेत आणि पुढील आयुष्यात त्यांनी उत्तम लौकिक संपादन करताना स्वत:ची कारकीर्द उत्तम घडवली असल्याची अनंत उदाहरणे डोळ्यांसमोर आहेत. यामुळेच जागतिक स्तरावर 'होम स्कूलिंग' या पर्यायाकडे ओढा वाढतो आहे. मुले आपल्या कुटुंबातच अधिक चांगल्या रीतीने विकसित होऊ शकतात, त्यांच्यातील कलागुणांना खरा वाव मिळू शकतो, व्यक्तिगत पातळीवर लक्ष दिल्याने मुलांमध्ये असणाऱ्या अनेक सुप्त क्षमतांचा शोध तिथेच लागतो. अशा सर्व बाबी शालेय शिक्षणाच्या प्रचलित पद्धतीद्वारे साध्य होतीलच याची शाश्वती पालकांना वाटत नाही.

आपल्याला हव्या असणाऱ्या विषयांमध्ये अभ्यास करण्याचे स्वातंत्र्य, त्याच्या जोडीला इतर कलागुणांची जपणूक, आवडत्या खेळात रमण्याची मुभा आणि आपल्या सोयीने अभ्यास करण्याची संधी या प्रमुख सुविधांपायीच 'होम स्कूलिंग'कडचा

ओढा जगभरात वाढतो आहे. अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन या सारख्या पुढारलेल्या देशांतच नव्हे तर एकाधिकारशाही असणाऱ्या चीनसारख्या देशांतही 'होम स्कूलिंग'चे आकर्षण वाढते आहे. 'होम स्कूलिंग' या संकल्पनेवर चीनमध्ये कायद्याने बंदी आहे. कुटुंबातील मूल किमान नऊ वर्षांचे होईपर्यंत ते सार्वजनिक शाळेतच शिकले पाहिजे, असा तिथला दंडक आहे. असे असतानादेखील 'होम स्कूलिंग' ही कल्पना चीनमध्ये झपाट्याने लोकप्रिय होते आहे. त्यामुळे आभासी अभ्यासक्रम शिकण्याकडेही चीनमधील मुलांचा ओढा वाढू लागला आहे. 'केंब्रिज इंटरनॅशनल' सारख्या जागतिक स्तरावरच्या नामांकित विद्यापीठांनी चीनमध्येही आभासी अभ्यासक्रम सुरू केलेले आहेत. 'होम स्कूलिंग'चा लाभ घेणारी अनेक मुले या अभ्यासक्रमांतून नवे ज्ञान व कौशल्य संपादन करीत आहेत.

भारतामध्ये तर फार पूर्वीपासून गुरूकुल परंपरा होती. तिथे मिळणाऱ्या शिक्षणात मुलांचा सर्वांगीण विकास होत असे. त्याच धर्तीवर आता सुरू झालेले 'होम स्कूलिंग' भारतातही लोकप्रिय होऊ लागले आहे. भारतात बंगळुरू, दिली, मुंबई अशा सर्व प्रमुख शहरांमध्ये 'होम स्कूलिंग'ला मागणी वाढते आहे. पारंपरिक शिक्षणाला पर्याय म्हणून या शिक्षणप्रणालीकडे पाहिले जाते आहे. अन्य देशांतील 'होम स्कूलिंग' संकल्पना, बाहेरील शिक्षकांनी घरी जाऊन शिकवणे किंवा आभासी अभ्यासक्रम घरात बसून पूर्ण करणे या पुरती मर्यादित आहे. औपचारिक शालेय अभ्यासक्रम शिकत असतानाच मुलांकडे व्यक्तिगत पातळीवर लक्ष देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणाऱ्या व्यावहारिक ज्ञानाची अनेक अंगे या शिक्षणप्रणालीद्वारे आत्मसात करता येतात. मात्र, त्यासाठी पालकांना अत्यंत दक्ष राहून मुलांसाठी वेगळा वेळ देणे आवश्यक असते. त्यांनी डोळ्यांत तेल घालून मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर लक्ष केंद्रित केले तर पारंपरिक शिक्षणव्यवस्थेपेक्षा या प्रणालीत मुले चांगल्या रीतीने तयार होऊ शकतात, असे 'होम स्कूलिंग' या संकल्पनेवर काम करणाऱ्या जाणकारांचे मत आहे.

मात्र, 'होम स्कूलिंग' या संकल्पनेचे जसे लाभ आहेत तसे काही तोटेदेखील आहेत. मुलांना घडवण्यासाठी 'होम स्कूलिंग' या संकल्पनेचा स्वीकार करण्यापूर्वी पालकांना स्वत:ची मनोभूमिका अगोदर तयार करावी लागते आणि मुलांच्या केवळ संगोपनाचीच नव्हे तर शिक्षणाची आणि व्यक्तिमत्त्व विकासाची संपूर्ण जबाबदारी आता सर्वस्वी आपली आहे, हे लक्षात घेऊन त्यासाठी आवश्यक तेवढा वेळ द्यावा लागतो. मुलांना घडवण्यासाठी स्वत:ला झोकून द्यावे लागते. मुलांचा विकास योग्य

दिशेने व्यवस्थित होतो आहे ना हे बघण्यासाठी दक्ष राहावे लागते. मुले शाळेत जातात तेव्हा त्यांना मित्रपरिवार लाभतो, समवयस्कांमध्ये मुलांचा विकास चांगला होत असतो, शालेय अभ्यासाव्यतिरिक्त अन्य उपक्रमांमध्ये मुले सहभागी होतात तेव्हा त्यांचा मानसिक विकास अनेक अंगांनी होत असतो आणि इतर मुलांमध्ये वावरल्याने त्यांच्यामध्ये आत्मविश्वास येतो, हुशारी वाढते आणि ती सामाजिक वातावरणात अगदी सहजतेने समरस होऊ शकतात. त्यामुळे, शाळेत जाऊन घेतलेल्या शिक्षणाचेही वेगळे लाभ असतात. जेव्हा त्यापेक्षा अधिक काही 'होम स्कूलिंग'मधून मुलांना द्यायचे असते तेव्हा मुलांच्याबाबतीत अधिक सतर्कता आवश्यक असते. 'होम स्कूलिंग'द्वारे शिक्षण घेतल्यानंतर भविष्यात व्यावहारिक जगात ही मुले स्पर्धेत कशी टिकतील याचाही विचार करणे क्रमप्राप्त असते, अशीही दुसरी बाजू अभ्यासकांकडून मांडली जाते.

शिक्षणाची अनेक स्तरांवर आज पुनर्रचना होत असताना आणि नवे शैक्षणिक धोरण राष्ट्रीय स्तरावर आपल्या देशात अवलंबले जात असताना 'होम स्कूलिंग'सारखे नवे पर्याय अनेकांना खुणावत आहेत. त्यांची उपयुक्तता वास्तवात किती आहे, या संदर्भातील मूल्यमापन व्यक्तिसापेक्ष असल्याने त्या विषयी ठोस विधान करता येत नाही. तरीही सध्याच्या काळात भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये या संकल्पनेविषयीचा ओढा वाढत असल्याची वस्तुस्थिती मात्र नाकारता येत नाही.

# नव-शिक्षण

## आधुनिक शिक्षणाचे नवे प्रारूप

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये जागतिक पातळीवर सध्या खूप वेगाने बदल घडताना दिसत आहेत. जागतिक स्तरावरची मनुष्यबळाची बदलती गरज आणि विद्यार्थी यांचा विचार करून हे बदल होत आहेत. या सगळ्या गरजांशी वेगाने जुळवून घेता यावे म्हणून आता सगळीकडेच 'डिजिटल' (अंकीय) विद्यापीठांचा उदय होऊ लागला आहे. जगातील अनेक मोठ्या देशांत याची सुरुवात अगोदरच झालेली असली तरी आता भारतातदेखील अशी अंकीय विद्यापीठे सुरू होऊ लागली आहेत. केरळ या राज्याने त्यात आघाडी घेत देशातील पहिले अंकीय विद्यापीठ सुरू केलेले आहे. त्यामुळे, नव्या शैक्षणिक धोरणाची देशात अंमलबजावणी होत असताना अंकीय विद्यापीठे हे आधुनिक शिक्षणाचे नवे प्रारूप ठरेल, अशी आशा शिक्षणक्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत.

'मुक्त विद्यापीठ' आणि 'अंकीय विद्यापीठ' या दोन्हींमध्ये संकल्पनात्मक फरक आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात अंकीय विद्यापीठे महत्त्वाची भूमिका बजावतील असे मानले जाते आहे.

अंकीय विद्यापीठ ही एक अशी संकल्पना आहे जिथे अत्याधुनिक अशा तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांना नवनवीन अभ्यासक्रम आणि उच्च गुणवत्तेचे शिक्षण मिळवून देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना सुलभ, दर्जेदार आणि उत्तम कौशल्य प्रदान करू शकणारे शिक्षण या माध्यमातून मिळू शकते. अंकीय विद्यापीठ या संकल्पनेंतर्गत प्रामुख्याने 'इंटरनेट' व संप्रेषण या तंत्रज्ञानांचा वापर करून विद्यार्थ्यांना आधुनिक काळातील गरजांशी सुसंगत असणारे अभ्यासक्रम त्यावर आभासी माध्यमातून उपलब्ध करून दिले जातात. विद्यार्थ्यांना स्वत:ला अद्ययावत ठेवणेही त्यामुळे सोपे होते. अंकीय विद्यापीठांमध्ये 'ऑनलाइन'च्या जोडीला गरजेनुरूप प्रत्यक्ष शिक्षणसुद्धा दिले जाते.

पारंपरिक विद्यापीठांपेक्षा आधुनिक काळात विकसित होणारी ही अंकीय विद्यापीठांची संकल्पना प्रभावी मानली जाते कारण तिचे प्रमुख लाभ पुढीलप्रमाणे आहेत.

**शिकण्याची आभासी सुविधा :** जे काही शिकायचे आहे ते सर्व अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना आभासी माध्यमातून उपलब्ध करून दिले जातात. त्यासाठी नव्या तंत्रज्ञानाची आवश्यक तिथे मदत घेऊन त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतील असाही प्रयत्न केला जातो. अधिकाधिक ताजी व नवीन माहिती या माध्यमातून विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न असतो.

**जगभरातील प्राध्यापकांकडून मार्गदर्शन :** शिक्षणाचे व्यासपीठ आभासी असल्याकारणाने विद्यार्थ्यांना जगभरातील उत्तमोत्तम प्राध्यापकांकडून थेट मार्गदर्शन मिळते. या आभासी तासिकेमध्ये विद्यार्थी प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसनदेखील करू शकतात. इतर पूरक आभासी संदर्भांचा वापर करून विद्यार्थी हवी असलेली सगळी माहिती मिळवू शकतात. त्यामुळे वैविध्यपूर्ण आणि सर्वसमावेशक असे वातावरण तयार व्हायला मदत होते.

**नव्या तंत्रज्ञानांची साथ :** आभासी वर्ग, आभासी व्यासपीठे, 'यू-ट्यूब'सारखे साहाय्यक या आणि अशा नव्या तंत्रज्ञानाची साथ घेऊन आता आभासी शिक्षण घेणे अधिक सोपे झाले आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानांचा समर्थ वापर अंकीय विद्यापीठांमध्ये अगदी आवर्जून केला जातो. विद्यार्थ्यांना त्यांची कौशल्ये आणि त्यांचे ज्ञान सतत विकसित करत राहण्याची संधी या नव्या तंत्रज्ञानामुळे प्राप्त होते.

**वेळेची बचत :** कोणत्याही पारंपरिक विद्यापीठात जाऊन कोणताही विषय शिकणे यासाठी जो प्रवास करावा लागतो त्यामध्ये विद्यार्थ्यांचा खूप वेळ दवडत असतो. सरासरी दोन ते तीन तास प्रवासातच जातात. त्यामुळे, जर हे शिक्षण अंकीय विद्यापीठाच्या माध्यमातून आभासी माध्यमांद्वारे देता आले तर विद्यार्थ्यांच्या वेळेची मोठी बचत होऊ शकते आणि तो वेळ ते अभ्यासासाठी देऊ शकतात. तासिका संपल्यानंतरसुद्धा जो मोकळा वेळ मिळतो त्यातही अनेकदा उगीचच वाया जाणारा वेळ अधिक असतो. त्या वेळेचीही बचत अशा प्रकारच्या शिक्षणामुळे होऊ शकते, असे अभ्यासकांचे मत आहे.

**जागतिक दर्जाचे सार्वत्रिक शिक्षण :** भारतात सध्या नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविले जाते आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे सूत्र त्यामध्ये केंद्रस्थानी ठेवण्यात आलेले आहे. वैयक्तिक अनुभवांसह विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे सार्वत्रिक शिक्षण मिळावे, हेदेखील एक महत्त्वाचे सूत्र यात अंतर्भूत आहे. ते

साध्य करण्यासाठी अंकीय विद्यापीठे हा एक सक्षम पर्याय ठरू शकतो, असे जगभरातील शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

**पायाभूत सुविधांवरील खर्च कमी :** पारंपरिक विद्यापीठे साकारताना त्यासाठी जमिनींची उपलब्धता ही एक अपरिहार्य अशी बाब असते. त्याचप्रमाणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांप्रमाणे आवश्यक त्या पायाभूत सुविधा साकारणे गरजेचे असते. त्या शिवाय विद्यापीठांना मान्यताच मिळत नाही. विविध विभागांची निर्मिती, आवश्यक कर्मचारी वर्ग, उत्तम अध्यापन करू शकणारे प्राध्यापक अशा सर्वांचीच आवश्यकता असते. मात्र, अंकीय विद्यापीठांमध्ये पायाभूत सुविधांवरील हा खर्च वाचतो. त्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर जागादेखील लागत नाही. त्यामुळे आधुनिक काळात हा एक सोयीचा व समांतर पर्याय ठरू शकतो, असे जाणकारांचे मत आहे.

**सहज सुलभ पर्याय :** आजकालचे जग हे अतिशय वेगवान झालेले आहे. त्यामुळे शिक्षणाचे सहज, सुलभ पर्याय विद्यार्थ्यांना हवे असतात. त्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अंकीय विद्यापीठे प्रदान करीत असल्याने त्यांचे महत्त्व येणाऱ्या काळात वाढण्याची शक्यता आहे. वेगवान 'इंटरनेट' आणि 'स्मार्ट फोन' या किमान गरजा भागवल्या तर अंकीय विद्यापीठांमध्ये आभासी शिक्षण कुठूनही घेता येऊ शकते. त्यामुळे कधीही, कुठेही अभ्यास करण्याची सुलभता अंकीय विद्यापीठांद्वारे प्राप्त होते, म्हणून विद्यार्थ्यांचा कल आभासी शिक्षणाकडे वाढतो आहे.

TECH हे जगातील सर्वांत मोठे अंकीय विद्यापीठ मानले जाते. या वैश्विक विद्यापीठाच्या माध्यमातून ११ प्रमुख भाषांमधील १४ हजारांहून अधिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांमधील कौशल्यांचा विकास करणारे व त्यांना रोजगारक्षम बनवणारे हे अभ्यासक्रम असून हे आभासी अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी बहुतांश विद्यार्थ्यांना नोकरी मिळतेच असा विद्यापीठाचा दावा आहे. जगभरातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे सहा हजारांहून अधिक अभ्यासू, जाणकार, विषयतज्ज्ञ या विद्यापीठामध्ये आपले योगदान देत आहेत व त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ जगभरातील, हजारो विद्यार्थी घेत आहेत. 'फोर्ब्ज' या जागतिक स्तरावरील विख्यात नियतकालिकानेदेखील 'जगातील सर्वोत्तम आभासी विद्यापीठ' म्हणून TECH चा गौरव केलेला आहे. आजच्या घडीला १५० देशांतील लाखो विद्यार्थी या अभ्यासक्रमांचा लाभ घेत आहेत. क्रीडाशास्त्र, विधी, शिक्षण, नर्सिंग, फार्मसी, शरीररचनाशास्त्र, माहिती-तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय, संज्ञापन आणि पत्रकारिता, पशुवैद्यकशास्त्र, 'व्हीडिओ गेम्स' तंत्रज्ञान अशा विविध विषयांवरचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना इथे शिकता येतात.

आधुनिक प्रारूपाचा स्वीकार करून भारतानेही अंकीय विद्यापीठे सुरू करण्यासाठी सकारात्मक पावले उचलली आहेत. याची सुरुवात झाली आहे ती केरळमधून. 'केरळ युनिव्हर्सिटी ऑफ डिजिटल सायन्सेस, इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी' या नावाने त्या विद्यापीठाची स्थापना करण्यात आली असून हे भारतातील पहिले अंकीय विद्यापीठ ठरले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानव्यशास्त्र या शास्त्रांत संशोधन आणि शिक्षण देण्यासाठी हे विद्यापीठ कार्यरत आहे. स्थापनेपासून गेल्या चार वर्षांत या अंकीय विद्यापीठाने चांगली कामगिरी केलेली असल्याने त्या धर्तीवर अशी अंकीय विद्यापीठे स्थापन करावीत, अशी मागणी देशातील अन्य राज्यांतूनही शिक्षणक्षेत्रातील अनेक जाणकारांकडून होते आहे.

अंकीय विद्यापीठांची ही नवीन संकल्पना भारतामध्ये रुजवताना तिचे जसे लाभ दिसत आहेत तशीच तिच्याशी संलग्न काही आव्हानेदेखील आहेत. त्यांचा विचार करून, त्यातून मार्ग काढूनच पुढे जाणे क्रमप्राप्त ठरणार आहे.

**पदवीचा दर्जा समान राहणार का? :** आभासी पद्धतीने दिले जाणारे शिक्षण व त्याद्वारे प्राप्त होणाऱ्या पदवीला पारंपरिक विद्यापीठांतून मिळणाऱ्या पदवीसारखाच समान दर्जा प्राप्त होणार आहे का, हा यातील एक कळीचा मुद्दा ठरणार आहे. कारण, त्यातून अंकीय विद्यापीठांमध्ये मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा सुनिश्चित होणार आहे. आजही आभासी पद्धतीने दिल्या जाणाऱ्या शिक्षणाला काहीसे कमी लेखण्याची भूमिका दिसते. आभासी पद्धतीने घेतले जाणारे शिक्षण तितकेसे गांभीर्याने घेतले जात नाही, असे मानणारा मोठा वर्ग शिक्षणक्षेत्रात आले. त्यामुळेच, उद्या अंकीय विद्यापीठांची संख्या राष्ट्रीय स्तरावर वाढत गेली तरी त्यांत शिक्षण घेऊन मिळणाऱ्या पदव्यांच्या दर्जाचे काय हा मुख्य मुद्दा राहीलच, असे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

**विद्यार्थ्यांवर व्यक्तिगत लक्ष :** सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण प्रदान करायचे तर शिक्षक- विद्यार्थी प्रमाण १:२० इतके असायला हवे असे मानले जाते. परंतु, जेव्हा अंकीय विद्यापीठांमध्ये आभासी पद्धतीने अभ्यास घेतला जाईल तेव्हा त्या आभासी वर्गांमध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येवर बंधन राहीलच असे नाही. अशा वेळी प्रमाणित संख्येपेक्षा अधिक विद्यार्थी एकाच अभ्यासक्रमात विविध ठिकाणांवरून सहभागी होऊ शकतील. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांकडे व्यक्तिगत पातळीवर लक्ष देणे शिक्षकांना कितपत शक्य होईल, अशी शंका जाणकारांकडून वर्तवली जाते आहे.

**'इंटरनेट कनेक्टिव्हीटी'ची समस्या :** देशाच्या अनेक भागांमध्ये आजही 'इंटरनेट कनेक्टिव्हिटी' ही एक गंभीर समस्या आहे. अनेक दुर्गम भागांत जिथे शिक्षणाची

गंगा पोहोचणे आवश्यक आहे तिथे 'इंटरनेट' सुविधा असेल तर आभासी वर्गांच्या माध्यमातून अंकीय विद्यापीठे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. परंतु, तिथे 'इंटरनेट'चा वेग पुरेसा नसल्याने आभासी शिक्षण घेताना अनेक अडथळे येतात. त्यामुळे अंकीय विद्यापीठांपुढील ते एक महत्त्वाचे आव्हान ठरते आहे.

**नोकरी मिळण्याची अशाश्वती**

अंकीय विद्यापीठांमध्ये शिक्षण घेतल्यानंतर प्रत्यक्ष 'करिअर'मध्ये त्या शिक्षणाचा किती उपयोग होईल या विषयी अद्यापही साशंकता व्यक्त केली जाते आहे. सद्य:स्थितीत आभासी अभ्यासक्रम उपलब्ध करून देणाऱ्या अनेक शिक्षणसंस्था कार्यरत आहेत. आभासी शिक्षणामुळे संबंधित विषयाचा अभ्यास होऊ शकेल परंतु प्रत्यक्ष नोकरी मिळवताना त्या प्रमाणपत्राचा उपयोग होईल का, या विषयी मात्र अनेकांच्या मनात अजूनही शंका आहेत. त्यामुळे या प्रवासातील तेदेखील एक महत्त्वाचे आव्हान ठरणार आहे.

अंकीय शिक्षणाकडे लोकांचा कल जगभरात विविध कारणांनी वाढतो आहे. त्यामुळे आगामी काळात पारंपरिक विद्यापीठांपेक्षा अंकीय विद्यापीठे वाढत गेल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. भारतातदेखील आभासी शिक्षणाचा प्रसार वेगाने होत असल्याने विविध प्रमुख शहरांत अंकीय विद्यापीठे सुरू होऊ शकतील, असा शिक्षणक्षेत्रातील जाणकारांचा विश्वास आहे. आधुनिक शिक्षणाचे एक प्रभावी प्रारूप म्हणून अंकीय विद्यापीठांकडे पाहिले जाते आहे. ■■

---

# *चिंतन!*

***(पान ४ वरून)*** डॉ. भवाळकर यांचे विवेचन, त्यांमुळेच, या कल्पित द्वंद्वाचे फोलपण उलगडून मांडणाऱ्या रोचक-वेधक तपशीलांनी सजलेले आहे. विलक्षण नजाकतीने, आपल्या अध्यक्षीय भाषणात, डॉ. भवाळकर यांनी, प्रचलीत समाजकारणात प्रविष्ट होत असलेल्या एका विशिष्ट विचारसरणीच्या आक्रमक, एकारल्या, वर्चस्ववादी आणि लिंगभावाधारित भेद-द्वंद्वांना पोषक शाबीत होणाऱ्या सत्ताकांक्षी प्रवृत्तींपायी आपल्या समाजाच्या संस्कृतीची बहुविध अशी पारंपरिक वीण उसवली जाण्याच्या गंभीर धोक्याकडे प्रगल्भपणे सगळ्यांचे लक्ष वेधलेले आहे. मुळात, संस्कृतीचा प्रवाह अनादी अनंत असतो आणि तो अखंड वाहत राहतो. 'जन-संस्कृती' आणि 'अभिजन संस्कृती' हे त्याच प्रवाहाचे दोन टप्पे

अथवा स्तर होत, हे वास्तव डॉ. भवाळकर त्यांच्या विश्लेषणादरम्यान आवर्जून नमूद करतात. समाजजीवनात हे टप्पे अथवा स्तर एकाच वेळी समांतर विद्यमान असतात. त्यांमुळे, लोक-संस्कृतीच्या या दोन स्तरांमध्ये जणू काही द्वैताची अभेद्य अशी उभी भिंत आहे इतकेच केवळ नाही तर त्या दोहोंत नांदणारे नाते श्रेष्ठ-कनिष्ठ भावाचे असते, या समजुतीचे वैय्यर्थ डॉ. भवाळकर समर्पक उदाहरणांनी अधोरेखित करतात.

एकाच लोकसंस्कृतीच्या 'जन-संस्कृती' आणि 'अभिजन-संस्कृती' या दोन अवतारांमध्ये सातत्यशील अशी बहुमिती देवाणघेवाण गतिमान असते आणि अशी देवाणघेवाण संस्कृतीच्या या दोन्ही अंगांना केवळ पूरकच नव्हे तर, परिपुष्ट बनवणारी असते, हा डॉ. भवाळकर यांच्या प्रतिपादनाचा गुरुत्वमध्य होय. 'लोकसंस्कृती'चे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे हे या भूमिकेचे आद्य उद्‌गाते. किंबहुना, डॉ. भवाळकर यांचे बहुतांश विवेचन डॉ. ढेरे यांनी पूर्वीच प्रगट करून ठेवलेल्या विचारसंचिताला अनुसरणारे असे आहे. आता, मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा शासकीय पातळीवरून औपचारिक अधिकृततेने बहाल करण्यात आलेला असल्यामुळे, त्या पार्श्वभूमीवर, 'अभिजात' म्हणजे नेमके काय, 'अभिजात' कशाला म्हणायचे, 'अभिजात भाषा' म्हणजे 'अभिजनांची भाषा' असे जर समीकरण मांडले जात असेल अथवा जाणार असेल तर, 'अभिजन' तरी कोणाला म्हणायचे, भाषेचा 'अभिजात' स्तर आणि समाजातील 'अभिजन वर्ग' हा स्वायत्त स्वयंभूपणे निरालंब साकारत असतो का... असे काही अतिशय मूलभूत प्रश्न डॉ. भवाळकर यांनी त्यांच्या विवेचनादरम्यान उपस्थित केलेले आहेत.

'जन-साहित्य' आणि 'अभिजन-साहित्य' या कल्पित द्वंद्वाच्या पोटात लिंगभावाधारित एक उप-द्वंद्वही पूर्वापारच नांदत आलेले आहे. जात्यावरील ओव्या, स्त्री-गीते, उखाणे, म्हणी, पारंपरिक सणांदरम्यान गायली जाणारी स्त्रियांची गाणी तसेच अभंगांद्वारे अभिव्यक्त होणाऱ्या स्त्री-मनाच्या जाणिवा-संवेदनांच्या आजवर झालेल्या (अथवा जाणीवपूर्वक केल्या गेलेल्या) उपेक्षेकडे डॉ. भवाळकर, मराठी संतपरंपरेतीलच केवळ नव्हे तर, एकंदरच भारतीय संतपरंपरेतील स्त्री-संतांच्या उद्‌गारांद्वारे व्यक्त होणारी प्रगल्भता अधोरेखित करत, आपले लक्ष वेधतात. 'सीताकांतस्मरण जय जय राम' अथवा 'पार्वतीपते हर हर महादेव' यांसारख्या पारंपरिक गजर-घोषांद्वारे आपल्या दैवतमंडलातील स्त्री-पुरूष तत्त्वांच्या लिंगभावाधारित समता-सन्मानदर्शक उद्‌घोषाची जागा, केवळ पुरूषतत्वाचाच काय तो जयनाद

उच्चरवाने करण्याद्वारे, समाजमनामध्ये आज घडून येत असलेल्या (अथवा,पद्धतशीरपणे घडवून आणल्या जात असलेल्या) सूक्ष्म परिवर्तनात अनुस्यूत असलेला विकारी व अनिष्ट अंश डॉ. भवाळकर दक्षपणे निर्देशित करतात.

विचारसरणी आणि तिच्याद्वारे प्रसृत होणारी मूल्ये यांत काळाच्या विविध टप्प्यांवर बदल होत राहणे, हा निसर्गदत्त न्यायच होय. त्या प्रक्रियेला आता तंत्रशास्त्रीय बदलांच्या झंझावाताने गतिमानतेचे आणखी एक परिमाण जोडले गेलेले आहे. फोन अथवा 'ई-मेल' यांसारख्या आधुनिक तंत्रोपकरणांनी संदेशवहनाच्या प्रांतात अभूतपूर्व अशी क्रांती घडवून आणत माहितीचे आदानप्रदान होणाऱ्या वेगात अप्रतिहत अशी वाढ साध्य केली. भौगोलिक अंतर आणि काळ यांच्या मर्यादांचा संकोच करत, मानवी मनामध्ये उमटणाऱ्या विचारलहरींचे वहन-प्रसारण सर्वदूर जारी राखणाऱ्या या तंत्रशास्त्राने, ज्ञान आणि माहितीच्या देवाणघेवाणीद्वारे एकंदरीने सर्वत्रच विचारशीलतेला चालना आणि खाद्य पुरविण्याचे महत्कार्य पार पाडले. परंतु, तंत्रशास्त्रीय प्रगतीच्या त्याच प्रांतात नव्याने अवतरलेल्या 'कृत्रिम बुद्धिमत्ता'नामक (आर्टिफिशियल इन्टलिजन्स - एआय) पुढच्या पावलाने, आता, मानवी मनाच्या विचारशीलतेचाच घास घेण्याचा पवित्रा प्रगट करत त्याचे अक्राळविक्राळ भस्मासुरी भेसूरपण उघड केले आहे. विचार करण्याची क्षमता हे मानवमात्रांचे अ-साधारणत्वच जर यंत्र-तंत्र लंपास करणार असेल तर, उत्क्रांतीच्या प्रवासात गळून पडलेल्या शेपटाप्रमाणे, सर्जक अशी मानवी बुद्धीदेखील पुरेशा वापरापायी विलय पावून, परिणामी, 'भय-निद्रा-मैथुन' या त्रिविध प्रेरणांमध्येच रममाण राहणारी वरकड प्राणिसृष्टी आणि मानव यांतील सीमारेषा अस्तंगत पावण्याचा धोका आपल्याला हालवून सोडत नाही का, अशा आशयाचा विलक्षण मूलभूत प्रश्न उपस्थित करत डॉ. भवाळकर सगळ्यांनाच विचारप्रवण बनवतात.

दोन कमी शंभराव्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदावरून बोलतेवेळी डॉ. भवाळकर यांनी व्यक्त केलेले विचार आपल्या सगळ्यांनाच चिंतनप्रवण बनवणारे ठरतात. विस्तारभयाचा धोका स्वीकारूनही 'अर्थबोधपत्रिके'च्या या जोडअंकात, म्हणूनच, त्यांचे विवेचन इथे विस्तृत मांडलेले आहे. अंकातील अन्य लेखनही अशाच अन्य काही चिंतनीय पैलूंकडे लक्ष वेधणारे असेच आहे. एखाद्या अंकात काही योगायोग सहजगत्याच जमून येतात हेच खरे!

# पुरवणी

## ‘भाषा ही मानीव संकल्पना’!

■ डॉ. तारा भवाळकर

नमस्कार... दोन कमी शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या साहित्यिक उत्सवानिमित्त आपण येथे जमलेलो आहोत.

गेली ९७ वर्षे एखादा अपवाद सोडता दर वर्षी हा साहित्य उत्सव साजरा होत आलेला आहे. प्रारंभी ‘ग्रंथकार संमेलन’ अशा नावाने हा सुरू झालेला साहित्य उत्सव, आपल्या विस्तृत कक्षांना सामावून घेणाऱ्या ‘साहित्य संमेलन’ या अन्वर्थक नावाने आता साजरा होतो आहे, याचा सर्वांनाच आनंद आहे. यंदाच्या संमेलनाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये प्रारंभीच नोंदविणे मला आवश्यक वाटतं.

पहिली बाब म्हणजे हे संमेलन देशाच्या राजधानीत भरत आहे. याचे उद्घाटक देशाचे सन्माननीय पंतप्रधान आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे मराठी भाषेला ‘अभिजात भाषे’चा दर्जा मिळावा म्हणून मराठी भाषकांची, साहित्यिकांची, विचारवंतांची दीर्घकाळची खटपट आणि प्रयत्न फलद्रूप झालेले आहेत.

हे संमेलन ज्या ठिकाणी होत आहे, ते तालकटोरा ठिकाणही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अभिमानाची खूण आहे. प्राचीन काळापासून मराठी माणूस निरनिराळ्या कारणांनी अक्षरश: जगभर संचार करीत आलेला आहे. त्या तपशिलात न जाता तालकटोराबद्दल थोडक्यात बोलायचं झालं तर इ.स. १७३५ मध्ये राणोजी शिंदे आणि मल्हारराव होळकर या उमद्या मराठी लढवय्यांच्यासह बाजीराव पेशवे यांनी उत्तरेकडे मुघल प्रांतात चौथाई वसुलीसाठी स्वाऱ्या केल्या. दिल्लीवर आक्रमण केले. त्या वेळी बाजीराव आपल्या सैन्यासह तालकटोरा येथे छावणी टाकून राहिलेले होते. त्या तालकटोरा येथे हे मराठी संमेलन भरत आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने महाराष्ट्राबाहेर फार कमी झालेली आहेत. त्यातही देशाच्या राजधानीत होणारे हे अवघे दुसरेच संमेलन आहे. महाराष्ट्रातीलच नव्हे तर जागतिक कीर्तीचे विद्वान, ‘विश्वकोश’ या अद्वितीय प्रकल्पाचे

संपादक, अनेक विद्वन्मान्य ग्रंथाचे लेखक, परंपरा आणि आधुनिकता यांचा सम्यक अभ्यास आणि विचार करणारे आणि स्पष्टपणे आणि परखडपणे तो मांडणारे लोकोत्तर विचारवंत आदरणीय लक्ष्मणशास्त्री जोशी, ७० वर्षांपूर्वी दिल्लीत झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्या वेळेचे भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे उद्घाटक होते आणि महाराष्ट्रातील केंद्रीय मंत्री मा. काकासाहेब गाडगीळ हे स्वागताध्यक्ष होते. या सर्वांचे या प्रसंगी सादर स्मरण होत आहे.

मराठी भाषेला 'अभिजात' म्हणून शासनमान्यता मिळाली याचा सर्व मराठी भाषिकांप्रमाणे मलाही आनंद झाला. शासकीय दर्जा मिळाल्याने काही आर्थिक लाभ महाराष्ट्राला, मराठी लेखक, कवी, संशोधक आणि महाराष्ट्रातील साहित्यिक उपक्रम राबवणाऱ्या संस्थांना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मराठी संस्थात्मक पातळीवर, विद्यापीठीय पातळीवर भरीव कार्य करेल आणि करावे अशी अपेक्षा आहेच. त्याची किती पूर्तता होते हे येणारा काळ ठरवील. अर्थात त्यासाठी मराठी जनांची सर्वतोपरी प्रयत्न करण्याची तयारी पाहिजे आणि ती अपेक्षा आहे. ही अपेक्षा बाळगत असताना काही धोक्याचे लाल बावटेही समोर फडकत आहेत. 'भाषा' आणि 'संस्कृती' या सजीव संस्था आहेत. भाषेचे चलन जोपर्यंत समाजात सर्वसामान्य माणसांच्या व्यवहारात, आचरणात ज्या प्रमाणात असेल त्या प्रमाणात


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

भाषा विकासाची शक्यता असते. भाषेद्वारा सांस्कृतिक अभिव्यक्ती होत असते, अर्थात मराठी संस्कृतीचे भवितव्यही भाषिक चलनी बांधलेले आहे.

आता माझ्या वयाचे जवळजवळ शतक पार करत असताना सामाजिक क्षेत्रात आणि विशेषत: शिक्षण क्षेत्रात सजगपणे दीर्घकाळ वावरणारी एक भारतीय व्यक्ती म्हणून मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल मला साधार साशंकता वाटते. जो समाज उच्च शिक्षित, आर्थिकदृष्ट्या काहीसा स्थिरस्थावर झालेला असतो, ज्याची आकांक्षा सर्व स्तरांवर जागतिकतेशी स्पर्धा करण्याची असते, तो अभिजनांचा एक महत्त्वाचा स्तर आहे. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये, यंत्रयुगोत्तर काळामध्ये आणि विशेषत: आता तंत्र-वैज्ञानिक युगाच्या काळामध्ये त्याची संख्या चढती-वाढती आहे. अशा काळात सर्वसामान्यांच्या मराठीचे काय होणार, अशी शंका मनाला साधार भेडसावते आहे. कारण मराठीला जो 'अभिजात' दर्जा मिळाला त्याच्यासाठी दीर्घकाळ प्रयत्न झाले, आमच्या आधुनिक विद्वानांनी त्याच्याबद्दल संशोधनात्मक अक्षरश: शेकडो पानी अहवाल सादर केले. पण त्याच्याआधी जवळजवळ मध्ययुगापासून आमच्या लेखक, कवींच्या मनामध्ये मराठीला हवा तो दर्जा मिळत नाही याबद्दल खंत असे. त्याच्यामध्ये आमचे संत, निरनिराळ्या पंथांचे आचार्य यांचा समावेश होता. म्हणजे ही इतकी जुनी गोष्ट आहे की, माझ्या मते सुरुवातीचे जे भक्तिपंथ होते, त्यांच्यामध्ये महानुभाव हा एक महत्त्वाचा भक्तिपंथ होता. त्याच्याही आधी सातवाहन राजाच्या काळामध्ये काही लेखन होत होते. विशेषत: 'गाथासप्तशती'सारखे..., आणि 'गाथासप्तशती'मधून-सुद्धा जो मराठी व्यवहार आहे, मराठी जीवन आहे त्याचे अतिशय बारकाईने वर्णन केलेले होते. जात्यावरच्या ओव्या बायका म्हणत असत आणि शेतातली कामं करीत असत अशी वर्णने 'गाथासप्तशती'मध्ये केलेली आहेत.

आज मी बऱ्याच वेळेला जात्यावरच्या ओव्या सांगते तेव्हा लोकांना आश्चर्य वाटतं पण त्याच्या आधीही जात्यावरची ओवी आहे- म्हणजे जैन प्राकृतामध्ये बायका दळताना आणि कांडताना गाणी म्हणत होत्या याचे उल्लेख आहेत- आणि त्याच्यामध्ये त्यांनी असं म्हटलेलं आहे की, 'कांडपिनी' म्हणजे कांडप करणाऱ्या बायका, 'कांडपिनी', जई कुट्टीनी, विस्सरम् गायंती, तत हत हिदया, तुम किम् आकुली भवसि' अशा ओव्या गात असत. याचा अर्थ ''हे माझ्या हृदया, ज्या वेळेला कांडपिनी अतिशय व्याकुळ स्वरामध्ये गाणी म्हणतात तेव्हा माझ्या हृदया तू का बरं व्याकुळ होतोस?'' याचा अर्थ बायका जी गाणी म्हणत होत्या श्रम करताना ती व्याकुळ करणारी गाणी होती. हे जैन प्राकृतामध्ये म्हटलेलं आहे. म्हणजे

आधुनिक मराठीची आधीची जी अवस्था आहे प्राकृताची त्यात आणि निरनिराळ्या प्राकृतांमध्ये जैन प्राकृत आणि उद्योदन सुरीचे ग्रंथ हे महत्त्वाचे मानले जातात ही इतकी जुनी गोष्ट आहे.

महानुभाव वाङ्मय तर ज्ञानेश्वरांच्या आधी थोडा काळ आहे म्हणजे इसवी सनाच्या ११व्या – १२व्या शतकात. ज्ञानेश्वर इसवी सनाच्या १३व्या शतकाच्या शेवटचे! आपण इतिहासाचा हा क्रम लक्षात घेतला पाहिजे. कारण हे काहीही लक्षात न घेता बऱ्याच वेळेला शेरेबाजी केली जाते आणि इतिहासाचा जो सगळा टप्पा आहे तो लक्षात घेऊन ज्याला 'तौलनिक' म्हणता येईल त्या तौलनिक पद्धतीने विचार केला पाहिजे. तर आमच्या महानुभाव पंथियांमधले जे नागदेवाचार्य होते जे आचार्य चक्रधरांचे शिष्य होते त्यांच्या काळामध्ये काही संस्कृत पंडितही होते, कारण प्रत्येक पंथामध्ये संस्कृत पंडित असतातच. आता आपल्या वारकरी पंथामध्येसुद्धा ज्ञानेश्वरमहाराज आणि एकनाथमहाराज संस्कृतचे चांगले जाणकार होते, तसे महानुभाव पंथामध्येसुद्धा होते. आणि त्या वेळेला कावदेव नावाचा एक संस्कृतचा जाणकार होता, तो चक्रधरांचे तत्त्वज्ञान अतिशय रसाळपणे पण संस्कृतात सांगायला लागला. त्या वेळेला नागदेवाचार्यांनी सांगितले, 'नको गा कावादेया। तुमचा अस्मात्, कस्मात् नेणेचिगा। (तू हे जे काही आस्मात् कस्मात् संस्कृत बोलतोयेस ते आम्हाला कळत नाही) येणे माझी म्हातारिया मराठीया नागवतील की।' (कारण तू असं संस्कृत बोलायला लागला, तर सर्वसामान्य मराठी माणसं यांना ते समजणार नाही) 'म्हातारिया मराठीया' म्हणजे सर्वसामान्य मराठी माणसं. 'म्हातारा' हा शब्द 'वृद्ध' या अर्थाने वापरला जात नव्हता.

परंतु ही आमची बोलण्याची शैली आहे, हा मराठीचा व्यवहार आहे, ही मराठी जनांमध्ये चालत आलेली मराठी भाषा आहे. तेव्हा 'माझी मराठीया नागवतील की,' सर्वसामान्य ज्येष्ठ माणसांसाठी 'म्हातारी' हा शब्द होता, तर ते नागवतील, 'त्यांना काही कळणार नाही रे आणि मग तुझ्या पांडित्याचा उपयोग काय आहे?' सर्वसामान्य माणसापर्यंत जर ते पांडित्य पोहोचलं आणि त्याचा उपयोग झाला तर! म्हणून तुझ्या पांडित्याचा उपयोग व्हावा असं जर तुला वाटत असेल तर, ''श्रीचक्रधरे निरुपिली मराठी। तियेची पुसा।'', श्रीचक्रधरांनी जी मराठी सांगितली तिच्यातून तू बोल, काय तुला बोलायचे आहे ते, 'अस्मात्-कस्मात्'मध्ये बोलू नको! म्हणजे आज जसं जे स्वत:ला शहाणे समजणारे लोक, विद्वान समजणारे लोक एकदम इंग्रजीत फाड्फाड् सुरू करतात आणि फाड्फाड् इंग्रजीमध्ये बोलणं म्हणजे जणू

काही आपली विद्वत्ता आणि आपली प्रतिष्ठा ही सिद्ध होते असं मानतात तसेच. एक टप्पा असा होता की तो मान संस्कृतला होता आणि इसवी सनाच्या ११-१२व्या-१३व्या शतकामध्ये ही परिस्थिती होती की, संस्कृतमध्ये ग्रंथरचना करण्यामध्ये, बोलण्यामध्ये, वादविवाद करण्यामध्ये प्रतिष्ठा होती. सर्वसामान्य माणसांना जर ते शहाणपण शिकायचं असेल तर सर्वसामान्य माणसांची जी भाषा आहे, बोलीभाषा जी आहे त्या बोलीभाषेमध्ये व्यवहार झाले पाहिजेत असा आग्रह त्या वेळच्या काही विद्वानांचा होता. ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट. आणि म्हणून त्यांनी सांगितले की हा व्यवहार सामान्य माणसांच्या भाषेमध्ये व्हावा. नाहीतर मग ज्ञानेश्वरांना मराठीमधून 'ज्ञानेश्वरी' सांगायची गरज काय होती? ते संस्कृतामध्ये भाष्य करू शकले असते. इतर अनेकांनी भगवत्‌गीतेवर भाष्ये केली त्याप्रमाणे. किंवा एकनाथमहाराजांनी 'भावार्थ रामायण' आणि 'एकनाथी भागवत' हे मराठीमध्ये का रचले असते? ते संस्कृतमध्ये करू शकले असते. परंतु एकनाथमहाराजांनी नुसतीच भागवताची रचना केली नाही, नुसतीच अभंगांची रचना केली नाही तर लोकशैलीमध्येही रचना केल्या. 'भारुड' म्हटलं की आपल्याला एकनाथमहाराजांचं भारुड आठवतं. भारुड करणारे जे पारंपरिक लोककलावंत आहेत ते आजही प्रतिष्ठेचं म्हणून नाथांचं भारुड सादर करीत असतात. नाथांच्या भारूडामध्ये जी लकब आहे, जी शैली आहे- म्हणजे अभिजात मराठीमध्ये बोलायचं झालं तर जो 'फ्लेवर आहे- तो 'फ्लेवर' नाथांच्या भारुडामध्ये आहे. नाथांनी भारुडं रचली.

संतांनी काय केलं, की जे आपल्या रचनेचे छंद आहेत ते लोकपरंपरेतले छंद उचलले. 'ओवी' हा लोकपरंपरेतला अतिशय सुगम आणि सोपा छंद आहे. जी ओघाओघात येते ती ओवी, बोलताबोलता येते ती ओवी, शब्द होता होता येते ती ओवी- मग ती बाळाला झोपवायची असू दे, जात्यावरची असू दे, सडा-सारवण करायच्या बायकांच्या ओव्या असू दे- एकनाथमहाराजांची ओवी वेगळी, ज्ञानेश्वरमहाराजांची ओवी वेगळी, तिला निरनिराळी नावे दिली. मग त्यांचं वर्गीकरण केलं की काही साडेतीन चरणी, साडेचार चरणी, पाच चरणी, तीन चरणी, अडीच चरणी वगैरे... परंतु ही ओवीच. आणि सर्व संतांनी ओवी या छंदामध्ये रचना केली. आपण अभंग म्हणतो तो अभंग म्हणजे तरी काय, तीन ओव्यांचा एक तुकडा की ज्याच्यामध्ये एक विचार, एकच भावना व्यक्त केलेली असते. तेव्हा संतांनी ज्या रचना केल्या त्या लोकशैलीमध्ये केल्या कारण त्या सामान्य शैली आहेत. अक्षरगणवृत्ताच्या गोंधळामध्ये ते पडले नाहीत. कारण ती पंडिती परंपरा वेगळी

आणि ही लोकपरंपरा वेगळी. एकाच वेळेला पंडिती परंपराही चालू आहे आणि लोकपरंपराही चालू आहे आणि ज्यांना आपण विद्वान मंडळी म्हणतो ती एकनाथमहाराजांच्यासारखी आणि ज्ञानेश्वरमहाराजांच्यासारखी ही सर्वसामान्य माणसांच्या बोलीमध्ये, भाषेमध्ये रचना करत होती. म्हणून आपल्याकडे आजही म्हटलं जातं की, ज्ञानेश्वरांनी प्राकृतमध्ये 'ज्ञानेश्वरी' सांगितली. आपण त्याला 'जुनी मराठी' म्हणतो, त्या जुन्या मराठीला 'प्राकृत मराठी' म्हटलेलं आहे. मराठी भाषेचा जो आपण अभ्यास करत असतो महाविद्यालयामध्ये तिथे मराठी भाषा कशी निर्माण झाली त्याचे टपे सांगितलेले असतात– संस्कृतमधून अपभ्रष्ट भाषा निर्माण झाल्या मग त्याच्यातनं प्राकृत भाषा निर्माण झाल्या मग निरनिराळ्या प्राकृतांमधून निरनिराळ्या आधुनिक बोली निर्माण झाल्या– असे. भारतामध्ये ज्या प्राकृत बोली होत्या त्याच्यामध्ये 'महाराष्ट्री' ही प्राकृत आहे, शौरसेनी प्राकृत आहे, मागधी आहे, अवधी आहे. अवधी आणि मागधीमधून उत्तरेकडच्या संतांनी रचना केलेली आहे. कबीरदासजींनी आणि मलूकदासजींनी आणि आपल्याकडच्या संतांनी या छंदांमध्ये रचना केलेली आहे. ओवी, अभंग या छंदांमध्ये रचना केलेली आहे. लोकपरंपरेमध्ये असलेले छंद हे संतांनी वापरलेले आहेत आणि त्याला प्राकृत म्हटलेलं आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांची वचनं आता आपण वारंवार सांगतो की– ''अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके मेळवीन।।'' इतकेच कशाला एकनाथमहाराजांनी म्हटलेलं आहे, ''संस्कृत भाषा देवें केली। प्राकृत काय चोरापासोनि जाली।।'' ती काय चोरांनी केली, ती देवांनीच केलेली आहे ना! ''संस्कृत भाषा गोड वाणी'' तिला आम्ही नावं नाही ठेवत. तिला आम्ही हलकी नाही मानत. ती गोड आहे, चांगली आहे. 'संस्कृत भाषा गोड वाणी, जैसे खोल आडातील पाणी। परि ते दोर पात्रावाचूनी आर्त जना केवि मिळे।' सर्वसामान्य माणसांना ते कठीण आहे, ते सुगम करून सांगितले पाहिजे, ते कसे मिळेल? तर मराठीतून! फार कशाला, परदेशी लोक ज्या वेळेला भारतामध्ये आले आणि भारतामधल्या सामान्य माणसांच्यामध्ये त्यांना त्यांच्या विचारांचा प्रसार करायचा होता, भले धर्माचाही प्रचार करायचा असेल, तर त्यांना सामान्यांची मराठी शिकणे त्यासाठी भाग पडले.

गोव्यामध्ये पोर्तुगीज आले आणि तेथे फादर स्टीफन्ससारखा माणूस आला आणि मग तो 'ज्ञानेश्वरी'च्या शैलीमध्ये मराठीचं वर्णन करू लागला. ''जैसी पुस्पामाजी पुस्प मोगरी। की परिमळांमाजी कस्तुरी, तैसी भासामांजी, साजिरी भासा मराठी।।'' असं एक ख्रिचन धर्मगुरू म्हणतो, पोर्तुगालमधून आलेला आणि त्यांनी मराठीचं जसं

सगळं वर्णन केलेलं आहे ते फार महत्त्वाचं आहे. आमच्याकडचे लोक मग नंतर धर्मांतर करून ख्रिस्ती झाले, पण ख्रिस्ती झाल्यानंतरसुद्धा त्यांनी ख्रिस्तांच्यामध्ये नेलं काय? तर पुन्हा मराठी लोकशैली नेली. म्हणजे रेव्हरंड नारायण वामन टिळक हे ख्रिस्ती झाले आणि मंदिरांमध्ये म्हणजे चर्चमध्ये त्यांनी मराठीतून भजनं आणि कीर्तनं सुरू केली. म्हणजे येशू ख्रिस्तावरच्या कथा त्यांनी कीर्तनशैलीत सांगायला सुरुवात केली. आपल्याकडे राम–कृष्णांच्या कथा कीर्तनकार सांगतात त्याप्रमाणे! त्यामुळे ही जी देवाण–घेवाण आहे. परभाषिकींशी देवाण–घेवाण, परधर्मीयांशी देवाण–घेवाण ज्या वेळेस झाली त्या वेळेला सगळ्यांना इथल्या देशी भाषेचा आश्रय घेणं भाग पडलं. कारण सर्वसामान्य माणसांच्यापर्यंत पोहाचायचं असेल तर त्यांना हे भाषेद्वारे करणे आवश्यक होतं. आणि त्यामुळे महाराष्ट्रामध्ये किंवा भारतामध्ये ज्या वेळेला यंत्रयुग आलं. युरोपीय लोकांनी आणलं, छपाईची यंत्रं आणली त्या वेळेला मराठीतले अतिशय महत्त्वाचे ग्रंथ या युरोपीय मंडळींनी प्रथम छापले. मराठीतलं पहिलं व्याकरण हे मिशनऱ्यांनी छापलं, मराठीतला बृहद्कोश मोल्सवर्थचा हा युरोपीय लोकांनी मराठीत छापला. त्यामुळे नुसता फादर स्टीफन्स ओव्यांतून कौतुक करून थांबला नाही. मराठी मनांच्यामधे जागा करायची असली तर त्या भाषेच्या माध्यमातून गेलं पाहिजे याचं भान या सगळ्यांना होतं. फार कशाला आपल्याकडचे जे युरोपीय गव्हर्नर आले आणि त्याच्यापेक्षा त्या भागातले कलेक्टर, तर त्या कलेक्टरांना त्या त्या प्रदेशातली भाषा शिकणं हे अनिवार्य होतं. आणि त्यांनी त्या त्या प्रदेशातल्या भाषा शिकून, तिथली जी स्थानिक माहिती होती, त्या स्थानिक भाषेमध्ये ती माहिती एकत्र करून छापायला सुरुवात केले. ‘गॅझेटियर’ असं म्हणतात त्याला आणि या युरोपीय मंडळींच्या काळात सगळ्या प्रांतांतल्या कलेक्टरनी ही गॅझेट्स अतिशय चांगल्या रीतीने केली.

मी ज्या वेळेला सबंध भारतभर हिंडले, लोककलांचा अभ्यास करण्यासाठी, तेव्हा त्या त्या ठिकाणी मला जर सगळ्यात मोठी मदत कुठली झाली असेल तर त्या त्या ठिकाणच्या गॅझेटची मदत झाली. आज ती गॅझेट्स तेवढ्या साक्षेपाने छापली जातात की नाही, मला माहिती नाही. परंतु त्या काळात त्या कलेक्टरच्या अखत्यारीमध्ये जो भूप्रदेश असेल त्या प्रदेशातलं गावन्‌गाव, तिथली मंदिरं, तिथले उत्सव, ते कुठल्या काळात होतात, का होतात, तिथल्या प्रमुख जातीजमाती कुठल्या, चालीरीती, रुढी कशा आहेत त्या सगळ्यांच्या नोंदी या मंडळींनी केल्या आणि त्या सामान्य माणसाच्या जीवनातल्या नोंदी आहेत. ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे

आपल्याच देशामध्ये जर आपलं काय असेल हे शोधायचं असेल तर मला या गॅझेट्सची मदत खूप मोठ्या प्रमाणावर त्या काळामध्ये झाली आणि आजही कदाचित होत असेल, मला माहीत नाही. आपल्या देशातल्या विविध भाषांतील लोककथा व लोकगीतांची संकलने प्रथम युरोपीय लोकांनी केली. त्या आधी संस्कृतमध्ये लोककथांची संकलने होती. 'कथासरित्सागर' किंवा 'हितोपदेश' इ. तर हा जो सगळा व्याप आहे, भाषेचा.. ती भाषेची देवाण-घेवाण एकारले पद्धतीने होत नाही. उभयपक्षी त्याच्यासाठी एक तयारी असावी लागते आणि मग ती तुमची प्रांत, धर्म याच्या पलीकडे असते. आणि म्हणून आजही ज्याला आपण 'सीमाप्रदेश' म्हणतो, ते कुठलेही सीमाप्रदेश घ्या, त्या सीमाप्रदेशातली जी भाषा असते, नुसतीच भाषा नाही समग्र संस्कृती- तिची संमिश्रता असते- ती सीमाप्रदेशात दिसते. कारण आता पुन्हा 'संस्कृती' म्हणजे काय तर, संस्कृती ही कुणी तरी एका धर्मगुरूंने किंवा एखाद्या विद्वानांने सांगितली आणि मग ती प्रसारित झाली अशी होत नाही. ही एक नैसर्गिक, जैविक प्रक्रिया आहे भाषेसारखीच.

माणूस जेव्हा केव्हा जन्माला आला असेल विश्वामध्ये तेव्हापासून तो आपल्या भोवतालच्या वातावरणातून बऱ्याच गोष्टी शिकत आला आहे. चाली, रीती, रुढी या तिथल्या निसर्गांने त्याला शिकवल्या आणि त्याच्या गरजांनी, हवामानांने शिकवल्या, हे सगळं निसर्ग माणसाकडून करून घेत आलेला आहे आणि माणूस त्या निसर्गाला सादप्रतिसाद देत आला आहे. त्याच्या ज्या भावना निर्माण झाल्या, त्याच्या श्रद्धा निर्माण झाल्या, त्याचे आचरण निर्माण झाले, त्याची घरे निर्माण झाली, त्याचं बोलणं निर्माण झालं, त्याच्या देवता निर्माण झाल्या, अन्न निर्माण झालं हे तिथल्या निसर्गांनी घडवून आणलं आणि याला आपण म्हणतो 'संस्कृती'. ही आदिवासींची संस्कृती, ही अमक्याची संस्कृती, तमक्याची संस्कृती, आता आदिवासींची संस्कृती म्हणजे काय? त्या काळामध्ये जो भूगोल होता, त्यांच्या भोवताली, त्या भूगोलाने त्यांच्याकडून हे सगळं करून घेतलं. खायचं काय? निसर्ग देईल ते. घरं कशी बांधायची? निसर्गाने त्या भागामध्ये जी साधनं उत्पन्न केली असतील ती घेऊन. माणसाला पहिल्यांदा झोपडी बांधायचंही ज्ञान नव्हतं, तो तयार गुहेमध्ये रहायला लागला, नंतर झोपडी बांधायला लागला. चिमण्यांची घरटी पाहून, निसर्गाने त्याला शिकवलं, माणसाला. याला आपण म्हणतो मानववंशशास्त्र. (Anthropology) मानववंश जन्माला आल्यापासून ते आजपर्यंत जी स्थित्यंतरे झाली जी निसर्गाने आणि भोवतालच्या वातावरणांने झाली. मग नंतरच्या काळामध्ये निरनिराळ्या

संस्कृतींच्या लोकांच्या सरमिसळीमुळे झाली, देवाण-घेवाणीमुळे झाली. माणसाच्या वंशाने हे सगळं निर्माण केलं, स्वीकारलं. काही गोष्टी नाकारल्याही. काळाच्या ओघामध्ये काही गोष्टी अनावश्यक वाटायला लागतात, काही गोष्टींत सुधारणा करावीशी वाटते. काही गोष्टी एकदम सोडून द्याव्या वाटतात, काही थोडसं परिवर्तन करून मग त्या वापराव्याशा वाटतात. या सगळ्याचा जो इतिहास आहे हा माणसाचा इतिहास आहे. ज्याला आपण 'समाजशास्त्र' म्हणतो. हा समाज कसा घडत आला तर निसर्ग, माणूस आणि ''मी आणि माझ्या भोवतालचं जग'', यांच्यामधला जो नातेसंबंध आहेत त्याच्यातून. हे मानववंश, समाजशास्त्र त्याच्या पाठीमागचं माणसाचे मन आणि मग त्याच्या श्रद्धा असतील, त्याच्या देवदवता असतील, त्याच्या भावभावना असतील, त्याच्या संवेदना असतील या सगळ्या देवाण-घेवाणीतून माणूस घडत आलेला आहे आणि त्याला आपण 'संस्कृती' म्हणतो.

आमच्या संस्कृतीत असं आहे अन् तुमच्या संस्कृतीत तसं आहे, असं आपण म्हणतो. अहो साधी गोष्ट आहे, घाटावरचा गणपती आला की त्याला गूळखोबऱ्याचा नैवेद्य चालतो किंवा गूळखोबऱ्याचा मोदक चालतो आणि कोकणामधल्या गणपतीला ओल्या नारळाचा मोदक चालतो हे कुणी शिकवलं, हे काय गणपतीनं सांगितलं, हे तिथल्या निसर्गाने सांगितलं. कारण कोकणामध्ये नारळ विपुल आहेत, कोरडं खोबरं 'कोरडं' होईपर्यंत शिल्लकच राहत नाही, तोपर्यंतच संपून जातं. इथे घाटावर ओलं खोबरं मिळणं मुकील गोष्ट कालपरवापर्यंत होती. आता व्यापाराच्या सोयी झाल्यामुळे कुठेही काहीही मिळतं, जगाच्या पाठीवर. सगळं व्यापारानंतर झालं, देवाण-घेवाणीनंतर सुरू झालेलं आहे. परंतु क्रमाक्रमाने माणसाचा जो विकास होत गेला त्यात खाणं-पिणं, रहाणं, कपडेलत्ते सगळं आलं. माणसाने कपडे कुठले वापरावेत, हे तिथला निसर्ग ठरवतो. तुम्ही नाही ठरवू शकत काय करायचं ते. थंडी कडकडीत पडली की, तुम्ही काय असेल ते पांघरता, जनावराचं कातडंसुद्धा पांघरता आणि जर उकडायला लागलं तर उघडेबंब राहता, हेसुद्धा निसर्ग ठरवतो. मग हे यंत्रतंत्र युग आलं त्यातून निरनिराळी वस्त्रं निर्माण झाली वगैरे वगैरे, फॅशन वगैरे आल्या. परंतु निसर्गाने आम्हाला मूलत: जगायला शिकवलं आहे आणि तो प्रवास आजपर्यंत चाललेला आहे म्हणून याला 'लोकसंस्कृती' म्हणायचं आणि हा जो धर्म आहे त्याला मी 'लोकधर्म असे म्हणते. सर्वसामान्य माणसांच्या जीवनामध्ये आजतागायत आजसुद्धा जो प्रचलित आहे तो 'लोकधर्म जास्त आहे. त्याला तुम्ही कुठला तरी शिक्का मारा- हिंदू, मुस्लिम, ख्रिचन वगैरे तुम्ही काहीही शिक्का मारा- परंतु लोकांच्या

जगण्यातून ते आपोआप निर्माण झालेलं आहे, तो ‘लोकधर्म आहे. आणि म्हणून मग तुम्हाला असं दिसेल की, रूढार्थाने इथला धर्म जरी बदलला आणि भौगोलिक परिस्थिती तीच असली तरी चालीरीती, रूढींच्यामध्ये फारसा फरक पडत नाही आणि म्हणून धर्मांतर करूनसुद्धा संस्कृत्यंतर होतच असं नाही.

लहानपणापासून मी विविध अनुभव घेत आले. माझ्या सुदैवाने वडीलांची बदलीची नोकरी असल्याने मला खूप निरनिराळ्या ठिकाणी राहण्याची संधी मिळाली. मला मित्र-मैत्रिणी खूप निरनिराळ्या जाती-धर्माचे मिळाले, मुंबईसारख्या ठिकाणी रेल्वेच्या चाळीमध्ये राहत असताना मला ख्रिचन मित्रमैत्रिणी पण होते, मुसलमान मित्र-मैत्रिणी पण होते आणि भारतीय सर्व जातीधर्माचे होते. संस्कृती बदलत नाही. त्याची माझ्या अनुभवातली काही उदाहरणं सांगावी वाटतात. आमच्या चाळीमध्ये कल्याणला अशा दोघीजणी मुस्लिम बहिणी होत्या आणि त्या दोघींची लग्ने झाली. आम्ही आपले सातवीत-आठवीत होतो, त्या मुलींची लग्ने गावाकडे झाली आणि त्या ज्या वेळेला गावाकडून आल्या, तर त्या आपल्या हिरवी साडी नेसलेल्या, हिरवी काकणं घातलेल्या, गळ्यामध्ये काळं डोरलं घातलेल्या होत्या. फक्त कपाळावर कुंकू नव्हतं आणि बाकी आपल्यासारखं हातात हिरव्या बांगड्याबिंगड्या सगळं होतं. मी म्हटलं अगं का गं हुरमत आणि रेहमत तुमच्यात हे असं असतं!... ‘हो’ मग, म्हटली, ‘सगळ्यांच्यातच नसतं का’, म्हणजे तिला आपला धर्म आहे आणि काहीतरी वेगळं असायला पाहिजे, हे तिला वेगळा माहिती नव्हतं. आमच्या डोचक्यामध्ये भोवतालच्या वातावरणाने ते शिरवलेलं होतं, की हे वेगळ्या धर्माचे आहेत वगैरे.

माझ्या संपर्कामध्ये त्याच वातावरणामध्ये एक मुलगी आली, ख्रिचन! आणि तिच्याकडेही असंच होतं, की तिच्या घरचे लोक आले तरी त्यांच्या चालीरीती, रुढी फक्त ते नाताळचा सण आला की दिसायचं! त्यातही त्यांच्याकडे मिठाई वगैरे तयार करायचे. आपल्यासारखीच तर सगळी मिठाई, म्हणजे लाडू, करंज्या वगैरे असच सगळं तयार करायचे. ती म्हणाली तुमच्याकडे दिवाळीला नाही का करत तसं आमच्याकडं करतात. फक्त ‘रोट’ नावाचा एक थोडासा वेगळा प्रकार असायचा. हे मी अत्यंत लहानपणापासून पाहत आले. सांगली-मिरजेला आल्यानंतर ज्या ख्रिचन मुली होत्या, त्या ख्रिश्चन मुलींच्याकडून आणि त्या कुटुंबियांच्याकडून मला इतक्या गोष्टी मजेशीर जाणवल्या, की हे कोणी वेगळे आहेत असं मला वाटलंच नाही. मिरजेच्याच एका डॉक्टरांचे कुटुंब होते. नाताळच्या सणात येशू जन्मल्याचा

देखावा ते उभा करायचे. म्हणजे आपल्याकडे जसं ते गोकुळाष्टमीचं चित्र/दृश्य उभं करतात किंवा हळदीकुंकवाला देखावे मांडत असतात तसे! या मिरजेच्या डॉक्टरांच्या घरामध्ये त्यांच्याकडे हा सगळा देखावा उभा करायचे आणि त्या ठिकाणी असाच गोठ्याचा देखावा असे. तिथे गवत-बिवत आंथरलेलं, त्या बाळाची बाहुली एका टोपलीमध्ये ठेवलेली आणि मग दिव्याचा एक प्रकाशझोत. मला कृष्णजन्माची आठवण झाली. कारण आपल्याकडे कृष्ण असाच जन्माला आला, तो गवळ्याचाच पोर ना, आणि तो कुठे तर तुरुंगामध्येच जन्माला आला आणि मग नंतर त्याला गोकुळामध्ये आणलेलं आहे. या चमत्कार कथा ज्या आहेत; लोकोत्तर व्यक्तींच्या आयुष्याशी निगडीत असलेल्या त्यांच्या जन्मापासून ते त्यांच्या अंतापर्यंतच्या, या जगाच्या पाठीवरच्या सर्व जातीजमातींच्यामधे आहेत हे जाणवतं. त्याच्यावर पुस्तकं लिहिलेली मला मिळाली- म्हणजे माझ्याच मैत्रिणींनी लिहिली आहेत. एकीचं नाव मला मुद्दाम सांगावसं वाटतं, आपल्या वसईची सिसीलिया कार्वालो. सिसीलिया कार्वालोने अगदी सुरुवातीच्या काळामध्ये ते पुस्तक लिहिलेलं आहे- 'हिंदोळ्यावर' नावाच्या- त्या पुस्तकामध्ये वाडवळ जमातीतल्या- विवाहसंस्थेबद्दल लिहिलेलं आहे. त्या विवाहसंस्थेतली जी सगळी वर्णनं केलेली आहेत, ती म्हणजे विवाहातली गाणी, त्या नवरानवरीची वर्णनं ही जी सगळी आहेत... ती सगळी, तुमच्यामाझ्या घरामध्ये असावीत थोड्याफार फरकांनी अशा प्रकारची ती गाणी आहेत. त्यातल्या ओव्या आहेत आणि त्या ओव्या कशा आहेत की लग्नातले जे विधी आहेत त्याची वर्णने आहेत. मुलगी कशी बघतात त्याचे विधी आहेत, हळदीचे विधी आहेत. एक मला अतिशय आचर्याची गोष्ट वाटली या सगळ्यांकडे डोळसपणे पाहताना, इस्लाम असू देत, ते ख्रिचन असू देत, आपल्याकडच्या आदिवासी जमाती असू देत, उच्चवर्णीय असू देत, काही विधी हे सर्वत्र समान असतात. विशेषत: लग्नातली हळद हा जो विधी आहे, तो आदिवासी जमातींच्यापासून, धर्मांतरित जमातींपासून ते महाराष्ट्रातल्या उच्चवर्णीयांच्यापर्यंत सर्वत्र हळदीचा विधी आहे. त्याचे तपशील वेगळेवेगळे असतील; परंतु हळद हा विधी सगळीकडे आहे. हा इस्लाममध्येही आहे. अनुपमा निरंजन उजगरे यांनी ''ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ओव्या'' या पुस्तकात धर्मांतरित ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ज्या ओव्याचे संकलन केले आहे ते सर्व बहुजन मराठी स्त्रियांच्या ओव्यांचेच जणू संकलन आहे. फक्त विठ्ठल देवाऐवजी येशूचे नाव या ओव्यात आहे. धर्मांतराने संस्कृती पूर्णपणे बदलत नाही याचे हे उदाहरण आहे.

सांगलीतच मिळालेली माझी आणखी एक मुस्लिम मैत्रिण. अत्यंत उच्च शिक्षित, हिंदीची प्राध्यापक होती. तिने अनेक पुस्तकं लिहिलेली आहेत आणि त्या पुस्तकांच्यामध्ये तिचं मला मोठं विलक्षण एक पुस्तक वाटतं. त्या पुस्तकाचं नाव मोठं अन्वर्थक आहे. पुस्तकाचं नाव 'कृष्णा ते जमजम'...! 'कृष्णा ते जमजम' म्हणजे काय तर कृष्णाकाठी मुळात हे कुटुंब राहणारं. लहानपणी ती ज्या गावामध्ये राहात होती, त्या गावामध्ये शिवशंकराच्या पूजेचं प्राबल्य होतं. तिच्या पूर्वजांच्यामध्ये काही लोक हे शिवभक्त होते. शिवरात्रीचा उपवास करणारे होते आणि कृष्णा नदीवर स्नान करणं, कृष्णेच्या उत्सवकाळात हे सगळेजणं अतिशय भक्तिभावाने उत्सव साजरा करणारी मंडळी होती आणि नंतर तिने हजची यात्रा केली. त्या हजच्या यात्रेचं वैशिष्ट्यं असं आहे की तिथे गेल्यानंतर काबाचा जो प्रस्तर आहे, त्याच्या समोर एक झरना आहे, झरा आहे आणि त्या झरण्याला 'जमजम' असं म्हणतात. 'आबे जमजम'. 'आबे' म्हणजे 'आप', 'पाण्याचा झरा'. तर तो पाण्याचा झरा आहे त्याच्यात स्नान करणं हे पवित्र आहे. म्हणजे एकीकडे मी कृष्णेचीही स्नाने केली आणि एकीकडे जमजमचही स्नान केलं असा माझ्या आयुष्याचा सगळा प्रवास झाला, असे तिने लिहिले आणि मला वाटतं की, सांस्कृतिक सेतूच्या दृष्टीने याच्यापेक्षा दुसरी उदाहरणे नसतील.

आज दिल्लीला हे संमेलन भरते आहे त्या तालकटोरा, यापासून इथपर्यंत आले. ती निष्कारण चर्चा नाही याचाही एक अनुबंध आहे. कारण दिल्लीची जी सरहद् आहे, दिल्लीची जी सीमा आहे ती ओलांडल्यानंतर आपल्याला उत्तरेकडे जाता येतं. दिल्लीच्या ज्या निरनिराळ्या व्युत्पत्ती सांगितल्या जातात, त्यातली एक व्युत्पत्ती आहे 'देहली'... देहली म्हणजे 'उंबरठा', या देशाचा उंबरठा आहे, त्यामुळे प्राचीन काळापासून निरनिराळ्या राजवटी आल्या त्यांची राजधानी ही दिल्ली किंवा दिल्लीचा परिसर होता. अगदी महाभारताच्या राजवटीतसुद्धा. म्हणजे कौरव-पांडवांची ज्या वेळेला यादवी झाली, त्या वेळेला 'ते खांडववन तुम्ही जाळा आणि तिथे तुमची राजधानी वसवा', असं पांडवांना सांगितलं. आज ती वसाहत आहे दिल्लीच्या परिसरामध्ये. सांगायचं तात्पर्य, महाभारतापासून किंवा त्याच्या आधीपासून दिल्लीचं महत्त्व राजधानी म्हणून आहे. कारण उत्तरेकडच्या प्रदेशाला आणि दक्षिणेला सांधणारा असा हा भूप्रदेश आहे आणि त्याला खूप मोठी ऐतिहासिक, पौराणिक अशी परंपरा आहे. तीच गोष्ट महाराष्ट्राची आहे. कारण महाराष्ट्र हा उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्या तळ्यात-मळ्यात एक-एक पाय टाकून उभा आहे. उत्तरेकडील संस्कृती

आहे, ती आर्यबहुल संस्कृती आहे आणि दक्षिणेकडील संस्कृती ही द्रविडबहुल संस्कृती आहे आणि आर्य आणि द्रविड या प्रदेशांच्या सीमा प्रदेश म्हणजे महाराष्ट्र! आणि म्हणून महाराष्ट्र हा सांस्कृतिकदृष्ट्या फार एकारलेला कधीही झाला नाही. येथे दोन्ही संस्कृतींची देवाण-घेवाण, उदारमनस्कता सातत्याने राहिली. ही भाषेमध्ये राहिली आहे.

महाराष्ट्राची आणि कर्नाटकाची सर्वत्र देवाण-घेवाण आहे. ज्ञानेश्वरमहाराजांच्या 'ज्ञानेश्वरी'मध्ये कन्नडचा प्रभाव किती मोठ्या प्रमाणावर आहे याच्यावर कन्नडचे (बेळगावचे) एक गृहस्थ- आमचे रं. शा. लोकापूर नावाचे मित्र- यांनी स्वतंत्र ग्रंथ लिहिला आहे ''ज्ञानेश्वरीवर कन्नडचा प्रभाव''. तेव्हा आजतागायतसुद्धा ही भाषिक देवाण-घेवाण, सांस्कृतिक देवाण-घेवाण सातत्याने होत आहे. मराठी भाषेत किती तरी शब्द, किती तरी वाक्प्रचार हे कानडी सीमाभागात आहेत. पुष्कळदा ज्याला आपण बालगीते, बडबडगीतं म्हणू त्या बडबडगीतात अशी उदाहरणे पुष्कळ आहेत. खाद्यपदार्थ कितीतरी आहेत, देवाण-घेवाणीतून दोन्ही प्रदेशात रुजले आहेत. उत्तरेकडे भाजणी नाही. थालीपीठाची संस्कृत व्युत्पत्ती 'स्थालीपीठ' वगैरे करून सांगतात. सगळ्यात मोठे उदाहरण ''पुरणपोळी'' ही महाराष्ट्राची आणि कानडी प्रदेशांची खासीयत आहे. कन्नड 'हुरण हुळ्ळगी' मराठीत 'पुरणपोळी' होते आणि पुरणाचे 'कडबू' कर्नाटकात प्रिय होतात. अशी किती तरी देवाण-घेवाण दक्षिणेकडे आणि महाराष्ट्रामध्ये सहज होते कारण समान संस्कृती येथे नांदते आहे. हा जो सीमाप्रदेश सगळा आहे, या सीमाप्रदेशात खाद्यपदार्थ, कपडे, भाषा, चालीरीती, रुढी, लग्नातले व्यवहार यांमध्ये विलक्षण सारखेपणा आहे.

आमच्या नाशिकच्या बाजूला, आता 'आमचं नाशिक' म्हणते कारण मी दीर्घकाळ नाशिकलापण राहिले त्यामुळे म्हणते, तिथली संस्कृती अनुभवली व पाहिली आहे. त्या नाशिकच्या पलीकडे जो प्रदेश आहे 'डांग प्रदेश' गुजरात सीमेवर आहे. ज्या वेळेला संयुक्त महाराष्ट्राचा लढा झाला तेव्हा 'डांग प्रदेशासह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' वगैरे आरोळ्या आम्ही शाळेत असताना देत होतो, त्या वेळी कळत नव्हतं. पण पुढे जाणत्या वयामध्ये जेव्हा मी डांग प्रदेशात फिरले, विशेषत: सापुताऱ्याला हिल स्टेशन आहे मोठं आणि ते डांग प्रदेशालगत आहे, तिथे गेले आणि तिथल्या आदिवासी आणि शेतकरी बायका मी पाहिल्या, तेव्हा 'संस्कृती-संगम' म्हणते काय ते समजलं. हे तुम्हाला कुठल्या ग्रंथात दिसणार नाही, प्रत्यक्ष पाहिले की दिसते. म्हणजे कसं, की त्या ग्रामीण बायका साडी नेसलेल्या होत्या,

पण त्यांनी साडी कशी नेसलेली– कमरेपर्यंत, आपली एखादी कष्टकरी मराठी बाई जशी साडी नेसेल तशी, म्हणजे गुडघ्यापर्यंत कासोटा–बिसोटा घातलेली नऊवारी नेसलेली आणि वरचा पदर कमरेच्या वरचा तो गुजराती पद्धतीने घेतलेला असा होता. तेव्हा गुजराती आणि मराठी यांचं जे संमिश्रण आहे ते त्या सीमाभागातल्या स्त्री पोशाखामध्ये आपल्याला दिसतं. भाषेमध्ये तर ते खूप असतं. मुंबई व्यापाराच्या दृष्टीने सोयीचे होते म्हणून इंग्रजांनी मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी केली.

सांगायचं तात्पर्य सांस्कृतिक आणि भाषिक देवाण–घेवाण, सीमाप्रदेश ओलांडून, धर्म ओलांडून, जात ओलांडून होत असते, पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली असते आणि म्हणून एकारलेपणा जो असतो कुठल्याही बाबतीत तो टिकत नाही. हे शुद्ध आणि ते अशुद्ध, मग ते धर्माच्याबाबतीत असेल, भाषेच्याबाबतीत असेल, चालीरीती–रूढींच्याबाबतीत असेल, माणसाच्या आचरणात म्हणूनच हे असत नाही. लोकाचरण महत्त्वाचं (शास्त्रात रुढीर्बलीयसि) – शास्त्रापेक्षा रूढी–चाली–रीती प्रभावी असतात. ‘लोक’ हा शब्दच मुळी बहुवचनात आहे, तो एकवचनात नाही. लोकसंस्कृती ही सबंध भारताच्या सांस्कृतिक, धार्मिक जीवनाला व्यापून राहिलेली आहे आणि आजतागायत ती आपल्याला दिसेल. जाता जाता एक आणखी महत्त्वाची नोंद. ‘लोकसंस्कृती’ केवळ ग्रामीण, केवळ जुनी असते असा अलीकडे शहरवासीयांचा एक गैरसमज रूढ झाला आहे. प्रत्यक्षात लोकसंस्कृती व नागर संस्कृती यात सतत आदान–प्रदान होते. किंबहुना लोकजीवनात ज्या बाबी लोकप्रिय असतात, त्या नागरजन–अभिजन जाणीवपूर्वक उचलतात आणि त्यात काही फेरफार करून तिचे जाणीवपूर्वक नागरीकरण– संस्कृतीकरण करतात. ही प्रक्रिया जीवनाच्या सर्व अंगांत सतत चालू असते. संस्कृतीचे थोर अभ्यासक एम्. एन्. श्रीनिवासन त्याला संस्कृतिकरण– ‘संस्कृतायझेशन’ (लोकनागर प्रक्रिया) असं म्हणतात. उदा. पारंपारिक विध्यात्मक लोककला उणावत असताना त्यातील कलात्मक घटकांचा उपयोग विजय तेंडुलकर (घाशीराम कोतवाल) किंवा सतीश आळेकर (महानिर्वाण) सारख्या नाटकात करतात व ‘लोकनागर’ रंगभूमी निर्माण होते. म्हणून लोकसंस्कृतीचा प्रवाह आदिम ते अद्यतन असा– संस्कृतीच्या सर्व अंगांत चालूच आहे. लोकसंस्कृती ही काळानुसार बदलणारी एक प्रवाही प्रक्रिया आहे.

आपण लोकसंस्कृतीच्या व्यापकतेबद्दल बोलत होतो. लोकसंस्कृती ही सर्व माणसांच्या अस्तित्त्वाला व्यापून राहिलेली आहे. ‘लोक’ हा शब्दच नेहमी समूहवाचक आहे. बऱ्याच लोकांचे जरा समज वेगळे असतात, त्यांच्यासाठी थोडं स्पष्टीकरण

की, इंग्रजीमध्ये जो 'फोकलोर' (folklore) शब्द आहे त्याच्यासाठी 'लोकसाहित्य' हा शब्द मराठीमध्ये रूढ झालेला आहे. आता हा शब्द रूढ करत असता अनेक लोकांच्या चर्चा झालेल्या आहेत, वाद झालेले आहेत, या सगळ्या चर्चांमध्ये न शिरता इंग्रजीमध्ये जो 'फोकलोर'मधला जो 'फोक' (folk) शब्द आहे, 'लोक' या अर्थी तो बऱ्याच वेळेला तुच्छतादर्शक वापरला जातो. मराठीमध्ये मात्र किंवा भारतीय संदर्भामध्ये मात्र तो तसा नाही, कारण आपल्याकडे 'लोक' हा शब्द नेहमी आदरवाचक आहे. म्हणजे लोकमत, लोकसत्ता, लोकभावना यांचा आदर करणारा! तेव्हा 'लोक' हा शब्द भारतामध्ये हा नेहमी आदरसूचक अशा प्रकारे निरनिराळ्या भाषांच्यामध्ये वापरलेला आहे. या शब्दासाठी, म्हणजे 'फोकलोर' या शब्दासाठी मराठीमध्ये किंवा भारतीय भाषांच्यामध्ये निरनिराळे शब्द सुचवले गेलेले आहेत. कारण त्याची जी व्यापकता आहे ती मघाशी म्हटलं तसं लोकसंस्कृतीमध्ये खूप व्यापक आहे. लोकसाहित्यामध्ये 'साहित्य' या शब्दाचा आपल्या मराठीमध्ये रूढ अर्थ हा केवळ 'शब्दसाहित्य' एवढाच आहे, म्हणजे शब्दांनी घडलेलं साहित्य– कथा, नाटक, कादंबरी वगैरे वगैरे. त्याला मी 'शब्दसाहित्य' म्हणते. परंतु 'साहित्य हा शब्द येथे साधनवाचक आहे, 'लोर' या अर्थाचा आहे. त्यामुळे 'फोकलोर' या शब्दामध्ये लोकसंस्कृतीची जडणघडण ज्या ज्या साहित्यांमुळे होते, ज्या ज्या साधनांनी होते, तो साधनवाचक शब्द आहे. त्याच्यात शब्दसाहित्यपण आहे आणि शब्देतर साहित्यपण आहे.

म्हणजे मघाशी म्हटलं तसं चाली-रीती, रूढी, श्रद्धा, माणसांचं खाणंपिणं, घरंदारं, कपडेलत्ते ही जी सगळी साधने आहेत जीवनाची जडणघडण करणारी या सगळ्यांना मिळून साधनवाचक असा 'साहित्य' हा शब्द आहे. इंग्रजीमध्ये एक मोठा कोश आहे, लोकसंस्कृतीबद्दलचं विवेचन करणारा "Dictionary of Folklore of Mytholgoy and Legend", मारीया लिच ह्यांनी (१९५३ च्या आसपास रचलेला). त्याच्यामध्ये तिने ज्या folkloreच्या व्याख्या दिलेल्या आहेत, त्या निरनिराळ्या युरोपीय विद्वानांनी केलेल्या आहेत आणि त्याच्यामध्ये folkloreमध्ये शब्दसाहित्य आणि शब्देतर साहित्य या सर्वांचा समावेश केलेला आहे. मराठीमध्ये मात्र 'साहित्य' म्हणजे आपण फक्त शब्दसाहित्य– कथा, गीत वगैरे किंवा फार तर म्हणी, उखाणे, वाक्प्रचार, चालीरीती एवढाच अर्थ घेतो, त्याच्यापेक्षा व्यापक अर्थाने शब्द वापरलेला आहे. दुर्गाबाई भागवतांनी मराठीमध्ये प्रथम folklore किंवा 'लोकसाहित्य' या शब्दाचे विवेचन केले आहे. 'लोकसाहित्याची रूपरेखा'

या ग्रंथामध्ये! त्याच्यामध्ये 'साहित्य' हा शब्द त्यांनी साधनवाचकच घेतलेला आहे– म्हणजे चालीरीती, रूढी परंपरा वगैरे या सगळ्यांना उद्देशून त्यांनी 'लोकसाहित्य' हा शब्द वापरलेला आहे. राजवाड्यांना प्रथम मराठीमध्ये विसाव्या शतकात त्यांना जुनी काही गीते सापडली, काही कथा सापडल्या आणि त्याच्यासाठी त्यांनी 'लोककथा आणि लोकगीतं हे शब्द वापरले आणि मग त्याच्यावरून 'लोकसाहित्य' हा शब्द अनेकांनी वापरायला सुरुवात केली. नंतर ज्यांनी प्रथम कोश निर्माण केले त्यात ना.गो.चाफेकर, शंकर गणेश दाते यांनी 'लोकसाहित्य' हा शब्द रूढ केलेला आहे आणि विशेषत: शंकर गणेश दात्यांचं वैशिष्ट्य असं आहे की, लोकसाहित्याची व्याख्या करीत असताना किंवा लोकसाहित्याची व्यापकता सांगत असताना त्यांनी अन्य भाषिक लोकसाहित्य घेतलेलंच आहे. म्हणजे जसे म्हटले सीमाप्रदेशातले साहित्य तसे अन्य धर्मीयांच्या लोकसाहित्याचा विचारही त्यांनी त्यात केलेला आहे. त्यामुळे मराठीमध्ये देश, धर्म, भाषा यांच्या पलीकडे जाणारी संस्कृती या अर्थाने 'लोकसाहित्य' किंवा 'लोकसंस्कृती' शब्द रूढ केला आहे. नंतर 'लोकविद्या' हा शब्द दत्तो वामन पोतदारांनी वापरण्याचा प्रयत्न केला. विविध प्रकारच्या ज्या विद्या आहेत, त्या म्हणजे 'लोकविद्या'– folklore - या अर्थाने तो शब्द त्यांनी वापरला. पण तो फारसा काही रुळला नाही. पुढे ग्रामसाहित्य, लोकयान, जानपदगीतं अशा प्रकारचे शब्द मराठीमध्ये वापरले.

मराठीमध्ये डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनी लोकसाहित्यासाठी 'लोकसंस्कृती' हा शब्द जास्त उचित आहे असे मांडलेले आहे. त्यामुळे लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती हे बऱ्याच वेळेला समानार्थी शब्द वापरले जातात. मात्र मराठीमधलेच लोकसाहित्याचे आणखी एक विवेचक प्रभाकर मांडे यांचे म्हणणे असे आहे की, लोकसाहित्यातून 'लोकसंस्कृती' अभिव्यक्त होते. लोकसंस्कृतीचे वर्णन करण्यासाठी जी परिभाषा वापरली जाते ती लोकसाहित्याची असते. मात्र दुर्गाबाई भागवतांच्यानंतर मराठीमध्ये 'लोकसाहित्य' हा शब्द, 'लोकसंस्कृती' या अर्थाने जवळजवळ रूढ झालेला आहे. आणि तो आजतागायत चालत आलेला आहे. या लोकसंस्कृतीचे निरनिराळे आयाम आहेत ज्याच्यावर पुष्कळ लोकांनी अभ्यास केलेला आहे. त्याच्यामधल्या एका महत्त्वाच्या अभ्यासकाचा मला या ठिकाणी उल्लेख करावासा वाटतो. हिंदीमध्ये वासुदेवशरण अग्रवाल नावाचे मोठे विवेचक पंडित होऊन गेलेले आहेत आणि त्यांनी 'प्राचीन भारतीय लोकधर्म' नावाचे पुस्तक लिहिलेले आहे. ज्याला आपण वैदिक म्हणतो त्या साहित्यापासून– किंवा वैदिक चालीरीती, रूढी,

विधिविधानं म्हणजे यज्ञसुद्धा- त्याच्या पलीकडे जाऊन लोकपरंपरेमध्ये समकक्ष असलेल्या विधिविधानांचा उल्लेख त्यांत केलेला आहे. आणि त्याच्यासाठी लोकपरंपरेमधील परिभाषा वापरलेली आहे.

त्यांचं म्हणणं असं आहे की, संस्कृतमध्ये यज्ञासाठी ‘मह किंवा ‘मख’ असा शब्द आहे आणि मग त्या निरनिराळ्या यज्ञांच्या लोकविधींच्या रूपांना तो शब्द लावलेला आहे. अशा प्रकारचे शब्द प्राकृत भाषेमध्ये प्राचीन काळापासून वापरले गेलेले आहेत फक्त फरक इतकाच की, निसर्गाशी संबंधित असलेल्या ज्या जत्रा-यात्रा होत्या त्यांना उद्देशून त्यांनी ‘यज्ञ’ या अर्थानं ‘मह’ किंवा ‘मख’ आहे तसा शब्द वापरलेला आहे. कारण शेवटी आपण वेदांच्यामध्ये जरी गेलो तरी वेदांच्यामध्ये जी वर्णनं केलेली आहेत ती निसर्ग तत्त्वांचीच वर्णनं केलेली आहेत. म्हणजे नदी, सागर, पर्वत, वृक्ष, जंगलं यांची वर्णन, उषा देवीचं वर्णन, सागर देवाचं वर्णन केलेलं आहे. फार कशाला आपल्याकडे आदिवासींची जी गीतं आहेत- या ठिकाणी फार विस्तार करायला मला अवकाश नाही- त्या आदिवासींच्या गीतामध्ये जी लग्नाची गीतं आहेत त्या लग्नाच्या गीतामध्ये नदी, सागर, पर्वत, झाडं, वृक्ष यांचा उल्लेख केलेला आहे. जी आदिवासींची गीतं आहेत त्या आदिवासींच्या गीतामध्ये जे आवाहन केलं जातं त्यांच्या देवदेवतांना म्हणजेच सगळ्या निसर्ग तत्त्वांनाच आवाहन केलं जातं. म्हणजे ‘सागर देवा साविध रे व्हा, ‘नदीय देवा साविध रे व्हा’, ‘रुखीया देवा साविध रे व्हा’ ‘शुभमंगलं सावधान! असा आशय त्याच्यामधून व्यक्त होत असतो. तेव्हा ती आदिवासी गीते असू देत, अभिजनांची संस्कृतप्रचूर असू देत त्याच्या पाठीमागच्या ज्या भावना आहेत त्या निसर्ग तत्त्वांशी नातं जोडणाऱ्या भावना आहेत. आणि हा लोकसंस्कृतीचा फार मोठा भाग आहे. याच्याबद्दल आपण जरा गंभीरपणाने विचार करायला पाहिजे असं वाटतं.

‘प्राचीन भारतीय लोकधर्मा’मध्ये वासुदेवशरण अग्रवालांनी म्हटलेलं आहे की, आजतागायत ज्याला आपण गावामधल्या जत्रा-यात्रा म्हणतो, त्या जत्रा-यात्रा तिकडच्या पाणवठ्याशी बांधलेल्या असतात, देवांशी बांधलेल्या असतात किंवा एखाद्या पर्वताशी बांधलेल्या असतात. म्हणजे देवतेचे स्थान जास्त करून ते कुठल्या तरी डोंगरावर असतं किंवा नदीच्या काठी असतं किंवा पाणवठ्याजवळ असतं. तर हे आपण पहातच आहोत म्हणजे अगदी तो मग तुमचा सिंहस्थ असू देत किंवा एखादं पर्व असू देत ते पाण्याशी बांधलेलं असतं, नदीशी बांधलेलं असतं, सागराशी बांधलेलं असतं. अगदी आपली गोकुळाष्टमी जरी म्हटली किंवा नारळी पौर्णिमा

जरी म्हटली तरी सागराशी संबंधित अशा प्रकारचा तो उत्सव आहे, ती मंडळी तो साजरा करत असतात. आपल्याकडे लोकपरंपरेमध्ये जे यज्ञ आहेत त्याला 'मह' म्हटलंय. उदा. 'पव्वय महे' प्राकृत आहे. 'पव्वय' म्हणजे 'पर्वत', 'पव्वय मह'- 'पर्वत मह' म्हणजे पर्वताचा यज्ञ, नदी मह, सागर मह, रुख्व मह म्हणजे वृक्ष, नदी, जत्रा यांचे यज्ञ. नदीची जत्रा, सागराची जत्रा, ही आजही चालू आहे.

आपण कृष्णाकाठी राहणारी मंडळी, कृष्णामाईचा उत्सव दर वर्षी करतो की नाही? वाईला कृष्णामाईचा उत्सव जोरदार असतो. नाशिकला आपण गेला तर गोदामाईचा उत्सव असतो. गंगेचा उत्सव तर तिथली मंडळी करतच असतात. तेव्हा ज्या ज्या गावामध्ये हे जलाशय आहेत त्यांचे उत्सव त्यांना 'मह' म्हटलेले आहे 'मख' म्हटलेले आहे. हे उत्सव म्हणजेच लोकपरंपरेतले यज्ञ! यज्ञासाठी दर खेपेला समिधाच जाळल्या पाहिजेत आणि यज्ञकुंड पेटवली पाहिजेत असं नाही. 'मख' हा प्राकृत शब्द आहे. फार कशाला अगदी अलीकडे 'स्वयंवर' नावाचं जे मराठी नाटक लिहिलं आहे त्याच्यामध्ये किर्लोस्करांनी जे वर्णन केलेलं आहे ते कृष्ण आणि रूक्मिणीची पहिली भेट कुठे झाली? तर रैवतक पर्वतावर! पर्वताचा उत्सव चालू असताना तिथे त्यांची भेट झाली. म्हणजे पुन्हा तो पर्वत मह, पर्वत जत्रा आणि त्या जत्रेमध्ये कृष्ण-रुक्मिणीची पहिली भेट झाली. त्यामुळे ह्या ज्या सगळ्या परंपरा आहेत, 'आदिम' अवस्थेपासून ते आजपर्यंत प्रत्येक ठिकाणी त्याच्या खाणाखुणा आपल्याला दिसतात. काळाप्रमाणे शब्दांच्या उच्चारामध्ये बदल झाले असतील; परंतु त्याच्या पाठीमागची तत्वे आणि कृती या कायम आहेत. आणि म्हणून आपल्याला साधार असं म्हणावसं वाटतं की ही लोकसंस्कृती जी आहे तिचा प्रवास 'आदिम' ते 'अद्यतन' असा अखंड आहे. म्हणजे 'आदिम' काळापासून सुरू झालेल्या माणसाच्या श्रद्धा, भावना, चालीरीती, रूढी या काळ बदलला तरी थोडीशी नामांतरं होऊन, रूपांतरे होऊन आजतागायत तुमच्या-माझ्या जीवनामध्ये चालू आहेत. आणि आजपण अगदी अभिजन पातळीवर आपण गेलो असं जरी म्हटलं, अभिजात भाषा बोलणारे असं जरी म्हटलं तरी आपल्या मनामध्ये या गोष्टींच्याबद्दल आस्था आहेच. नाहीतर मग आता त्या कुंभमेळ्यासाठी एवढी गर्दी झाली नसती आणि त्याचा उत्सव झाला नसता.

आदिम काळापासून आजपर्यंत त्या श्रद्धा नामांतराने, रूपांतराने या टिकून राहिलेल्या आहेत. तेव्हा लोकसंस्कृती ही अशी सर्वव्यापक आहे. आणि याचे भान आपल्याला असणे हे आवश्यक आहे. फार कशाला रैवतक पर्वताचं जसं सांगितलं

तशी सातारच्या जवळ एक लहानशी टेकडी आहे, 'सीतामाईचा डोंगर' म्हणतात त्याला, आणि दर वर्षी संक्रांतीला तिथे सीतेच्याबरोबर वाणवसा वसायला बायका जातात आणि तिथे सीतामाई आहे असं समजून तिथे बायका वाणवसा वसतात आणि तिथे सीतामाईची गाणी, ओव्या दिवसभर त्या गात असतात. त्यामुळे पर्वताशी संबंधित असे उत्सव सगळीकडे चाललेले असतात. निरनिराळ्या देवदेवतांशी, नदी, पर्वतांशी जोडलेले असते. निरनिराळ्या पद्धतीने ही लोकसंस्कृती अस्तित्त्वात असते.

लोकसंस्कृतीतली जी तत्त्वे आहेत त्यातली काही आहेत ती कृतिप्रधान आहेत आणि काही शब्दप्रधान आहेत. आपण लोककलांच्याबद्दल ज्या वेळेला विचार करतो त्या वेळेस मराठी माणसांना पटकन 'गोंधळ', 'जागरण' यांनाच फक्त लोककला म्हणायचं असं वाटतं. खरं म्हणजे या लोककला नसून ही विधिनाट्ये आहेत. कारण कुठल्या तरी देवतेशी संबंधित तो विधी असतो. गोंधळ असला तर तो स्त्री देवतेशी संबंधित असतो. मग ती रेणुका असेल आणखीन कुठली असेल, तिचा गोंधळ असतो. जागरण म्हटलं की ते खंडोबाचं जागरण असतं आणि त्याच्यामध्ये स्त्रिया आणि पुरुष दोघेही असतात. खंडोबा म्हटलं की त्याच्याबरोबर वाघ्या असतो आणि ते नृत्य, गीत, कथा गाऊन देवाची आराधना करायची असा हा त्याचा मूळ हेतू आहे. आता वर्षातले काही ठराविक दिवस त्या उत्सवाचे दिवस असतात. त्या विधिनाट्य काळामध्ये गोंधळ, जागरण अशा प्रकारची जी विधि-नाट्ये आहेत ती सादर केली जातात. 'विधी' हा मूळ उद्देश, 'नाट्य' हे अनुषंगिक येतं. 'नाट्य' हा शब्द कसा आहे पहा. 'नृत्-नृत्' म्हणजे तालबद्ध हालचाली. भरताच्या नाट्यशास्त्रामध्ये वर्णन आहे की ''पदाभ्याम् तालमादिशेत?''. पायांनी जो ताल दिला जातो त्याच्यातून 'नृत्त' येतं आणि ते 'नृत्त' विकसित झालं की 'नृत्य' होतं आणि ते नृत्य नाट्यामध्ये येत असतं. म्हणजे एक प्रकार 'नृत्यनाट्य' झाले. तर असा जो विकासक्रम आहे सगळा, तो विकासक्रम आपल्या लोकपरंपरेमधल्या कलांच्यामधून दिसतो.

तात्पर्य, मुळामध्ये ते विधी आहेत, माणसाच्या मनामधल्या श्रद्धा आहेत. या श्रद्धा अभिव्यक्त करण्यासाठी माणूस त्या देवतेच्याबद्दलच्या कथा गातो, ती कथा गीतातून गातो. म्हणजे आता इथे शब्दसाहित्य आलं. तिथे शब्दातून गीतही निर्माण होतं आणि त्यातून कथाही सांगितली जाते. मग ती रेणुकेची असेल, खंडोबाची असेल अथवा कोणाचीही असेल. गीत आलं की त्याला साथीला वाद्य आलं. कारण त्याच्याशिवाय संगीत पूर्ण होत नाही. ''गीतं वाद्यं तथा नृतं, त्रयं संगीतमुच्चते!'' संगीताची व्याख्या अशी आहे की, गीत, वाद्य मिळून संगीत होतं. या कला ज्या सादर

होत असतात त्यांच्यात गीत आहे, नृत्य आहे, नाट्य आहे, कथा आहे, आणि ह्याच्यातून जे अभिव्यक्त होत असते ती समाजाची श्रद्धा त्या देवतेबद्दलची. म्हणून विधी हा महत्त्वाचा उद्देश  आणि त्याच्यातून अभिव्यक्त होणारं ते नृत्यनाट्य. म्हणून लोककलांना 'Total Experession of Life'- म्हणजे जीवनाची समग्र अभिव्यक्ती म्हणतात ती अशी लोककलेतून होते. सर्व कलांचा एकत्र संगम तेथे होतो. गीत, वाद्य, नाट्य, अभिनय, संपादणीचे गद्य संवाद- सर्व मिळून लोककला होते.

आता काय होतं की काळाच्या ओघामध्ये आपण म्हणतो सुधारणा झाल्या, सुधारणा झाल्या म्हणजे काय झालं? तर इंग्रजोत्तर काळामध्ये आपल्याकडे आपल्या परंपरेची चिकित्सा सुरू झाली. तशी ती आधीपासूनच सुरू होती गौतम बुद्धांच्या आणि चार्वाकांच्या काळापासून, पण आता विश्लेषणे सुरू झाली किंवा याच्यामधलं योग्य काय आणि अयोग्य काय, यातले ठेवण्याजोगं काय आणि न ठेवण्याजोगं काय यांचा खल सुरू झाला. हल्लीच्या भाषेत बोलायचं झालं तर खरी श्रद्धा कुठली आणि अंधश्रद्धा कुठली- अशा प्रकारे इंग्रजोत्तर काळामध्ये युरोपीय (खरे तर ख्रिश्चन) लोकांच्या संगतीने त्याच्याबद्दलची विश्लेषणे सुरू झाली. आपल्याकडे सुधारकांचा एक पंथ आला आणि त्या सुधारकांच्यामध्ये म्हटलं जायचं काही 'कर्ते' सुधारक आणि काही 'बोलके' सुधारक. म्हणजे आगरकरांच्यासारखे प्रत्यक्ष कृतीमध्ये आणणारे. आगरकरांच्यासारखे लोक म्हणायला लागले, ''पटेल ते बोलणार, जमेल ते करणार!'' आणि बहुतेक सुधारकांची अवस्था आजही अशीच आहे, की ''पटेल ते बोलणार आणि जमेल ते करणार''.

तर ही परंपरा जुनी आहे. त्याच्यातून मग या श्रद्धांचं विश्लेषण सुरू झालं, श्रद्धेला तडा जायला लागला आणि मग माणसं म्हणायला लागली, 'हे योग्य आहे हे अयोग्य आहे, वगैरे वगैरे...' आणि मग हे श्रद्धाबिद्धा जर ह्याच्यातून काढून टाकली तर उरतं काय? तर कलात्मक घटक- वाद्य, नृत्य, गीतं हे कलात्मक घटक उरतात. नंतरच्या काळात विधी गौण ठरू लागले, त्यातून 'नाट्यात्मक विधी' निर्माण झाले. लग्नानंतर गोंधळ वगैरे घालतात तर तो नाट्यात्मक विधीच असतो. नाट्यात्मक विधीचे उदाहरण देत असताना त्या विश्लेषकांनी सांगितले की आपल्याकडचा विवाह विधी जो आहे, तोच मुळात 'नाट्यात्मक विधी' आहे. त्याच्यामध्ये नाट्य जास्त आणि विधीची श्रद्धा कमी आहे. कारण आता भटजी जे काही मंत्र म्हणत असतात, त्याच्यात असं म्हटलं आहे की ती वधू जी आहे ती 'लक्ष्मी' आणि वर हा 'श्रीविष्णू' श्रीधररूप आहे. त्यामुळे ते जे लग्न आहे ते

विष्णू-लक्ष्मीचं लग्न आहे, म्हणजे देवतांचा विधी आहे. आता आपण माणसांना देवता कुठे मानतो, ते तर मानवी नवरा-नवरी आहेत. मानवांचा सुफलन विधी (Firtility rite) असतो. म्हणून वधूवरांना लक्ष्मी-विष्णू देवता मानून मग त्यांना हळद लावायची, त्यांची पूजा करायची, त्यांचे पाय धुवायचे, त्यांना वस्त्र नेसवायची, त्यांना अलंकार घालायचे, त्यांच्यासाठी मंत्र म्हणायचे वगैरे वगैरे हे नाट्य सगळं केलं जातं. आणि मग ते नाट्य कसं असतं? ''आकाशाशी जडले नाते, धरणीमातेचे स्वयंवर झाले सीतेचे!'' असे काव्यात्मक म्हटलेलं आहे, तसं त्या संस्कृत मंत्रात, श्रौत मंत्र जे भटजी म्हणत असतात त्याच्यामध्ये त्यांनी म्हटलेलं आहे. त्या मंत्रांचा अर्थ हाच आहे की आकाश तत्व आणि भूमी तत्त्व यांचा इथे विवाह लागला. 'द्यौहम पृथ्वीस्त्वं!' सप्तपदी चालत असताना वर जो मंत्र म्हणतो ''द्यौहम- मी आकाश तत्त्व आहे, पृथ्वीस्त्वं- तू पृथ्वी तत्व आहेस.'' 'वयं विवहावहे'- आपण दोघेजण एकत्र येतो कशासाठी, पुढची पिढी निर्माण करण्यासाठी! वंशसातत्यासाठी म्हणजे पुन्हा त्याचं उद्दिष्ट काय? म्हणजे भौतिकपूर्ती करणे हे उद्दिष्ट! की भौतिक सुखाची उत्पत्ती करणं हे उद्दिष्ट! म्हणून संपूर्ण विवाहविधी हा.

त्यामुळे कुठलेही धार्मिक विधी असतील त्याचं उद्दिष्ट काय तर भौतिक स्वास्थ्य. याचं खूप सुंदर विश्लेषण आपल्या दिल्लीलाच झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेलं आहे. त्यांनी धर्माच्या निर्मितीची जी भूमिका सांगितली आहे तिच्यामध्ये सांगितले आहे की लौकिक आणि अलौकिक यांना जोडणारा दुवा धर्मात आहे. भूमी आणि आकाश यातून सगळ्याची निर्मिती झालेली आहे, म्हणजे ऐहिकतेसाठी धर्माची निर्मिती झाली आहे. आपण तरी देवाधर्माचे विधी करून करून काय मागत असतो देवाजवळ, 'अमुक देहि, तमुक देहि' म्हणजे काय, 'विद्या देहि, धनं देहि, पुत्रं देहि, फलं देहि' म्हणजे 'मला दे दे दे दे.' ऐहिक स्वास्थ्यासाठी- ऐहिक स्वास्थ्यासाठीच धर्मविधींची निर्मिती झाली आहे. लक्ष्मणशास्त्रींनी फार सुंदर विवेचन केलेलं आहे.

लक्ष्मणशास्त्री जोशींनी ज्या वेळेला विश्वकोश निर्माण केले त्या विश्वकोशाचे २४ खंड झाले. २४व्या खंडाच्या अखेरीस आणि २५व्या खंडाच्या सुरुवातीचा विचार करताना 'लोकसाहित्य' हा शब्द प्रथम मराठी कोशात त्यांनी आणला. तोपर्यंत अनेक कोश झाले होते, इंग्रजीत झाले, मराठीत झाले पण लोकसाहित्य या शब्दाला एवढ्या मोठ्या बृहदकोशात कधीही स्थान मिळालेले नव्हते. परंतु लक्ष्मणशास्त्री जोशींना याचे महत्त्व पटले आणि त्यांनी तो शब्द विश्वकोशामध्ये

आणला. लोकसाहित्याबद्दलची लक्ष्मणशास्त्रींची आस्था विश्वकोशामध्ये त्यांनी पहिल्यांदा मांडली. मग नंतर इतर कोशकारांनी त्याचा वापर केला. सांगायचं तात्पर्य, प्राचीन काळापासून चालत आलेला सर्वसामान्य माणसांच्या आचारातला, विचारातला, भावनातला, संवेदनातला हा जो आचार धर्म याला मी 'लोकधर्म असंच म्हणते. त्यामुळे आपला धर्म हा अमुक आहे तमुक आहे अशा एकारलेपणामध्ये कधी मला अडकावसं वाटलं नाही.

आमचं संतसाहित्य जे सगळं आहे, ते वारकरी मराठी संतसाहित्य प्रामुख्याने अतिशय उदारमनस्क साहित्य आहे. नुसतं उदारमनस्क साहित्य नाहीये तर संतसाहित्याला डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे या संतसाहित्याच्या आणि लोकसंस्कृतीच्या मोठ्या अभ्यासकाने म्हटलेलं आहे की, संतसाहित्य हे परमार्थीकृत लोकसाहित्य आहे. परमार्थ हे उद्दिष्ट आहे पण ते लोकसाहित्य आहे. लोकजीवनातले अनेक कंगोरे संतसाहित्यामधून व्यक्त झालेले आहेत. संतसाहित्याने बोधाचे काम करावे अशा प्रकारची एक भूमिका मांडली जाते. संत काय करत आले? तर बोध करत आले, लोकांना शहाणपण शिकवत आले, परिवर्तनाच्या वाटा सांगत आले आणि लोकसंस्कृतींने तेच करावं अशी अपेक्षा आहे. आपल्याकडे मग नंतरच्या काळात जी भारूडं झाली, जनजागरणाची गाणी झाली त्याच्यामध्ये बोधाचे सगळे किंवा सुधारणेचे सगळे प्रवाह त्यात आलेले दिसतात. दारूबंदी असेल, हुंडाबंदी असेल, मुलींची लग्न लहान वयात करू नये म्हणून असेल हे विषय लोकसाहित्यातल्या भारूडासारख्या रचनांच्यामधून आणि लोककलावंतांच्या या रचनांच्यामधून आलेले आहेत. फार कशाला संपूर्ण लोकसंस्कृतीतल्या या कलात्मक साहित्यांने निरनिराळ्या चळवळींना प्रेरणा देण्याचे फार मोठे काम केलेले आहे. मध्ययुगामध्ये तर ज्ञानेश्वरांच्यापासून ते अगदी रामदासांच्यापर्यंत सगळ्यांनी त्यांच्या त्यांच्या पद्धतीने बोधात्मक उपदेश करण्याचे काम केलेले आहे. संतसाहित्याने कधीही लोकांना अंधश्रद्धा शिकवली नाही. उलट ती अंधश्रद्धा दूर कशी करायची हे संतसाहित्याने आणि विषेशत: तुकारामांच्यासारख्या संतलोकांनी सांगितले.

मध्ययुग हे संपूर्ण भारतभर संतचळवळीचं युग आहे. इसवी सनाच्या ९व्या-१०व्या शतकापासून ते १७व्या शतकापर्यंत म्हणजे शिवाजीमहाराजांचा उदय होईपर्यंत एकीकडे इस्लामची आक्रमणं होत होती. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली त्या वेळेस पहिल्यांदा अल्लाउद्दिन खिलजी दक्षिणेमध्ये आला. सगळ्या संतांच्या काळात महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर कुठे ना कुठेतरी इस्लामची राज्ये होती आणि त्या

काळामध्ये हे संतांनी प्रबोधन करण्याचं काम केलेलं आहे आणि म्हणून शिवाजीमहाराजांनी ज्या वेळेला स्वराज्य स्थापना केली त्याचं ऐतिहासिक विश्लेषण करत असताना न्या. महादेव गोविंद रानडे यांनी (Rise of the Maratha Power) 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथात असं म्हटलेलं होतं की, शिवाजीमहाराजांना खेड्यापाड्यातल्या, ग्रामीण भागातल्या मावळ्यांना हाताशी धरून जनजागृती करण्याची प्रेरणा मिळाली याचं कारण संतांनी केलेलं जनजागरण. संतांनी पहिल्यांदा मराठी भाषा जिवंत ठेवली आणि भाषा त्या देशाच्या अस्मितेचा फार मोठा भाग असते. 'महाराष्ट्र धर्म' टिकवण्याचं काम अप्रत्यक्ष रीतीने संतसाहित्याने भाषेतून आणि त्यांच्या रचनेतून केलं आणि सर्वसामान्य लोकांचं प्रबोधन केलं. अंधश्रद्धा तर शिकवलीच नाही त्यांनी. इतकेच नव्हे, पुढे इंग्रजोत्तर काळात कामगार चळवळीमध्ये सगळे जे शाहीर आहेत निरनिराळे, त्यांनी लोकप्रबोधनाचं काम केलं. कामगार चळवळीमध्ये शाहीर पिराजीराव नाईकांच्यापासून ते अण्णाभाऊ साठ्यांच्यापर्यंत जी सगळी शाहीर मंडळी आहेत, त्या शाहीर मंडळींनी कामगार चळवळीमध्ये प्रबोधनाचं काम केलं.

डांगे, मिरजकर आणि सहकारी यांनी चळवळी कशा केल्या याचं विवेचन या सगळ्या शाहिरांनी केलेले आहे. इतकेच नाही तर त्या काळातले शाहीर प्रत्यक्ष त्या कामगार चळवळीत उतरलेले आहेत. नारायण सुर्वेसारखा कवी म्हणतो, मला पहिल्यांदा मार्क्स भेटला तो कामगारांच्या एका मोर्चामध्ये भेटला. त्यामुळे आधुनिक काळामध्ये ज्याला आपण आर्थिक जनजागरण झालं म्हणतो ते आर्थिक जनजागरण करायलासुद्धा लोकसंस्कृतीच आणि शाहीर कारणीभूत झाले. 'डांगे, मिरजकर आणि ब्रॅडले। नेते लाभले हिंमतवाले। उठविला त्यांनी सारा कामगार। वर्गयुद्धाचा करून निर्धार। भांडवलदारी केली बेजार।।' – (अण्णाभाऊ साठे)

फार कशाला ज्याला आपण स्त्री स्वातंत्र्याची चळवळ म्हणतो या चळवळीमध्ये स्त्रियांच्या जनजागरणाचं काम जर कोणी केलं असेल तर पुन्हा लोकसंस्कृतीतील कलाकारांनी! 'मुलगी झाली हो' सारखं नाटक तर आहेच पण त्याच्या आधी स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये जनजागरण करण्याच्यासाठी राष्ट्रसेवा दलाचे जे मेळे होत असत किंवा ज्या कलात्मक अशा प्रकारच्या ज्या चळवळी होत्या, त्याला म्हणायचे 'कलापथक! त्या कलापथकांच्यामधून सगळी जनजागरणाची गाणी असायची.

संतसाहित्यामध्ये संत कवयित्री हा एक स्वतंत्र विषय आहे. आपल्याकडे असा एक अपसमज आहे, की आमच्या बायका जोपर्यंत त्यांना शाळा मिळाली नव्हती

तोपर्यंत अडाणी होत्या आणि त्यांना लिहिता-वाचता यायला शिकवण्यासाठी ज्या वेळेला शाळा निघाली त्या वेळेला बायका शहाण्या झाल्या. आता जो आमचा सगळा संतसाहित्याचा काळ आहे इसवी सनाच्या १७व्या-१८व्या शतकापर्यंतचा तोपर्यंत कुठेही बायकांच्यासाठी आणि इतरांच्यासाठी शाळा नव्हत्या. म्हणजे लिहायला, वाचायला स्त्रियांना बंदी होती. पण बायका रचना करायच्या थांबत होत्या का? संतरचना बायकांच्या आहेत. निरनिराळ्या जाती जमातीच्या संत आमच्याकडे इसवी सनाच्या ७व्या-८व्या शतकापासून भारतभर त्या १६व्या-१८व्या शतकापर्यंत आहेत. म्हणजे उत्तरेकडे गेलो तर लाल दीदी आहे. 'लल्लेश्वरी' असं तिला म्हणतात. या सगळ्या बायकांचं वैशिष्ट्य असं की त्यांनी नवरेपणाला झुगारून दिलेलं आहे. काश्मिरच्या लल्लेश्वरीने म्हटलेलं आहे ''वस्त्र लेवून विरळ हवेचे नृत्य करितसे लल्ला मोदे।''- मला इतर वस्त्रांची गरजच नाही. दक्षिणेकडची आमची अक्कमहादेवी आहे- त्या अक्कमहादेवींनी आपल्या नवऱ्याला- नवरा म्हणजे तो बिज्जल नावाचा राजा दक्षिणेकडचा- अट घातली, मी शंकरभक्त आहे त्यामुळे माझ्या घरामध्ये शिवभक्त येणार त्यांचा आदर झाला पाहिजे, मी ज्या वेळेला शिवअर्चना करत असेल त्याच्यामध्ये मला विक्षेप चालणार नाही आणि याच्यामध्ये तीन वेळा मी माफ करीन. तीन वेळेला जर मला संधी दिली नाही तर मी घर सोडून निघून जाईन. हे सांगणारी अक्कमहादेवी, बसवेश्वरांच्या पंथामधली, तिच्या पतीला ते मान्य करावं लागलं. तिने सासरी गेल्यानंतर स्वत:साठी मंदिर स्थापायला लावलं. ती मंदिरामध्ये अर्चना करायला लागली. ती दिसायला सुंदर होती, म्हणून तर राजाने भाळून तिच्याशी लग्न केले. तीन वेळेला त्याचे अपराध तिने माफ केले. एकदा तिचे शिवभक्त आले त्यांना त्याने अडवले म्हणून तिने दोनदा माफ केले. नंतर एकदा शिवभक्त आले आणि ती त्यांच्या आदरसत्कारासाठी जायला लागली तर त्या क्षणी राजा कामातुर झालेला होता. ती म्हणाली या क्षणी मला जाऊ दे ही तिसरी वेळ आहे. त्याने ऐकलं नाही आणि तशीच्या तशी ती बाहेर आली. हातामध्ये शिवमूर्ती घेतली आणि ती रस्त्याने चालायला लागली ती श्रीपर्वतावर गेली. हे धाडस उत्तरेकडच्या लल्लेश्वरीपासून दक्षिणेकडच्या अक्कमहादेवीपर्यंत अनेक संत स्त्रियांनी केलेलं आहे. त्यात महाराष्ट्रामधीलही संत आहेत. पण त्यातलं एकच महत्त्वाचं उदाहरण मला या ठिकाणी सांगावसं वाटतंय.

महाराष्ट्रातलं फार मोठं उदाहरण म्हणजे संत बहिणाबाई! बहिणाबाई शिवुरकरीण, जी शिवूर गावची होती ती. तीन वर्षांच्या या मुलीचं तीस वर्षांच्या पुरुषाशी लग्न

झालं! त्याचं तिसरं लग्न. आता काय झालं असेल त्या मुलीचं विचार करा. आणि मग तो नवरा ब्राह्मण! उच्चकुलीन आणि ही तर अबोध अवस्थेमधली. परंतु तिच्या मनामध्ये परमेश्वराची प्रचंड ओढ असलेली. तिने तुकारामांविषयी ऐकलं फक्त प्रत्यक्ष भेट झाली नाही, तिच्या गुरूंच्या माध्यमातून तुकारामांची कीर्ती तिने ऐकली आणि तिला स्वप्नामध्ये तुकाराममहाराजांनी दृष्टांत दिला, असं तिने तिच्या आत्मकथेत म्हटलेलं आहे. मराठीमध्ये दोनच संत स्त्रियांच्या आत्मकथा उपलब्ध आहेत. एक या बहिणाबाईंची आणि दुसरी विठाबाईंची, तर या बहिणाबाईंची आत्मकथा खूप प्रसिद्ध आहे. तिचा नवरा ब्राह्मण, उच्चकुलीन, अत्यंत वेदशास्त्रसंपन्न परंतु स्त्रिच्याबाबतीमध्ये लंपट. तिचे मन गुरू तुकारामांच्याकडे ओढ घेत असलेलं, तिला गुरूने स्वप्नामध्ये दृष्टांत दिला असं तिने वर्णन केलेलं आहे. परंतु त्या नवऱ्याला ते सहन झालं नाही. का तर मी एवढा मोठा ब्राह्मण असून ''हिने ऐसा कैसा केला गुरू।'' हिने या शूद्र तुकारामाला गुरू कसा केला? मी एवढा मोठा ब्राह्मण व्युत्पन्न असूनसुद्धा आणि म्हणून त्याने तिचा खूप छळ केलेला आहे आणि तरीही ती स्वत:च्या सर्वस्वाचा त्याग करून तुकारामाला भेटायला गेलेली आहे. तुकाराम ज्या वेळेला भेटले त्या वेळेला मला किती समाधान झालं, माझं मन ओतप्रोत भरून गेलं आनंदाने, असे ती वर्णन करते. किती ओतप्रोत भरून गेलं, ''घट हा बुडावा जैसा डोहात। न बुडतां ओतप्रोत पाणी।। बहिणी म्हणे तैसें झालें माझ्या जीवा। तुकाराम खुणा दाखवी त्या।''– तेव्हा तुकारामांच्यामुळे मला ही एक परमानंदाची प्राप्ती झालेली आहे, असं स्वत: तिने वर्णन करून ठेवलेलं आहे. ही आमची बहिणाबाई, मी जाता जाता फक्त ज्याला आपण 'ट्रेलर' म्हणावं अशी झलक सांगते आहे.

संत स्त्रियांमध्ये विठाबाई ही तर फारशी कोणाला माहिती नाही. परंतु कर्नाटकातल्या एका अभ्यासकाला– पंडित आवळीकरांना– तिचे एक हस्तलिखित असलेली आत्मकथापर रचना सापडली. विठाबाईची अवस्थाही तशीच. लहानपणी लग्न झालेलं. पती हा लंपट आणि 'ती अबोध बालिका आणि तिने ज्याला आपण निरागस वर्णन करावं असं निरागसपणे वर्णन केलेलं आहे. काय वर्णन केलेलं आहे? ''भ्रतार हो मजसि, ओढितो एकांती। मध्यरात्री जाणा समयासी।। ओढोनिया बहुत मारितो मजसि, भोगावे मजसि म्हणोणीया।।''– या मराठी संत स्त्रिया आहेत इतक्या मोकळेपणाने लिहिणाऱ्या. म्हणजे आजसुद्धा जिथे प्रश्न निर्माण होतात आणि आमचे सुप्रिम कोर्टातले, उच्च न्यायालयामधले न्यायाधीश ज्या वेळेला वाद घालत असतात

की पतीने जर अत्याचार केला किंवा पतीने जर तिच्या परवानगीशिवाय संभोग केला तर तो गुन्हा मानावा का नाही, तो बलात्कार मानावा की नाही- इथे विठाबाईने हे सांगितलेलं आहे. तेव्हा काळाच्या किती पुढे गेलेल्या ह्या सगळ्या आमच्या संत स्त्रिया होत्या. यांच्याकडे आमचं कुणाचं फारसं लक्षच नाहीये.

ज्या वेळेला १९७५ मध्ये 'स्त्री मुक्ती वर्ष' नावाची भानगड आली आणि त्या वेळेला लोक सांगायला लागले की हे पाश्चिमात्यांच्याकडून आलेलं आहे, त्या वेळेला मला मोठं आश्चर्य वाटायला लागलं. कारण माझ्याकडे या सगळ्या परंपरेतल्या स्त्रिया होत्या ना! मी म्हटलं हे पाश्चिमात्यांच्याकडून आलेलं नाही, आमच्या बायका फार जबऱ्या होत्या हो! म्हणजे संत स्त्रिया तर होत्याच, पण जात्यावर दळण दळणाऱ्या आमच्या बायका होत्या. आणखीन एक मोठी संत बाई जी 'चोख्याची महारी' म्हणवते स्वत:ला. चोखोबाची महारी सोयराबाई तिचं नाव आणि ही चोख्याची महारी जी आहे तिने एक अतिशय मूलभूत मुद्दा मांडला. म्हणजे पुन्हा स्त्री मुक्ती. याच्या चर्चा आजही चालतात. धर्मपंडित चर्चा करत असतात. काय तर अमुक मंदिरामध्ये स्त्रियांनी जावे की नाही जावे? त्यांना प्रवेश मिळावा की न मिळावा? कारण का, स्त्रियांचा विटाळ होतो. आता विटाळ दोन प्रकारचा असतो, आपल्याकडे दोन प्रकारचे विटाळ. एक विटाळ म्हणजे जातीपातीचा विटाळ, की अमुक जातीचा माणूस उच्चवर्णीयाला शिवला तर विटाळ होतो आणि दुसरा स्त्रीचा, निसर्गधर्माने दिलेली मासिक पाळी तिची! त्यालाही विटाळच म्हणायचं. आता ही बाई कुठल्याही शाळा-कॉलेजात गेली नाही, कुठल्याही स्त्री मुक्तीवालीकडे गेली नाही, तिला कुठली सिमोन दि बोव्हा माहिती नव्हती. ती काय म्हणते? ''देहाचा विटाळ, देहीचं जन्मला, शुद्ध तो जाहला कवण प्राणी।। उत्पत्तीचे मूळ विटाळाचे स्थानं। कोण देह निर्माण नाही जगी।।'' - असा मला एखादा माणूस दाखवून द्या की जो विटाळाच्या स्थानातून जन्माला आला नाही. आता आजही एखादा म्हणतो की माझा जन्म जैविक नाही वगैरे, त्याच्यावर आपण किती विश्वास ठेवायचा हा भाग वेगळा. परंतु त्याचा भंडाफोड या आमच्या संत कवयित्रींनी १३-१४व्या शतकामध्ये केलेला आहे, की ज्या वेळेला लिपी आणि लिहिण्या-वाचण्याला त्यांच्या जीवनात स्थान नव्हतं. यांना स्त्री मुक्तीच्या उद्गात्या आणि झेंडा फडकवणाऱ्या म्हणायचं की नाही?

आजच्या स्त्री मुक्तीच्या विचारांना मागे सारतील अशा प्रकारचे विचार ज्यांना आपण अंत्यज जाती म्हणतो, ज्यांना आपण दुय्यम जाती म्हणतो, त्या जातीच्या

स्त्रिया ज्या वेळेला बोलतात त्या वेळेस त्यांची विचारशक्ती, प्रतिभाशक्ती आणि संवेदनशीलता, भाषेवरचं त्यांचं प्रभुत्व या सगळ्या किती मोठ्या गोष्टी आहेत! निर्मितीच्या दृष्टीने, ज्याला आपण 'कला' म्हणत असतो ती कला म्हणजे दुसरं काय असतं? संवेदनशीलता नेमक्या शब्दात उतरवणं, याच्यासाठी जी प्रतिभा लागते, ती प्रतिभा या बायकांच्याजवळ उपजत आहे आणि ती अनुभवातून परिपक्व झालेली आहे. ह्यांच्याकडे आम्ही या सबंध इतिहासाच्या प्रवाहामध्ये लक्ष देणार आहोत की नाही? लक्ष न देता आपण पुढे चाललेले आहोत आणि आम्ही सुधारलेले आहोत असं आपण म्हणत असतो. आमच्या भारतामध्ये स्त्रियांना फार मोठं स्थान होतं वगैरे वगैरे! आपण स्त्रियांना पवित्र, महन्मंगल वगैरे मानतो, देवता मानतो. माझ्या जात्यावर दळणाऱ्या बायका, ह्या तर इतक्या परखडपणे बोलत आलेल्या आहेत; पण गंमत अशी आहे की लोकसाहित्याचा अभ्यास करणाऱ्या आमच्या पुरुष मित्रांनी एकानेही याचा उल्लेख केलेला नाही. त्या लोकसाहित्यामधल्या जात्यावरच्या ओव्यांच्यामध्ये बापाचं कसं कौतुक आहे, भावाचं कसं कौतुक आहे, नवऱ्याचं कसं कौतुक आहे एवढ्या ओव्या सगळ्यांनी सांगितल्या आणि मी आईच्या नव्हे, मांडीवर बसून, झोपून कशी गाणी ऐकत होतो असेही सांगितले. पण अरे बाबा, आईच्या मांडीचं तेव्हा काय होत होतं, त्याच्याकडे तुझं लक्ष गेलं का? ते कुणीही दिलं नाही. ते शेवटी दिलं आमच्या एका बाईनीच. ती बाई कोण? आमची इंदिरा संत!

इंदिरा संतांना अगदी अलीकडच्या काळामध्ये काही ओव्या मिळाल्या आणि त्या कर्नाटकातल्या आहेत. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रदेशामधल्या आहेत. त्याच्यामध्ये 'जातं ओढताना, बाई गं, माझ्या हाताला येती फोडं।'- हे कुरुंदाचं जात ओढता ओढता माझ्या हाताला फोड येतात, माझ्या हाताला गोळे येतात आणि 'मायमाऊलीचं मन ऐकुनि कळवळं।' मायमाऊलीला माझी दया येते; कारण माझ्या हाताला गोळे येतात असे उद्‌गार आहेत. रोजच्यारोज रात्री उठायचं आणि तीन वाजता उठून दळायला बसायचं. दोन-दोन, चार-चार पायली दळायचं ही काही साधी गोष्ट आहे! त्या बायका आपल्या गाणी म्हणत होत्या आणि दळत होत्या. आणि दळताना काय म्हणत होत्या. 'गाण्याच्या नादात तुला ओढीते दगडा' आता करणार काय! आमच्या केशवसुतांनी पुढे सांगितलं, 'गाण्याने श्रम वाटतात हलके, हेही नसे थोडके।' हे त्यांनी श्रम न करता म्हटलेलं आहे. परंतु या श्रम करता करता बायका म्हणताहेत की, ''गाण्याच्या नादात तुला ओढीते दगडा।। जात्या तू इसवरा नको

मला जड जाऊ ।। सयाच्या दुधाचा बया पाहतात अनुभवु।।'' – जात्या तू मला जड जाऊ नको रे बाबा, लोक माझ्या सयीचं दूध– सयीचं दूध म्हणजे आईचं दूध– 'मायमाऊलीचं दूधं माझ्या मनगटी खेळतं'– त्याची, माझ्या माऊलीची परीक्षा करतात लोक. 'आईने काय वळण लावलं तुझ्या, आईने नाही का शिकवलं.' आजसुद्धा आईचा उद्धार होतो, तेव्हा तर होतच होता. तेव्हा माझ्या आईला कमीपणा यायला नको म्हणून मी ते सगळं करत असते, कष्टाची कामं करत असते. पुरुषवर्गाकडून माझ्यावर अन्याय होतो, अपमान होतो हे मला कळत नाही असं नाही. त्याच्याही शेकडो ओव्या आहेत. दोन–तीन महत्त्वाच्या ओव्या ज्या अनेक वेळेला मी सांगते त्या परत सांगते, ''कडुविंद्रावन डोंगरी त्याचा रहावा''– 'विंद्रावन' नावाचं कडू फळ डोंगरात असते. ''कडुविंद्रावन डोंगरी त्याचा रहावा। पुरुषाचा कावा मला येडीला काय ठावा।।'' – आता हे तिचं येड पांघरून पेडगावला जाणे आहे की नाही? 'पुरुषाचा कावा मला येडीला काय ठावा,' असं म्हणणारी जात्यावर दळण दळणारी जी बाई आहे तिला तथाकथित 'शुद्ध' बोलता येत नसेल पण तिला 'शुद्ध' भान आहे. की काय चाललं आहे त्याचं!

हे काही फक्त नवऱ्याच्याबद्दल आणि सासरच्यांच्याबद्दलच तक्रार आहे असं नाही. ज्या वेळेला बाप, भाऊ अन्याय करतात त्या वेळेला त्यांनासुद्धा तिने फटकारलेलं आहे. विशेषत:, सवतीवर ज्या वेळेला बाप मुलगी देतो किंवा भाऊ बहीण देतो– कारण तेव्हा काय या पोरी प्रेमविवाह करायला जात नव्हत्या, बापच सवतीवर मुलगी द्यायचा, कारण पुरुषांनी कितीही लग्न करायचे– त्या बापालासुद्धा ती दोष देते ''सवतीवर लेक दिली जशी साखरेची गोणी। बाप विकूनं झाले वाणी।।'' – तेव्हा बाप विकतो मुलीला. अशा प्रकारच्या ओव्या बाई ज्या वेळेला म्हणते त्या वेळेला तिला वास्तवाचं केवढं मोठं भान असतं इकडे मात्र इतर कोणाचंही लक्ष गेलेलं नाही, हे मला पुन्हा पुन्हा सांगावसं वाटतं. जात्यावरची ओवी काळानुसार बदलत आली आहे. स्वातंत्र्यचळवळीचे पडसाद ओव्यात मुटले आहेत. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू इ. वरही बाईच्या ओव्या आहेत. उदाहरणार्थ ''नका बायकांनो नटू परदेशी या धिटाने। बुडतील कारखाने स्त्रियांचे।।'' – असा स्वदेशीचा पुरस्कार आहे.

अशा किती तरी गोष्टी आहेत की बायकांची प्रतिभा, बहुविध आणि बहुकल्पनांनी अशी सगळी वेढलेली आहे. नुसत्या जात्यावरच्या ओव्या घेतल्या तर आपल्याला

स्त्रियांच्या या प्रतिभेचं आणि त्यांचं जीवनाचं आकलन जे आहे ते किती सखोल आकलन आहे याची कल्पना येते.

पुढे दळणाच्या गिरण्या आल्या. गिरण्या नव्हत्या तोपर्यंत बायकांना हे सगळं करावं लागतच होतं पण गिरण्या आल्या आणि बायकांना सगळ्यात मोठा आनंद झाला. पुरुषांच्यापेक्षा बायकांना आनंद झाला. यंत्रयुगानंतर आर्थिक व्यवहार जाऊदे बाजूला, बायका काय म्हणाल्या त्या ओव्यातूनच, ''आली गिरणं अनुसया। माझी जीवाची गं सखी। धाड बंधवा तिची पिठी।।'' - तर माझ्या भावा, तू आता ती गिरणी काढली आहेस, त्याची पिठी जरा मला पाठव कारण आता मला दळून दळून कंटाळा आलाय. ''सासू आत्याबाई दळु दळु मेल्या। (आमची सासू, आत्याबाई- आत्याबाई म्हणजे सासूच) आमच्या राज्यात बाई गिरणाबाई आल्या।।'' असा आनंद ती व्यक्त करताना आपल्याला दिसते. आणि मग एखादी सासू खडूस म्हणायला लागली, डाळीचं पीठ घरी दळलेलं चांगलं लागतं, भाजणी दळलेली घरी चांगली लागती. तर मग ही नवीन आलेली सून म्हणायला लागली, गिरणीच्या जमान्यातली ''जळू जळू सासूबाई, जळू तुमचं जातं। दळं म्हणायाला तुमचं काय जातं।।'' काळ बदलला. काळ बदलल्यावर स्त्री बदलली. यंत्रयुग आलं, यंत्रयुगांनी पुढे काय काय झालं हा वेगळा भाग आहे, परंतु स्त्रीला थोडीशी मुक्तता मिळाली कष्टामधून आणि त्याच्या या पाऊलखुणा आहेत. कारण स्त्रियांच्या संस्कृतीने एक वेगळं वळण घेतलं गिरणी आल्यामुळे. अशा किती तरी गोष्टी आपल्याला दिसतील. तेव्हा माझ्या जात्यावर दळण दळणाऱ्या बायकांनी- ज्याला आपण स्त्रीमुक्ती, स्त्रीमुक्ती म्हणतो- त्याचे उद्गार, फार जुन्या काळामध्ये काढलेले आहेत. संत स्त्रियांनी काढलेले आहेत. ज्याला आपण प्रबोधन, प्रबोधन म्हणतो ते लोकपरंपरेतल्या स्त्रियांनी, संतांनी, पुरुषांनी लोककलावंतांनी खूप मोठ्या प्रमाणामध्ये केलेलं आहे. लोकसंस्कृतीचा हा व्याप आमच्या सगळ्या आधुनिक संस्कृतीलासुद्धा व्यापून राहिलेला आहे की नाही याचा विचार व्हावा.

आज ज्या पद्धतीनं माणसांचं जीवन चाललेलं आहे, त्या पद्धतीमध्ये आपल्याला असं दिसतं आहे की, 'जुने जाऊद्या मरणालागुनी, जाळुनि किंवा पुरुनी टाका' - जुनं ते जाऊद्या सगळं, आता नवीन काय ते पहा- असं एकीकडे म्हणायचं आणि एकीकडे जुन्याचाच पुन्हा पुन्हा वापर कसा योग्य आहे हे सांगण्याचाही प्रयत्न करायचा. आणि म्हणून विशेषत: लोकांना निरनिराळ्या कर्मकांडात गुंतवून ठेवण्याचे उद्योग, देवाधर्माच्या नावावर, संस्कृतीच्या नावावर हे पुन्हा पुन्हा चाललेले दिसतात

आणि त्याच्यामध्ये ‘तथाकथित शिक्षित स्त्रिया’ – मी ‘तथाकथित’ म्हणते ‘सुशिक्षित’ म्हणत नाही– तथाकथित शिक्षित स्त्रिया त्याच्यामध्ये अडकतात. लोकसंस्कृतीतल्या आणि संतस्त्रियांनी जेवढा विचार केला स्वतःच्या जगण्याचा तेवढा विचार या शिक्षित बाया करीत नाहीत. स्वतःला पदवीधर म्हणवतात, उच्चशिक्षित म्हणवतात परंतु आपण हे का करतो आहोत हे कर्मकांड, या कर्मकांडाचा विचार करत नाहीत असे दिसते. विधी श्रद्धेने केला जातो आणि ज्या वेळेला ज्या विध्यात्मकतेतली श्रद्धा बाजूला होते, त्या वेळेला जे उरतं नुसतं कर्म केलं जातं, नुसते विधी केले जातात त्याला कर्मकांड असं म्हणतात. की नुसतं करत रहायचं ते अमुक करा, तमुक करा, तमुक करा आणि मग त्याला ‘साइंटिफिक रीझन’ देण्याचा प्रयत्न करायचा. ‘स्यूडो सायन्स’ म्हणजे आता लोककलांच्यामध्येसुद्धा ही भानगड आलेली दिसते आहे. परवा मी लोककलांचा एक कार्यक्रम पाहिला मुंबईला आणि गंमत अशी आहे की, आधुनिक पद्धतीनं लोककला शिकवणाऱ्या एका संस्थेमधल्या एका मुलीने हा कार्यक्रम सादर केला. त्या कार्यक्रमामध्ये एक गोंधळ सादर केला. त्याच्यामध्ये तिने असं समर्थन केलं की बाईनी कपाळाला कुंकू लावणं हे कसं आवश्यक आहे. आणि त्याला ‘सायन्स’ची म्हणजे शास्त्रीय विधाने म्हणतात. ती वैज्ञानिक कारणे काय? तर बायकांना फार मानसिक त्रास असतो, कपाळाला इथे मधोमध दोन भुवयांच्यामध्ये दाबबिंदू असतो, त्या दाबबिंदूवर कुंकवामुळे दाब पडतो आणि त्यामुळे त्यांचं मानसिक स्वास्थ हे सुरळीत होतं. त्या मुलीचं मी ऐकलं सगळं, मुंबईला आणि नंतर मी प्रश्न विचारला, ‘‘ठीक आहे, त्या कुंकवाच्या दाब बिंदूमुळे स्त्रियांचं मानसिक स्वास्थ ठीक होत असेल तर मानसिकदृष्ट्या जास्त स्वास्थ्याची गरज कोणाला आहे. लग्न झालेल्या बायकांना का विधवांना? विधवांना जास्त गरज आहे! कारण मानसिकदृष्ट्या त्या जास्त असुरक्षित आहेत, आणि विधवांना आम्ही कुंकू लावायचीच मनाई करणार. मग या ‘सायंटिफिक रीझन’ला अर्थ काय आहे?’’ मग याला आम्ही काय म्हणणार? ‘फेक सायन्स’, ‘स्यूडो सायन्स’, व्याज विज्ञान/खोटं विज्ञान! विज्ञानाच्या नावावर या खोट्या गोष्टी पसरवल्या जातात आणि मग यात वैज्ञानिक सत्य कसं आहे, हे ठासून सांगायचा उद्योग चालू झाला आहे.

दुर्दैव म्हणजे ‘तथाकथित शिक्षित’ समाज याला बळी पडतो आहे. हा उलटा प्रवास सुरू झाला आहे, तो चिंताजनक आहे. अरे जर त्या बायकांचं स्वास्थ टिकायचं असेल तर, विधवांना जास्त गरज आहे तर त्यांना तुम्ही परवानगीच देत

नाही, कुंकू लावायची! बरं स्त्रियांना जर मानसिक अस्वास्थ असेल तर पुरुषांचं काय? सगळे पुरुष मानसिकदृष्ट्या स्वस्थ असतात का? नाही. तर आपण ज्याला 'सायंटिफिक रीझन' देतो म्हणतो, वैज्ञानिक सत्य म्हणतो, त्याच्या पाठीमागचा जो अप्रबुद्धपणा आहे, त्याच्याकडे आमचं लक्षच नाही आणि आंधळेपणाने त्याचं आचरण चाललेलं आहे. तथाकथित उच्चशिक्षित स्त्रिया हे अत्यंत आंधळेपणाने करतायत असं मला सगळीकडे दिसतं. एखाददुसरी असेल वेगळी. परंतु बहुसंख्य ज्यांना आर्थिक स्वास्थ्य आहे, सामाजिक दर्जा आहे आणि त्यांचे मेंदू काम करीत नाहीत, त्यांचे मन आणि मेंदू हे मोकळे करायला पाहिजेत. चिमटीएवढे मेंदू असलेली ही माणसं आहेत की जे आंधळेपणाने अशा प्रकारचे आचरणं करतात, कर्मकांडामध्ये गुंतून राहतात आणि त्याचं समर्थन करतायत, यांना सुशिक्षित का म्हणायचं? त्या स्त्रिया असोत किंवा पुरुष असोत. हे साक्षर आहेत फक्त.

शिक्षणाची व्याख्या इंग्रजोत्तर काळामध्ये 'लिहिता वाचता येणं म्हणजे शिक्षण' ही जी झाली ती तोकडी आहे. त्यांना फक्त लिहिता-वाचता येतं. सुशिक्षणाने स्वतंत्र विचार करण्याचे सामर्थ्य यावे आणि स्वतंत्रपणे आचरण करण्याचं धाडस यावं. कारण ज्ञानाने धीर यायला पाहिजे, ज्ञानाने धाडस यायला पाहिजे, ज्ञानाने भीती वाढायला नको. अज्ञानाने भीती वाढते, ज्ञानाने भीती जायला पाहिजे आणि जर ज्ञानाने भीती जायच्याऐवजी ती जर वाढत असेल तर या लिहिता-वाचता येणाऱ्या या पदवीधरांना 'ज्ञानी' म्हणायचं का? असे प्रश्न आपल्यासमोर उभे रहायला पाहिजे. ज्ञानामुळे माणूस निर्भय व्हायला पाहिजे आणि या देशातले लोक जर जास्त निर्भय व्हायचे असतील तर त्यांनी या सगळ्या कोंडाळ्यातून बाहेर यायला पाहिजे आणि जी लोकसंस्कृती आणि लोकविज्ञान, म्हणते त्याचा सर्वांगांनी नीट धांडोळा घ्यायला पाहिजे. केवळ जुनं आहे म्हणून नव्हे, त्यातलं काही टाकाऊ असू शकतं, त्यातलं काही उपयुक्त असू शकतं. आमच्या नाटककार कालीदासांनी म्हटलं आहे की, 'जुनं असतं ते सगळं चांगलच असतं असं नाही, नवे असते ते सगळं टाकाऊ असतं असं नाही'. शहाणी माणसं जी असतात ती विचार करतात आणि यातलं टाकाऊ काय आणि टिकाऊ काय याचे विवेकाने ग्रहण करत असतात. 'पुराणमित्येव न साधु सर्वम्। न चापि सर्वम् नव मित्यवद्यम्- जे नवीन असतं ते सर्व टाकाऊ असतंच असं नाही. मग शहाणी माणसं काय करतात- ''सन्त: परीक्षान्यतरन् भजन्ते'' - जी शहाणी माणसं असतात ती स्वत: परीक्षण करतात. स्वत:चं डोकं चालवतात. ''मूढ: प्रप्रत्ययनेयबुद्धि।।'' - आणि मूर्ख जे असतात ते दुसऱ्याच्या

बुद्धीवर अवलंबून असतात. अमुकतमुक महाराजांनी सांगितलय, व्हा शरणागत. या शरणागतीला ज्ञानाने विरोध केला पाहिजे, ज्ञानाने माणसाला निर्भय बनवलं पाहिजे. आणि ते जर निर्भय बनवत नसेल तर पुढे काय? त्यांना ज्ञानी म्हणायचं कां?

'आर्टिफिशियल इंटलिजन्स'बाबत सध्या बरीच चर्चा आहे. मी काही जाणकार लोकांना विचारलं, 'ही कृत्रिम बुद्धिमत्ता नावाची काय गोष्ट आहे?' मग त्या क्षेत्रातल्या काही चार लोकांनी मला लांबलचक निबंधच्या निबंध पाठवले इंग्रजीमध्ये, मराठी, हिंदीमध्ये वगैरे. त्याचे सार मग मी माझ्या अल्पमतीप्रमाणे काढण्याचा प्रयत्न केला. जो सजीव माणूस आहे तुमच्या-माझ्यासारखा तो आजपर्यंत आपलं डोकं चालवून जे काही नवं जुनं असेल ते ठरवत होता. मी लेखक असेन तर माझं लेखन जे काही बरं-वाईट असेल ते माझं मी करीत असे. आणखीन कोण दुसऱ्या क्षेत्रातला असेल तर तो त्याची निर्मिती करीत असे. आता ही कृत्रिम बुद्धिमत्ता आल्यामुळे काय होणार आहे म्हणे? तर माणसाच्या कर्तृत्वशक्तीची बंधनं संपणार आणि ती जी 'आर्टिफिशियल इंटलिजन्स' नावाची गोष्ट जी आहे ती तुमच्या बुद्धीच्यापेक्षा जास्त क्षमतेने काम करणार आहे आणि त्यामुळे तुमच्या बुद्धिमत्तेच्या पलीकडे ती जाते आहे. म्हणजे मी माझ्या बुद्धीने जर काही ठरवायचं म्हटलं तर 'आर्टिफिशियल इंटलिजन्स' त्याच्यापेक्षा शतपटींनी पुढे जाणार आहे आणि माणूस तोकडा पडणार आहे तिथे. मला स्थानच नाही काही. मी एक लेखक असेन, मी काही बरावाईट अनुभव घेऊन समजा एखादी कथा लिहिली तर तो 'आर्टिफिशियल इंटिलिजन्स' त्याच्याहीपेक्षा आणखीन मोठ्या गोष्टी तयार करू शकतो, आपोआप तयार करू शकतो, असं मला सांगण्यात आलं. आणि मग मी जी तयार केलेली कथा आहे तिला काहीच अर्थ नाही! म्हणजे उद्या कुणीही त्या 'आर्टिफिशियल इंटिलिजन्स'च्या 'ॲप'ला सांगेल ते तारा भवाळकरांच्यासारखं पुस्तक तुम्ही करा, तो फटाफट फटाफट करून देईल, मग तारा भवाळकरांनी केलेलं त्याला काहीच अर्थ नाहीये, मोडीत गेली ती!

आता प्रश्न असा निर्माण होतो की, माणसाच्या अस्तित्त्वाला किंमत राहणार की नाही? कारण माणूस ज्या वेळेला कुठलीही कृती करत असतो, त्या वेळेस त्याच्या पाठीमागे त्याचा अभ्यास असतो, त्याचा विचार असतो आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट त्याची संवेदना असते. जर ती संवेदनाच नाहीशी होणार असेल कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे जिवंत माणसाची तर मग जिवंत माणसाचं काम काय? म्हणजे ज्याला प्रकृतीने दिलेल्या आपल्या शक्ती आहेत- प्रकृतीने म्हणजे निसर्गाने- आपोआप मिळालेल्या

आपल्या ज्या शक्ती आहेत, विचार करण्याची शक्ती असेल, संवेदनेची शक्ती असेल, सुख-दु:ख ग्रहणाची शक्ती असेल या सगळ्याच्या पलीकडे जर ती कृत्रिम बुद्धिमत्ता काम करणार असेल तर मग माणसाच्या या अस्तित्त्वाला अर्थ काय? असा प्रश्न निर्माण होतो. महात्मा गांधींवर एकेकाळी आरोप होत असे की, त्यांचा यंत्र / विज्ञानाला विरोध आहे. ते मागासलेले आहे. त्यावर महात्माजींचे उत्तर होत की, यंत्र-तंत्र हे माणसाठी आहेत. ते माणसाला गुलाम करण्याइतके वरचढ होऊ नये. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भविष्यात तसे होण्याची शक्यता जाणकार व्यक्त करीत आहेत. त्यासाठी जगभरच्या शासनकर्त्यांनी आणि वैज्ञानिकांनी सावध रहावे. उद्या जर कला आणि साहित्य यांवर कृत्रिम बुद्धिमत्तेने आक्रमण केले तर संवेदनशील कलावंत आणि साहित्यिक संपतील की काय? मग साहित्य संमेलने तरी होऊ शकतील का आजच्यासारखी? असे प्रश्न निर्माण होतात.

या निमित्ताने खूप विस्ताराने एक विचार आपल्यासमोर ठेवण्याची संधी मिळाली. पण हे आवाहन या पुढील भारतीय आणि प्रामुख्याने मराठी माणसाने स्वीकारावे आपले संशोधन मराठीतून मांडावे आणि ते इतके लोकोत्तर असावे की जगातील अन्य भाषकांना मराठी शिकल्याशिवाय गत्यंतर राहू नये. मग मला एक गोष्ट आठवते. मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा मिळालेला आहे याच्याबद्दल आपण आनंद व्यक्त करतो याबद्दल वाद नाही. प्रश्न असा आहे, 'अभिजात' म्हणजे नेमकं काय? मी मुद्दाम शब्दकोश काढून 'अभिजात' आणि 'अभिजन' या शब्दांचे अर्थ पाहिले. त्यात 'अभिजन' म्हणजे 'कुलीन, सभ्य, उच्च, सुसंस्कृत' असे पर्यायी शब्द दिलेले आहेत. आणि 'अभिजन' म्हणजे 'उत्तम कुळ असलेला, कीर्तिवान म्हणजे 'अभिजन'. आता प्रश्न असा येतो की उच्च कुळामध्ये जन्माला न येऊनसुद्धा माणसे अधिक गुणवान होऊ शकतात. त्याची उदाहरणे आपल्या पुराणांमध्ये, इतिहासामध्ये मोठ्या प्रमाणावर आहेत आणि त्याचे सर्वांना माहिती असलेलं उदाहरण म्हणजे कर्णाचे आहे. कर्णाने म्हटलेलं आहे की जन्म कुठे झाला हे महत्त्वाचं नाही, तर त्याचं कर्म काय आहे हे महत्त्वाचं आहे. ते कर्णाचं वचन प्रसिद्ध आहे. 'दैवायत्तं कुले जन्म: मदायत्तं तु पौरुषम्।' जन्म कुठे मिळावा हे आपल्या हातामध्ये नसतं ते देवाच्या हातात असतं. परंतु पौरुष, पराक्रम, गुणवत्ता वाढवणं हे आपल्या हातात असतं आणि त्याप्रमाणे माझा जन्म सूर्यकुळात झाला का आणखीन कोणाच्या पोटी झालेला आहे मला माहिती नाही. परंतु माझा पराक्रम कसा आहे, मी अर्जुनासारखा बाण मारणारा आहे की नाही, मी धनुर्धर आहे की नाही, मी

त्याच्या तोडीचा धनुर्धर म्हणून उभा राहू शकतो की नाही. या गोष्टी महत्त्वाच्या आहेत आणि हे केवळ कर्णाच्याबाबतीतच नाही तर अनेकांच्या बाबतीमध्ये आपल्याला दिसतं, मोठं उदाहरण म्हणून आपण हे उदाहरण घेतलेलं आहे. अलीकडचे मोठे उदाहरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आहे.

आता प्रश्न असा आहे की निरनिराळ्या ज्या बोली आहेत, – त्यांना आपण 'प्राकृत' म्हणतो तर, प्रमाणभाषा आणि बोली याच्यामध्ये 'प्रमाणभाषे'चा हा जो दर्जा आहे या दर्जाची संकल्पना केव्हा आणि कशी आली? इंग्रजोत्तर काळामध्ये आपल्याकडे लेखन-वाचन पद्धतीने सार्वत्रिक शिक्षण देण्याची जी परंपरा सुरू झाली त्यानंतर आपल्याकडे 'शिक्षण' म्हणजे 'लेखन-वाचन येणं', अशा प्रकारची एक परिभाषा निर्माण झालेली आहे. जणू काही ज्यांना लिहिता-वाचता येत नाही ते अडाणी, ते मूर्ख! अशा प्रकारे आजही लोकं समजताहेत. खरं म्हणजे आपण पुष्कळ उदाहरणे पाहिली की लिहिता-वाचता न येणारी मंडळी- मग ती स्त्रिया असू देत, संत असू देत, अन्य कुळामधली असू देत- ही अतिशय विचक्षण असू शकतात, ती संवेदनशील असू शकतात, ती प्रतिभावंत असू शकतात. जात्यावर दळण-दळणाऱ्या बायकांच्यापासून ते संतसाहित्यातल्या स्त्रिया आणि पुरुषांच्यापर्यंत विविध जाती-जमातींची उदाहरणं आपल्याला त्या संदर्भात दृष्टोत्पत्तीस येतात सगळीकडे. मग 'लिहिता-वाचता येणं म्हणजेच शिक्षण' ही भूमिका कशी तयार झालेली असावी?

तर इंग्रजोत्तर काळामध्ये शालेय पाठ्यपुस्तके निर्माण करून ज्या शाळा निघाल्या त्या शाळांच्यामधून मेकॉलेने ती रूढ केली असे म्हणतात. त्या वेळेलाही एक भूमिका होते की, मेकॉलेने काय केलं? तर मास्तर आणि कारकून निर्माण करण्याच्या शाळा निर्माण केल्या. म्हणजे निरनिराळ्या शाळा निघाल्या पाहिजेत, तिथे शिकवायला मास्तर पाहिजेत आणि सरकारी कचेऱ्यांच्यामध्ये कारकून पाहिजेत आणि त्या पद्धतीचे लेखन-वाचन ज्यांना येतं ते शिक्षित आणि बाकीचे सगळे अडाणी! आपल्याकडे मूठभर मंडळींच्यामध्येच लेखन-वाचनाची परंपरा वंशपरंपरागत होती. आणि खरं सांगायचं म्हणजे, स्वच्छ शब्दामध्ये बोलायचं झाले तर ब्राह्मण जमातीमध्ये ही परंपरा दीर्घकाळपासून होती. जुन्या काळापासून असा आपला समज आहे. परंतु प्रत्यक्षामध्ये जर बघितले तर सर्व ब्राह्मणांनासुद्धा नीट लिहिता-वाचता येत होतंच असं नाही. विशेषत:, स्त्रियांच्याबाबतीमध्ये याची अनेक उदाहरणे आपल्याला साहित्यामध्येसुद्धा दिसतात. ज्यांनी सुरुवातीच्या काळामध्ये आत्मचरित्रे लिहिली,

त्यात आमचे बेळगावचे गंगाधरपंत देशपांडे नावाचे काँग्रेसचे फार मोठे पुढारी होते आणि त्यांनी आपलं आत्मचरित्र लिहिलेलं आहे. ते बेळगावहून पुण्याला शिकायला आलेले होते. कारण बेळगावमध्ये उच्च शिक्षणाची सोय नव्हती आणि बऱ्याच इतर ठिकाणी जिथे शिक्षणाची सोय नाही तिथले लोक पुण्या-मुंबईला शिकायला जायचे आणि प्रामुख्याने पुण्याला शिकायला जायचे तसे गंगाधरराव देशपांडे आले.

त्या काळात मुलामुलींची लग्ने लवकर व्हायची. म्हणजे मुलगे हायस्कूलमध्ये पंधरा-सोळा वर्षांचे असताना मुलांची लग्नं व्हायची आणि मुली म्हणजे त्यांच्या बायका नऊ-दहा-अकरा वर्षाच्या बायका होत्या. तसे गंगाधरपंत देशपांड्यांचे लग्न हे लवकर झालेले होते आणि त्या प्रमाणे ते पुण्याला शिकायला जरी होते तरी पत्नीशी संपर्क असा फारसा येत नव्हता. एका सुट्टीमध्ये ते बेळगावला आले आणि बेळगावला आल्यानंतर ते बायकोला हळूच म्हणाले, 'मी तुझ्यासाठी पुण्याहून एक गंमत आणली आहे.' तिला वाटलं पुण्यावरून आपला नवरा काही तरी शिकून वगैरे आलाय म्हणजे काही तरी नव्या पद्धतीची साडी-बीडी, दागिना वगैरे असं काही तरी असेल आणि मग ती बिचारी वाट बघत बसली. रात्री त्यांनी पाटी, पेन्सिल आणि पुस्तके बाहेर काढली आणि म्हणाले की, 'मी तुला आता लिहायला-वाचायला शिकवणार आहे.' आता पाटी, पेन्सिल पाहिल्याबरोबर त्या बाईचं डोकं फिरलं. ती म्हणाली, 'असलं मला भलतं काही तरी सांगू नका!' उच्चवर्णीय, उच्चशिक्षित असं ते घराणं गंगाधरपंत देशपांड्यांचं, बेळगावमधले अतिशय प्रतिष्ठित घराणं, त्या घराण्यातली ही मुलगी म्हणते, 'मला हे भलतंसलतं काही सांगू नका.' ते म्हणाले, 'अगं, आता पुण्या-मुंबईतल्या सगळ्या बायका सर्रास लिहायला वाचायला शिकतात. ती म्हणाली, 'शिकत असतील! त्यांना लवकर विधवा व्हायचं असेल म्हणून त्या शिकत असतील.'

समज असा होता की, बाई जर लिहायला-वाचायला शिकली, तर सरस्वतीचा तिच्यावर कोप होतो आणि सरस्वतीच्या कोपाने ती विधवा होते! उच्च-वर्णीयांच्या स्त्रियांच्यामध्ये असलेले असे समज दीर्घकाळपर्यंत होते. आता गंगाधरपंत देशपांडे हे महात्मा गांधींच्या चळवळीमध्ये काम करणारे म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील. तशी ही अलीकडची गोष्ट. इसवी सनाच्या २० व्या शतकाच्या सुरुवातीची. त्या काळात जर इतका लोकांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी अपसमज असेल तर मग बाकीच्या इतर जाती-जमातींच्याबाबतीमध्ये तो किती मोठा असेल. याची केवळ कल्पनाच केलेली बरी! स्त्रियांना शिकवू नये याबद्दल असे हे अपसमज होते आणि

मग याच्यासाठी ही भीती घालायची. स्त्रीच्याबाबतीमध्ये सगळ्यात मोठी भीती म्हणजे तिने विधवा होऊ नये ही! अशा किती तरी घटना! म्हणजे त्या काळातलं साहित्य जर बारकाईने वाचले तर अशा आणि अनेक घटना आणि अनेक प्रसंग पहायला मिळतील. उच्च आणि कुलीन असं जे काही म्हटलं जातं त्यात या स्त्रिया उच्च कुळातल्या नव्हत्या का? त्या कुलीन नव्हत्या का? काही लेखन-वाचन करायची त्यांना मुभा होती का? नव्हती!

दुसरे उदाहरण सांगते, सांगलीमध्ये पहिल्यांदा नाटक सुरू झाले. विष्णुदासांनी सुरुवातीला नाटक ज्या वेळेस इथे बसवले त्या वेळेस राजेसाहेबांनी काय केले? तर विष्णुदासांना सांगितले- तो मुलगा होता, अठरा-वीस वर्षाचा- कर्नाटकी नाटक बघितलेले राजेसाहेब त्यांना म्हणाले, 'तू असं नाटक करशील का?' तर तो म्हणाला, 'हो, करीन. पण मला नाटकात काम करायला मुलं पाहिजेत.' त्या वेळेस कोकणातून बरीच मुले पोट भरण्यासाठी संस्थानच्या ठिकाणी शहरामध्ये येत असत. तेव्हा सांगली हे संस्थान होते. संस्थानामध्ये कोकणातून आलेली ब्राह्मणाची तरूण मुलं होती, त्यांना पोट भरण्याचा उद्योग काय होता? तर मोठमोठ्या सरदारांच्याकडे किंवा पैसेवाल्यांच्याकडे पाणी भरायचे, पुरुषांची धुणी धुवायची- 'धोतरं बडवणं' असा शब्द त्या काळामध्ये होता- धोतरं बडवायची. ही ब्राह्मणाची मुलं, ब्राह्मणाच्याच घरात काम करणारी. फक्त ती श्रीमंतांच्या घरी काम करत होती आणि पोट भरायला आलेली होती. तेव्हा राजेसाहेबांनी सांगितले की, 'इथे बरीच पाणकी मुलं आहेत, त्या पाणक्या मुलांना तू हाताशी धर आणि तू ते नाटक बसवं.' त्याच्याबाबत मी सर्व विस्ताराने विष्णुदासांच्या चरित्रात लिहिलेलं आहे. नाटक बसवताना आता त्या नकला त्यांना पाठ करायला द्यायच्या. तर विष्णुदासांनी कधीही संपूर्ण संवाद लिहिले नाहीत, गाणी लिहिली आणि संवाद उस्फूर्तपणे म्हणायचे. कारण संवाद पाठ करायचे म्हटलं तर पात्रांना लिहिता-वाचता यायला पाहिजे आणि त्यांना तर लिहिता-वाचता येत नव्हतं. मग उस्फूर्तपणे संवाद बोलायचे. त्याचे साचे काही ठरलेले असायचे की, राजाने कसं बोलायचं, दासीने कसं बोलायचं, कोणी कसं बोलायचं... तमाशामध्ये जसं असतं तसं. तर त्याप्रमाणे ती मुलं उस्फूर्तपणे भाषण बोलायची. ब्राह्मणांच्या मुलांना सगळ्यांना लिहिता-वाचत येत होतंच असं नाही. पाठांतर येत होतं परंतु लिहिता-वाचता येत नव्हतं.

पाठांतर ही वेगळी गोष्ट आणि लिहिता-वाचता येणं ही गोष्ट वेगळी आहे. पाठांतरावर त्या काळात भर असायचा त्याचं महत्त्वाचं कारण असं की, लेखन-

वाचन ही फार दुर्मीळ गोष्ट होती. त्यामुळे मेकॉलेने शाळा काढल्यानंतरसुद्धा फार कमी माणसं शिकायला लागली. ज्यांना शहरामध्ये, शाळेमध्ये, कचेऱ्यांमध्ये नोकऱ्या मिळवणे शक्य होते ते ब्राह्मणांचे लोक हे प्रथम शिकायला लागले. ब्राह्मणांच्या बायकासुद्धा फार उशीरा शिकायला लागल्या असं आपल्याला दिसतं. त्याची पुष्कळ उदाहरणं आहेत. तर हा जो समज आहे की 'अभिजन' म्हणजे उत्तम कूळ असलेला, सभ्य, उच्च, सुसंस्कृत हे मापदंड मोजायचे कसे? हा प्रश्न आहे. मग ती मंडळी जी भाषा बोलत असत ती भाषा– ते ज्या घरामध्ये काम करत असत त्या घरातल्या लोकांची भाषा– आणि या कामकरी मुलांची भाषा याच्यामध्ये स्वभाविकच फरक पडत असे. खरे तर 'भाषा' ही एक मानीव संकल्पना आहे आणि 'बोली' हे वास्तव आहे. प्रत्यक्षामधे माणसं बोलतात आणि ते जे बोलणं आहे ते प्रत्येकाचं स्वतंत्र असतं म्हणजे 'पिंडे पिंडे मतिर्भिन्नं; कुंडे कुंडे नवा जलम्' तशी प्रत्येकाची बोलीची पद्धती ही वेगळी–वेगळी असते. समान स्तरामधून येणाऱ्या लोकांची बोली एकमेकांच्या जवळची असेल परंतु वेगळ्या परिस्थितीतून येणाऱ्या लोकांची आणखी वेगळ्या प्रकारची बोली असू शकते. म्हणजे शेतकऱ्याच्या घरातून येणाऱ्या मुलाची वेगळी असू शकेल आणि ब्राह्मणाच्या घरातून येणाऱ्या मुलाची वेगळी असू शकेल, पण बोली हे वास्तव आहे. 'प्रमाणबोली' आणि 'प्रमाणभाषा' याच्यातही अंतर आहे. कारण लिहित असताना कसे लिहायचे, 'हे असे झाले' व्याकरण सांगतं आम्हाला मोरोपंत दामल्यांचं! परंतु बोलताना माणूस कसा बोलतो सहजच 'हे असं झालं' म्हणजे 'प्रमाणबोली' आणि 'प्रमाणलेखन' याच्यामध्येही एक अंतर असतं. कळत–नकळत आणि म्हणून बोली हे वास्तव. मग 'भाषा' ही मानीव संकल्पना जर असेल तर 'बोली' हे प्रत्यक्ष चलन असतं आणि ते चलनामध्ये जोपर्यंत आहे तोपर्यंत ते टिकत असतं.

भाषा लिपिबद्ध होणे हा उद्योग त्या शिक्षणाच्या काळामध्ये सुरू झाला. लिहिता येणं आणि वाचता येणं आणि लिहिण्यासाठी लिपिबद्धता. लिपिबद्धता आली की काय होतं? बंदिस्ती येते भाषेला, बोलण्यामध्ये जी लवचिकता असते, ती लवचिकता लिहिण्यामध्ये नाहीशी होते. कारण प्रत्येकाची उच्चाराची पद्धती वेगळी असते. ही उच्चाराची पद्धती आपली उच्चारइंद्रिये आपण कशी वापरतो त्याच्यावर अवलंबून असते. म्हणजे एकाच घरामधल्या एकाच परिस्थितीमध्ये वाढलेल्या दोन व्यक्तींची उच्चारणाची शैली पूर्णपणे वेगळी असू शकते कारण, आपले दात, ओठ, जीभ, श्वास हे कोण कसे वापरते त्याच्यावर ते अवलंबून असते. आणि म्हणून 'बोली'

आणि 'भाषा' यातले अंतर आपण समजून घ्यावे. लिपिबद्धता आली की त्याचे प्रमाणिकरण करणे सोपे जाते लिहिण्यासाठी. म्हणून आपल्याकडे 'लेखन-वाचन म्हणजे लिहिता-वाचता येणं' म्हणजे शिक्षण ही मेकॉलेप्रणित पद्धती ज्या वेळेला रुढ झाली त्या वेळेला अगदी तथाकथित मध्यमवर्गीय पुणेरी बोली जिला 'शुद्ध बोली' असे म्हटले जाते किंवा 'प्रमाणबोली' असे म्हटले जाते तिला 'प्रमाणत्व' कशामुळे आले तर ते दोन-तीन गोष्टींमुळे आले. एक तर पुण्याला शेवटचे राज्यकर्ते होते, देशी राज्यकर्ते म्हणजे पेशवे. दुसरे- शिक्षणाची सुरुवात पुण्यामध्ये झाली. मुंबईमध्ये शिक्षणाची सुरुवात झाली ती मिशनरी लोकांनी केली. मिशनरी लोकांच्या शाळा पहिल्यांदा तिथे निघाल्या, बेळगावला मिशनरी लोकांच्या शाळा निघाल्या. बाबा पद्मनजी मिशनरी लोकांच्या शाळांमध्ये बेळगावला शिकले. आपले महात्मा जोतीबा फुले मिशनऱ्यांच्या शाळेमध्ये शिकले. त्यामुळे देशी लोकांनी ज्या शाळा काढल्या त्या एक तर संस्कृत शिकवणाऱ्या शाळा होत्या. तात्या पंतोजीची शाळा म्हणायचे त्याला. संस्कृत पाठशाळा. जिथे फक्त संस्कृतमध्ये आणि विशिष्ट स्तरातल्या मुलांना शिक्षण दिले जाते. तर लिपिबद्धता आली की भाषेला ती बंदिस्ती येते. 'पुणेरी बोली' ही मग 'प्रमाणबोली' अशी मानली गेली आहे दीर्घकाळपर्यंत. आणि असे म्हटले जाते की, पुण्याची माणसं सगळ्यात शुद्ध बोलतात. 'स्टँडर्ड डायलेक्ट', 'लँग्वेज' नाही. ती 'स्टँडर्ड डायलेक्ट' तिथले उच्चार हे प्रमाण उच्चार.

लहानपणासून मी पुण्यामध्ये मोठी झाले आणि पुण्यातली 'शुद्ध मराठी' ज्या प्रदेशामध्ये असते, म्हणजे भौगोलिक भागात ती शनिवार पेठ, नारायण पेठ आणि सदाशिव पेठ या तीनही ठिकाणची मराठी मी ऐकत आले आणि त्या ठिकाणी जे आधी राज्यकर्ते होते ते राज्यकर्ते कोकणातून आलेले पेशवे. त्यांच्या जातीची मंडळी मोठ्या प्रमाणामध्ये पुण्यामध्ये होती. आजही आहेत. आणि त्यामुळे 'ब्राह्मणीकरण, ब्राह्मणीकरण' असे ज्या वेळेला म्हटले जाते, तेव्हा प्रामुख्याने ब्राह्मणांचा हा वर्ग डोळ्यांसमोर असतो आणि ती मंडळी जे काही बोलतात ते प्रमाण! त्या मंडळींचे शिक्षण असेल ते प्रमाण! त्या मंडळींचे ज्ञान असेल ते प्रमाण! असे मानले जाते आणि ते मी ऐकत आले. त्या वेळेस माझ्या असे लक्षात आले की, या सगळ्या मंडळींचे बोलणेसुद्धा एकसारखे नसते. मी ज्या वाड्यामध्ये राहत होते- विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांच्या वाड्यामध्ये- तिथे अस्सल कोकणातून आलेलं एक बिऱ्हाड होतं आणि त्या कोकणातून आलेल्या बिऱ्हाडांच्यामध्ये त्या आजी वेगळ्या पद्धतीने बोलत होत्या, सून वेगळ्या पद्धतीने बोलत होती आणि

मुलाने एक व्यवसाय काढलेला होता तो दुकानात गेल्यावर तिथे वेगळ्या पद्धतीने बोलत होता. कारण कोकणातून आलेली ती बोली तो जर दुकानात बोलायला लागला असता तर त्याच्याकडे गिऱ्हाईक आले नसते. पुण्यामधले सर्वसामान्य माणसांचे जे बोलणे होते त्या वेळचे ते त्याला आत्मसात करणे भाग होते. तेव्हा तुम्हाला जगण्यासाठी आवश्यक त्या गोष्टींच्यावर भाषा अवलंबून असते की तुम्ही कुठल्या प्रदेशात राहता, आणि तुमच्या गरजा काय आहेत, आणि त्या कुठे पूर्ण होतात, त्याच्यावर अवलंबून असते? त्यामुळे जो लोकाचार असतो तो लोकाचार हा अधिक लवचिक असतो. ज्याला आपण लोकसंस्कृती म्हणतो तिची ती लोकभाषा असते प्रमाण, व्यवहारामध्ये असलेली; ती जास्त लवचिक असते. ती बदलती असते आणि त्यामुळे समग्र लोकसंस्कृती ही लवचिक असते, स्वाभाविक असते आणि प्रवाही असते म्हणजे ती बदलती असते, गरजेनुसार ती बदलत असते. आणि अभिजनांची जी भाषा, प्रमाणभाषा ती लिपिबद्ध झाली की तिला एक प्रकारची बंदिस्ती येते. द. ग. गोडसे हे लोकसंस्कृतीचे मोठे अभ्यासक त्यांनी दोन फार चांगले शब्द वापरलेले आहेत की, ''लोकभाषा आणि लोकसंस्कृती'' ही 'गतिमानी' असते आणि ती ज्या वेळेला अभिजनतेकडे जाते, नागरीकरणाकडे जाते त्या वेळेस ती 'गणितमानी' होते. ती 'गणितमानी' होते म्हणजे बंदिस्त होते आणि मग ती सगळ्या पातळ्यांच्यावर 'गणितमानी' होते. त्याचे एक उदाहरण- त्याच काळामध्ये संगीत नाटके होत असत. सुरुवातीला संगीत नाटकांचे आपण वर्णन असे ऐकतो किर्लोस्करांच्या काळामध्ये की रात्र रात्र संगीत नाटकं चालायची आणि एखादं गाणं म्हणण्यामध्ये तो जर गायक रंगला तर तो दोन-दोन तास एक गाणं म्हणायचा वगैरे, त्याला 'वन्समोअर' मिळत रहायचे.

मुंबईला गिरण्या-कारखाने आले आणि कचेऱ्यांच्यामधून लोकं कामे करायला लागले तेव्हा कचेऱ्यांची वेळ सकाळी ९ ते ५ अशी ज्या वेळेला ठरली त्या वेळेला सकाळी ९ ला जर घराच्या बाहेर पडायचे असेल तर पहाटे पाचपर्यंत 'प्रिये पहा.. गाणं' ऐकून घरी जाऊन झोपून पुन्हा ताजंतवानं होऊन कचेरीमध्ये जाऊन काम करणं हे अशक्य झालं. परिणाम असा झाला की, मुंबईला पोलिसांनी कायदा केला की रात्री १२ च्या पुढे नाटकाचा प्रयोग चालता उपयोगी नाही. हे कशामुळे झालेले आहे? हा लोकाचार जो आहे तो लोकाचार जसा 'गणितमानी' होत जातो तसा जीवनाच्या सर्व अंगावर त्याचा परिणाम होत असतो. त्याचा भाषेवर परिणाम होत असतो, जगण्यावर परिणाम होत असतो, सगळ्या यंत्रणेवर परिणाम होत असतो. मग आपल्याला

असे दिसते की मुंबईच्या भाषेचे चलन आणि पुण्याच्या भाषेचे चलन ह्याच्यामध्येही फरक पडलेला आहे. मुंबईच्या जीवनाचे चलन आणि पुण्याचे चलन याच्यामध्ये फरक पडलेला आहे. दुसरी गोष्ट अशी की, मुंबईमध्ये जो समाज होता तो निरनिराळ्या जाती–जमातींचा संमिश्र समाज होता आणि तो अधिक संपन्न होता. पुण्यामध्ये तसे नव्हते. पुण्यामध्ये एका विशिष्ट स्तरातीलच लोक होते आणि ते ज्याला आपण 'धनवान' म्हणू असे फक्त पेशवाईमधून आलेले सरदार जे होते ते फक्त धनवान सरदार होते. सरदार–दरकदार होते ते! पण तेसुद्धा उत्तरेकडेच नंतर जाऊन राहिले मध्यप्रदेशामध्ये!

तर सांगायचे तात्पर्य तुमचं जगणं हे अनेक गोष्टींशी बांधलेले असते आणि त्याच्यातून ती भाषा घडत असते, तेव्हा लोकसंस्कृती ही गतिमानी असते, तिची एक गती असते लवचिकता असते. ती अनेक गोष्टींच्यावर अवलंबून असते तुमच्या उपजिविकेच्या साधनांच्यावर अवलंबून असते आणि अभिजनांची जी शैली असते ती गणितमानी असते. अमुक वाजता उठायचं, तमुक वाजता पूजा करायची, तमुक वाजता जेवण करायचं हे असे त्यांनी आपल्याला गणितामध्ये बांधून घेतलेले असते. इतर व्यावसायिकांना तसे चालतंच असं नाही. ज्या वेळेला नोकरीपेशावर लोकांवर अवलंबून राहण्याची वेळ आली त्या वेळेला मग ही गणितं सुरू झाली. शाळा सुरू झाल्या. महाविद्यालये सुरू झाली, कचेऱ्या सुरू झाल्या मग दुकाने अमुक वाजता उघडायची, दुकाने तमुक वाजता बंद करायची हे चालू झाले. आमच्या लहानपणी गावामधल्या वाण्याचं दुकान जवळ जवळ २४ तास उघडे असायचे. केव्हाही गेले तरी! त्याच्यानंतर त्याच्यावर बंदिस्ती आली. त्याच वाण्याचं पुण्यामध्ये दुकान बुधवार पेठेमध्ये झाले, त्या वेळेस त्याच्यावर वेळेची बंदिस्ती आली. तर ही छोटी छोटी उदाहरणं सांगते जी मी अनुभवली ती, की, गतिमानी आणि गणितमानी याच्यातला फरक हा जीवनशैलीतील फरक होय.

दुसरी गोष्ट, 'अभिजन' म्हणजे उत्तम कुळ असलेली! आता 'उत्तम कुळ' हे कोण ठरवणार? म्हणजे ब्राह्मणाचे कुळ ते तेवढे उत्तम कुळ का? जे राज्यकर्ते मध्ययुगातले होते ते सगळे सरंजामशाही राज्यकर्ते होते. मराठा राज्यकर्ते होते, धनगर राज्यकर्ते होते मोठ्या प्रमाणावर आणि ते स्वत: जास्त कुलीन होते, जास्त सुसंस्कृत होते. म्हणजे मराठा घराण्यातल्या स्त्रिया आणि पुरुष यांचं जे वर्तन असेल, वागण्याची जी पद्धत असेल ही जास्त मर्यादित अशी होती– विशेषत: स्त्रियांच्या बाबतीमध्ये– तर मग ब्राह्मणांच्या स्त्रिया फक्त कुलीन स्त्रिया आणि मराठा स्त्रिया ह्या अकुलीन म्हणायच्या का? मराठा लोकांचे उलट म्हणणे असे की,

आमच्या स्त्रिया जास्त कुलीन आहेत का, तर त्यांच्या डोक्यावरच्या पदरातून त्यांचा केससुद्धा दिसत नाही. कुलीनाच्या संकल्पना ह्या प्रत्येक स्तरामध्ये वेगळ्यावेगळ्या असतात. नऊवारी साडी नेसल्यानंतर पायाचा घोटासुद्धा दिसता उपयोगी नाही अशा प्रकारे साडी नेसणे हे कुलीनतेचे लक्षण होते. तर अशा कुलीनत्त्वाच्या कल्पना ज्या आहेत त्या कल्पनासुद्धा बदलत्या असतात. जात–जमाती नुसार बदलत्या असतात. म्हणून 'उत्तम कुळं म्हणजे काय? हे कुणी ठरवायचे? परंतु आमच्याकडे एक समज असा आहे की, ब्राह्मणाचं कूळ जे उत्तम कूळ! का? मनुस्मृतीने ते सांगितलेलं आहे म्हणून. म्हणून ते सगळ्यामध्ये उत्तम कूळ. आणि अभिजाततेचे, उच्चत्व, कुलीनत्व, सुसंस्कृतता यांचे निकषसुद्धा त्यांनी ठरवलेले आहेत. बाकीच्यांच्यावर ते लादले जाण्याची शक्यता आपल्याला दिसते.

इंग्रजोत्तर काळामध्ये जो ब्राह्मण वर्ग शिकायला लागला, नोकरी करायला लागला, शहरामध्ये स्थिरस्थावर व्हायला लागला, आर्थिकदृष्ट्या तो स्थिर झाला त्यांनी जी काही आपली जीवनशैली निर्माण केली ती जीवनशैली समाजामध्ये आदर्श ठरली आणि आजही त्यालाच बरचसं महत्त्व दिले जाते. प्रत्येकाचे प्रयत्न मध्यमवर्गीय ब्राह्मणीकरणाचा असतो. तो कुठपर्यंत असतो? बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार केला, जागृती केली, ते शिकले, त्यांना नोकऱ्या मिळायला लागल्या, ते आर्थिकदृष्ट्या सुस्थिर झाले, त्यांची घरंदारं बदलली, घरातले चलन बदलले आणि मग त्यांच्यावर टीका व्हायला सुरुवात झाली. त्यांच्यातल्याच एका वर्गाने सुरुवात केली की हे 'डीबी' झाले. 'डीबी' झाले म्हणजे 'दलित ब्राह्मण' झाले. आमचे विलास वाघ हे एक फार मोठे विचारवंत आणि क्रांतिकारक प्रकाशक होते. ते दरवर्षी एक विशेष अंक काढत असत. एक वर्ष त्यांनी 'डीबी' या विषयावर एक विशेष अंक काढलेला होता आणि काही प्रश्नावली त्यांनी दिलेली होती. त्या प्रश्नावलीमध्ये त्यांनी विचारले होते की, 'दलितांचं ब्राह्मणीकरण होत आहे मोठ्या प्रमाणावर हे योग्य आहे की अयोग्य आहे?' माझं म्हणणं असं आहे की, 'ब्राह्मणीकरण होत आहे म्हणजे काय होत आहे नेमकं?

दलितांचे ब्राह्मणीकरण होण्याची जी पद्धती आहे ते ब्राह्मणीकरण नसतं, आपल्यापेक्षा जे उच्च आहेत त्यांचे नुसत अनुकरण करणे हे ते असते. मग आमची जी ब्राह्मण मंडळी होती ती ब्राह्मण मंडळीसुद्धा ज्या वेळेला साहेबाची नोकर झाली– इंग्रज ऑफिसर ज्या वेळेला आले ते मग कलेक्टर असतील, गव्हर्नर असतील आणखीन कोणी असतील. त्यांच्या हाताखाली काम करणारी जी ब्राह्मण

मंडळी होती ती साहेबाचं अनुकरण करायला लागली. त्यामुळे आमच्या सगळ्यांच्या घरामध्ये खाली बसून स्वयंपाक करायचे कट्टे नाहीसे झाले आणि उभ्याने स्वयंपाक करायचे कट्टे सगळीकडे आले. खाली बसून पाट मांडून जेवण्याची पद्धती नाहीशी झाली आणि टेबलावर बसून जेवणाची पद्धती सुरू झाली, ही कशामुळे झाली? तर या ब्राह्मणांचे 'साहेबीकरण' झाले असे मी म्हणते आणि आमच्या देशातून जसजसा साहेब गेला तसतसे या देशातल्या लोकांचे जास्तच 'साहेबीकरण' होतंय की काय, असा माझ्यापुढे आज प्रश्न पडतो आहे. कारण गेल्या दोनशे वर्षापूर्वीचे आता आमच्या घरातसुद्धा काय राहिले आहे? स्वयंपाकघर ते शौचालयापर्यंत आणि अंगावरच्या सर्व कपड्यांपासून ते बैठकीपर्यंत सर्वांचे 'साहेबीकरण' झाले आहे. आजसुद्धा आमची बरीच मुलं परदेशामध्ये जातात आणि परदेशामध्ये गेल्यानंतर तिथल्या जीवनशैलीचं अनुकरण करतात. कारण त्यात एक प्रतिष्ठा आहे. त्यांना त्यांच्यामध्ये जर मिळून-मिसळून रहायचं असेल आणि प्रतिष्ठा मिळवायची असेल तर त्यांचे अनुकरण करायला पाहिजे. त्यामुळे नेहमी आपल्यापेक्षा ज्याला प्रतिष्ठा मिळते आहे त्याचे अनुकरण करण्याकडे एक ओढा असतो. तर हे प्रमाणभाषेच्या बाबतीतच होतं असते असे नाही तर 'प्रमाण रहाणीमानां'कडे जायला लागते आणि मग हे रहाणीमान सर्व पातळ्यांच्यावर येत असते. म्हणून लोकसंस्कृती आणि अभिजन संस्कृती याच्यातल्या सीमारेषा पुसट व्हायला लागतात बऱ्याच वेळेला. मग ग्रामीण भागातली मंडळी शहरीकरणाकडे जायला लागतात, त्यांचे अनुकरण करायला लागत असतात. ब्राह्मणी मध्यम वर्ग आणि राजघराणी, संरजामशाही राजघराणी यांच्यामध्ये जे मधल्या काळामध्ये जे द्वंद्व सुरू झाले त्या वेळेस उच्च कुलीन नेमकं कोण, अशा प्रकारचे प्रश्न निर्माण व्हायला लागलेले आहेत. आणि म्हणून 'प्रमाणबोली'बद्दल आणि 'प्रमाणभाषे'बद्दल एकच एक अशा प्रकारचं विधान करता येणं हे जवळजवळ अशक्य आहे असे वाटते.

जितक्या बोली जास्त तितकी प्रमाणभाषा जास्त समृद्ध होत असते. प्रमाणबोली कितीही 'प्रमाणबोली' म्हणायचं म्हटलं तरीही ती प्रमाणबोली रहात नाही आणि मराठीमध्ये किंवा जगाच्या पाठीवरच्या कुठल्याही भाषेमध्ये 'बोली' या मोठ्या प्रमाणावर असतात. तशा मराठीमध्ये मोठ्या प्रमाणावर बोली आहेत. आता कालपरवाच एका मुलाने मराठीतल्या निरनिराळ्या बोलींमधला एक कथासंग्रह निर्माण केला. निरनिराळ्या बोली. आणि मग मराठीमध्ये किती बोली असाव्यात- तीस-पस्तीस बोलींच्यामधल्या कथा त्याने निरनिराळ्या शोधून काढल्या. त्या मराठीच्या

बोली आहेत. म्हणजे थोडासा प्रयत्न केला तर आपल्याला त्या सगळ्या समजू शकतात. बोलीमुळे प्रमाण मराठी भ्रष्ट होते का? असा एक प्रश्न मग निर्माण होतो. ज्या वेळेला बहुजन समाजातली माणसं निरनिराळ्या क्षेत्रांत यायला लागली– विशेषत: शिक्षणाच्या क्षेत्रात, राजकारणाच्या क्षेत्रात यायला लागली, त्या वेळेला मध्यवर्ती पुणेरी बोलीवाल्या मंडळींना अस्वस्थता वाटायला लागली– आणि ती अस्वस्थता कशासाठी वाटायला लागली तर, त्यामुळे मराठी भाषा भ्रष्ट होते आहे! आता ही बहुजन समाजातली माणसं ही शिक्षणाच्या क्षेत्रात येत आहेत, त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावतो आहे अशी आजही तक्रार आहे बऱ्याच लोकांची. जणू काही जोपर्यंत उच्चवर्णीयांमधलीच माणसं शिकत होती तोपर्यंत दर्जा हा फार उच्च होता, असं लोक समजत होते की काय? ज्या वेळेला जुनं साहित्य आपण बारकाईने वाचू त्या वेळेस असे लक्षात येते की, शिक्षणाच्या क्षेत्रात काय किंवा इतर क्षेत्रांत काय, आज जसे 'पाट्या' टाकणारे लोक आहेत, तसेच त्या काळातही उच्चवर्णीय होते, नुसते पाट्या टाकणारे. ते स्वत: विद्वान असतील परंतु विद्यार्थ्यांना त्यांचे बोलणे कळत असेलच, त्यांचं शिकवणं कळत असेलच असे नाही.

वि. का. राजवाड्यांच्यासारखा विद्यार्थी– विश्वनाथ काशीनाथ राजवाडे जे 'इतिहासाचार्य' म्हणून प्रसिद्धीस आले– त्यांनी त्यांच्या वेळच्या महाविद्यालयातल्या– डेक्कन कॉलेजचे ते विद्यार्थी– तिथे त्यांनी वर्णन लिहून ठेवलेले आहे, की तिथे आम्हाला जे देशी शिक्षक शिकवत होते, कुठल्याही विषयाचे, त्यांचं शिकवणे आम्हाला काही कळत नव्हते. पण युरोपीय मंडळी आम्हाला शिकवत होती ते अतिशय उत्तम तयारी करून येऊन आम्हाला शिकवत होती. आता त्या वेळेला डेक्कन कॉलेजमध्ये शिकवणारे शिक्षक तर सगळे उच्चवर्णीयच असणार. महाविद्यालयातले किंवा न्यू इंग्लिश स्कूलमधले. सांगायचं तात्पर्य की, अमुक जातीचेच शिक्षक आले किंवा अमुक जातीचेच लोक आले की दर्जा खालावतो किंवा उंचावतो असे नाही. त्या त्या क्षेत्रामध्ये वेगळी वेगळी गुणवत्ता लागते आणि ती गुणवत्ता असेल तर तो दर्जा टिकत असतो, हे आपल्याला आजही दिसते. कारण ग्रामीण भागामध्ये अनेक दलित शिक्षकांच्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे कल्याण झालेले आपल्याला आजही विद्यार्थी सांगतात आणि आदिवासी भागांच्यामधले शिक्षक आजही आदर्श शिक्षक म्हणून तिथे काम करताना दिसतात. त्यामुळे भाषेमुळे किंवा इतर जाती-जमातींच्या लोकांना जी तथाकथित 'अभिजात' भाषा येत नाही म्हणून काही तरी नुकसान होत आहे, ही जर संकल्पना मध्यमवर्गीयांच्या मनामध्ये असेल

तर ती चुकीची आहे. डॉक्टरच्याबाबतीतही तसेच किंवा इतर कुठल्याही पेशाच्याबाबतीमध्ये तसेच आहे. शेवटी हा नैतिकतेचा प्रश्न असतो. एक डॉक्टर नीतीमान असणे आणि अनितीमान असणे हे जुन्या काळामध्येही होत होते आणि नव्या काळामध्येही होत असणार. त्यामुळे इंग्रजोत्तर काळातील मध्यमवर्गाच्या मनाने काही अपसमज निर्माण केलेले आहेत त्या अपसमजातून आपण बाहेर यावं; त्या शिवाय आपल्याला या प्रमाण लेखनाचासुद्धा नीटसा उलगडा होईल असे वाटत नाही.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट. लोकपरंपरा आणि अभिजन परंपरा याच्याबाबतीमध्ये एक स्पष्टीकरण असे की, लोकपरंपरा ही बहुजन समाजाची काही तरी अडाणी लोकांची परंपरा होय, असा एक सर्वमान्य समज आहे. आपण पाहिले की 'लोकसाहित्य' या शब्दासाठी जे निरनिराळे पर्यायी शब्द वापरलेले आहेत त्यात दुर्गाबाई भागवतांनी 'फोकलोर'साठी 'लोकसाहित्य' हा शब्द रूढ केला, बाकीच्यांनी निरनिराळे शब्द वापरले होते. गोमंतकामध्ये जो एक शब्द वापरला जातो तो मला मोठा अन्वर्थक वाटतो. लोकसाहित्याला तिथे 'लोकवेद' असे म्हटलेले आहे. आमच्या सरोजिनीबाई बाबरांनी स्त्रियांच्या ओव्यांचा जो संग्रह केलेला आहे त्याच्यासाठी त्यांनी नाव दिलेले आहे 'जन लोकांचा सामवेद'. 'वेद' म्हणजे 'ज्ञान'. वेद म्हटले की आम्हाला फक्त ब्राह्मणी परंपरेतले चार वेद आठवतात आणि सगळं ज्ञान जे काही असेल, विद्वत्ता जी काही असेल ती त्या वेदांच्यामध्ये आहे. अशी आमची धारणा. मी ज्यांच्या सहवासामध्ये लहानाची मोठी झाले आणि ज्यांचा मला चांगला सहवास मिळाला ते विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव ज्यांनी चारही वेदांची भाषांतरे केलेली आहेत. तर त्यांनी अथर्व वेदाच्या प्रस्तावनेमध्ये म्हटलेले आहे की, 'अथर्व वेद हे जगाच्या पाठीवरचं पहिलं लोकसाहित्य आहे.' त्यांनी असं का म्हटलं? तर अथर्व वेदामध्ये– ज्याला आपण लोकपरंपरेमधले तोडगे, शुभाशुभ कल्पना, उतारे–पातारे म्हणतो– हे सगळं त्या वेदामध्ये आहे, आणि ते जणू काही लोकपरंपेमधूनच आलेले आहे.

हल्ली काळी जादू किंवा 'ब्लॅक मॅजिक' म्हटलं जातं. खरं म्हणजे शुभ–अशुभ कल्पना, तोडगे हे जगाच्या पाठीवरचे सगळे लोक आचरणात आणत असतात आणि या शुभ–अशुभ कल्पना सर्वत्र असतात. 'काळी जादू'सुद्धा. मी गंमत म्हणून सांगते फक्त की, युरोपमध्ये म्हणजे इंग्लंडमध्ये १३ हा आकडा अशुभ मानला जातो. आता गंमत अशी होते की एका ठिकाणी जी शुभ किंवा अशुभाची कल्पना असेल तिचा प्रसार नकळत सगळीकडे होतो. तेव्हा युरोपमध्ये म्हणजे इंग्लंडमध्ये

१३ हा आकडा अशुभ मानला जातो, त्याचे अनुकरण अनेकजण करीत आहेत. मी ज्या वेळेला इंग्लंडमध्ये गेले आणि हिथ्रोच्या विमानतळावर उतरले तेव्हा मी कुठे तरी वाचलेलं होतं की, तिथे १३ नंबरचं विमानाचं डेकच नाहीये! मग मी सबंध तो विमानतळ हिंडून पाहिले आणि खरोखरच १३ नंबर नाहीये तिथे. हा आता सगळ्यात प्रगत झालेला देश असं आपण म्हणतो, ज्या इंग्लंडचं आपण अनुकरण करत आलो, त्या देशामध्येसुद्धा या शुभ-अशुभ कल्पना आजपर्यंत असतील, तर आपण काय करायचं? तर त्यामुळे त्या जगाच्या पाठीवर सगळीकडे असतात. तोडगे वगैरे फक्त अथर्ववेदामध्ये नाही. तर बाकीच्या वेदांच्यामध्येसुद्धा अशा प्रकारचे तोडगे खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. 'लोकसाहित्याच्या पाऊलखुणा' पुस्तकामध्ये एक उदाहरण त्याचं खूप मोठं दिलेलं आहे. सवतीबद्दलचा आकस ऋग्वेदामध्ये आहे, अथर्ववेदामध्ये तीच ऋचा आहे परत. म्हणजे एका वेदामध्ये जी ऋचा असेल ती दुसऱ्या वेदामध्ये पुनरूक्त होताना आपल्याला अनेकदा दिसते. 'सपत्नीनाशन सूक्त' ही ती ऋचा! 'सवतीचं वाटोळं होऊ दे,' अशा प्रकारचा मंत्र. ऋचा म्हणजे मंत्र. आता अशा प्रकारे सवतीबद्दलचा आकस हे तुमच्या-माझ्या लोकपरंपरेमधून सारखंच चाललेलं असतं. 'सवतीचं भांडण आणि राळ्याचं कांडण संपता संपत नाही,' अशा प्रकारच्या म्हणी पण असतात तिथे. आता हे एका वेदामध्ये एक ऋचा म्हणून त्या ऋषीला का घालावसं वाटलं, असा माझ्यापुढे प्रश्न उभा ठाकला. कारण एकीकडे आपण म्हणतो की, वेदकाळामध्ये स्त्रियांना फार मोठे स्वातंत्र्य होते. हा आपला समज आहे, उच्चकुलीनांचा. जर तिथे एवढे स्त्रियांना स्वातंत्र्य असेल आणि स्त्रियांना जर एवढा सन्मान असेल तर मग तिथे सवतीची कल्पना कशी आली? आणि ज्या समाजामध्ये सवत ही प्रथा चालू आहे तिथे स्त्रियांना सन्मान आहे असे म्हणायचे का, असे प्रश्न निर्माण होतात. आंधळेपणाने त्या परंपरेचा अभ्यास करणाऱ्यांच्या मनामध्ये असे प्रश्न येत नाहीत. बरं हे तिथेच थांबते का? मी जे सातत्याने म्हणत आहे की, 'अभिजन ते लोक' हा एक सरळ प्रवाह आहे. अभिजनांच्यामध्ये ज्या धारणा आहेत, त्या तुमच्या-माझ्यामध्ये आजतागायत सरळ चाललेल्या आपल्याला दिसतात.

बंगालमध्ये आशापूर्णादेवी नावाच्या एक मोठ्या कादंबरीकार होऊन गेल्या. त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे. त्या आशापूर्णादेवींची 'प्रथमप्रतिश्रुती' नावाची कादंबरी गाजलेली कादंबरी आहे. त्या 'प्रथमप्रतिश्रुती'मधली जी नायिका आहे, ती एक छोटी मुलगी आहे आणि अत्यंत निरागसपणाने ती सगळी वर्णनं करते आहे. ती तिच्या सासरी जाते आहे आणि सासरची वर्णनं करते आहे. सासरी

गेल्यानंतर तिला एक व्रत करावं लागतं, सगळ्या बायका करतात. नवऱ्या मुलीलाही ते व्रत करावं लागत. आपल्याकडे कसं मंगळागौरी, हरितालिका करतात तसे ते व्रत करावे लागते! व्रत काय आहे? तर त्या व्रताला विशिष्ट नाव आहे. 'सेंजुती व्रत' असे त्याचं नाव आहे. ते व्रत करता करता एक मंत्र म्हणावा लागतो. ते व्रत म्हणजे असे की रांगोळी काढायचे, त्या रांगोळीमध्ये घरातल्या सगळ्या वस्तू- बायकांच्या स्वयंपाकघरामध्ये ज्या लागतात- चूल असेल, उलथनं असेल, पळी असेल, झारा असेल, तवा असेल, ताटली असेल- त्या रांगोळींने मुली काढतात आणि मग त्याच्या प्रत्येकीच्या पाठीमागे तिथल्या बोलीभाषेतले मंत्र म्हणतात. आता बोलीभाषेतले मंत्र म्हणजे काय? 'पळी पळी पळी, बसू दे सवतीची दातखिळी' असले ते मंत्र. त्या सेंजुती व्रतामध्ये अशी एकएक वस्तू रांगोळीने काढायची आणि त्या बोलीभाषेतमधून त्या सवतीला एक शिवी घालायची आणि तिचं वाटोळं होऊ देत अशा प्रकारची इच्छा व्यक्त करायची. आता ती छोटी मुलगी आहे तिच्या असं लक्षात येतं की त्या घरामध्ये तिचा एक दीर आहे आणि त्या दीराचं त्या सासऱ्यांनी दुसरं लग्न लावून दिलेलं आहे, पहिली बायको असताना. आणि मग ती छोटी मुलगी विचारते, 'मग त्या पहिल्या वहिनीला काय वाटत असेल? तिने पण दुसऱ्या वहिनीला अशाच शिव्या घालायच्या का?' ज्याला आपण 'स्त्रीवाद' म्हणू हा कसा हळूच आलेला आहे तिथे बघा त्या सेंजुती व्रतामध्ये. तिचं वाटोळं कसं होऊ दे, तिला गर्भ कसा न राहू दे, त्या गर्भाचं कसं वाटोळं होऊ दे हे त्या संस्कृत मंत्रात आहे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी त्यांनी कादंबरी लिहिली त्या वेळेस ते व्रत चालू होते. आता त्याच्या पुढचा टप्पा आमच्या जात्यावर दळण दळणाऱ्या बायका. या जात्यावर दळण दळणाऱ्या बायका सवतीच्या नावाने खडे फोडताना त्या ओव्यांच्यामधून दिसतात आणि सवतीवर लेक देणारा बाप, नवरा, भाऊ या सगळ्यांना त्या दूषणं देताना दिसतात. म्हणजे एकीकडे वेदामधली ती ऋचा आणि दुसरीकडे लोकपरंपरेमधले हे व्रत, तिसरीकडे जात्यावर ओव्या म्हणणाऱ्या या बायका आणि चौथीकडे प्रत्यक्षात तुमचा- माझा अनुभव. द्विभार्या प्रतिबंधक कायदा झाला आणि काहीही झाले तरी कित्येक बायकांच्या पाठीमागची ही भीती संपलेली आहे का? नाही संपलेली अजून. कारण कुठल्याही क्षणी तो नवरा आपल्यावर दुसरी कोणीतरी सखी, मैत्रीण (सवत) आणू शकेल, अशी एक सुप्त भीती त्या बाईच्या मनामध्ये असू शकते.

'आदिम ते अद्यतन्' हा तो प्रवाह आहे परंपरेतला. बऱ्यावाईट सगळ्या गोष्टींचा शोध घेणं हा एक माझा उद्योग आहे आणि तो अनेकांना करता येतो आणि अनेकांनी तो केलेला आहे. सामाजिकतेच्या पातळीवर आपल्याला असे दिसते की, अनेक देवदेवतांच्याबाबतीमध्ये या बहुजनांच्या देवता, या 'खालच्या लोकांच्या' देवता, या उच्चवर्णीयांच्या देवता वगैरे वगैरे म्हणतात. आता काय आहे की, दर खेपेला असे असतच असं नाही. उदा. खंडोबासारखा देव किंवा रेणुकेसारखी देवी हे कुळाचे मूळ कुळदेव भटक्या जातींपासून उच्च जातीपर्यंत सर्वत्र असतात. पण हे सर्वच कुळदेवतांबाबत नसते. पुष्कळदा काय होते की, सर्वसामान्य माणसांच्या ज्या देवता आहेत, त्या देवता अतिशय लोकप्रिय असू शकतात. नुसत्या लोकप्रिय असतात असे नाही, त्यांच्या जत्रा-यात्रा मोठ्या प्रमाणावर भरतात. जत्रा-यात्रा मोठ्या प्रमाणावर भरल्या की काय होते की त्या देवतास्थानांना उत्पन्न मोठ्या प्रमाणावर मिळायला लागतं. मग अशा वेळेला जो उच्चवर्णीय समाज असतो तो उच्चवर्णीय समाज त्या देवतेला पहिल्यांदा हिणकस मानायचा प्रयत्न करतो. ती कशी टाकाऊ आहे, ती शूद्र लोकांची देवता आहे, अशा प्रकारच्या भावना प्रस्तुत करण्याचा प्रयत्न होतो. तरीसुद्धा लोकांच्यामधून तिची लोकप्रियता कमी होत नाही, मग काय करायचं? तर आपण त्याच्यात शिरायचं आणि मग आपणही त्या देवतेची उपासना करायला लागायचं आणि त्या देवतेला उचलून धरायला लागायचे! त्याला 'उन्नयन प्रकिया' असे म्हटलेले आहे. एम. एन. श्रीनिवासन नावाचे एक समाजशास्त्रज्ञ होते, त्यांनी म्हटलेले आहे की, भारतामध्ये ही प्रक्रिया अखंड चालत आलेली आहे आणि ती संस्कृतीच्या सर्व अंगांत चालत आलेली आहे. एखादी चाल, रीत, रूढी या सगळ्यांच्या बाबतीमध्ये. पहिल्यांदा तिला हिणकस मानायचा प्रयत्न करायचा, उच्छेद करायचा प्रयत्न करायचा आणि उच्छेद होत नाही म्हटले की तिला उचलून धरायचे आणि तिचा स्वीकार करायचा... तिचा स्वीकार केला की काय होते, तिच्या उपासनेमध्ये आपल्याला शिरता येते आणि त्या उपासकांच्यामधले जे महत्त्वाचे स्थान आहे ते उच्चवर्णीयांना पटकावता येते. असे किती तरी मंदिरांच्याबाबतीत आणि देवतांच्याबाबतीत आपण बारकाईने अभ्यास केला तर आपल्याला दिसते.

एक खूप मोठं उदाहरण आपल्या सगळ्यांना माहिती असेल की, 'गणपती' ही देवता ही मुळामधली आदिम समाजामधली उग्र देवता. मुळात गणपती 'विघ्नकारक' आहे त्याला 'विघ्नहारक' केला. देवीप्रसाद चटोपाध्याय यांच्या 'लोकायत' या पुस्तकाचे एक सुलभ असे मराठीकरण स. रा. गाडगीळांनी 'लोकायत' याच नावाने

केलेले आहे. त्याच्यात ही सगळी वर्णने केलेली आहेत. सबंध संस्कृतीमध्ये अभिजन मंडळी ही लोकपरंपरेतल्या अनेक फायद्याच्या गोष्टी उचलतात. त्या देवता उचलतात, भाषा उचलतात, पोशाख उचलतात, चालीरीती उचलतात आणि दागिने उचलतात... काय उचलत नाहीत! आणि मग त्याला एक प्रतिष्ठेचं स्थान देत असतात. याची कितीतरी उदाहरणे आपल्याला सांगता येतील.

माझ्या अनुभवातले एक छोटसं उदाहरण सांगते. आमच्या कुळदेवतेसंबंधी आमच्या आईने सांगितले होते की, आपली कुळदेवता फिरंगाई नावाची देवी आहे. आता ही फिरंगाई देवी आली कुठनं, नावसुद्धा बघा तिचं– फिरंगाई. दौंडच्या जवळ कुरकुंभ नावाच्या गावामध्ये ती फिरंगाई देवी आहे. तर मग आमच्या भावाचं लग्न झाल्यानंतर आई म्हणाली की तू त्यांच्याबरोबर जा. त्यांना काही कळत नाही. आता मला तरी कुठे माहीत होतं फिरंगाई देवी वगैरे. आम्ही आपले गेलो दौंडला आणि मग कुरकुंभला गेलो. मला भटांनी दाखवलं एक खूप मोठं मंदिर पेशवाई पद्धतीचे, दगडी बांधकाम केलेले, छानसं सजवलेलं आणि तिथे देवीची अतिशय चांगली मूर्ती. बाजूला शंकराचं देऊळ. ह्या देवीचीपण मूर्ती त्या ठिकाणी होती. ती मूर्ती पाहिली आणि मी म्हटले ही तर लोकदेवता आहे. मी म्हटले एवढी सुबक मूर्ती आणि एवढे सुंदर देऊळ हे लोकदेवतेचं कसं? कारण लोकदेवता म्हणजे आदिम स्त्रीदेवता, विशेषत: या अनघड तांदळ्याच्या स्वरूपामध्ये असतात. म्हणजे ओबडधोबड अशा प्रकारचा तो दगड असतो आणि मग त्याला शेंदूर लावून नाक, डोळे वगैरे असं काही तरी अलंकार वगैरे सजवलेले असते माणसांनी आपल्या कल्पनेप्रमाणे आणि असा तो अनघड तांदळा कुठल्या तरी देवळीमध्ये ठेवलेला असतो. त्याचे उपासक हे सहसा ब्राह्मण नसतात. जातीपातींची जी कोंडाळी आहेत आपल्याकडे ती फार मोठी विचित्र आहेत. त्यामुळे मी चौकशी केली, की ही मूर्ती पहिल्यापासूनची आहे का? अमुक आहे का, तमुक आहे का? कारण शंकराचा पुजारी गुरव आणि त्या देवीचा पुजारी एक ब्राह्मण होता. मी म्हटलं हा गुरव आहे, इकडे हा ब्राह्मण आहे, हे दोघेजण एकत्र कसे काय नांदतात? मी म्हटले या देवीचे मूळ ठाणं दुसरीकडे कुठे आहे का? मग त्यांनी मला सांगितलं– ती एक बाई होती– ती म्हणाली, 'आहे ना! त्या टेकडावर आहे.' मग भावाला म्हटलं 'चल'. ते कोणी यायला तयार नाही, म्हणे 'आता झाले देवीचे दर्शन!' म्हटलं, तुम्ही करा मी जाते.

मी त्या टेकडीवर गेले, त्या टेकडीवर एक घुमटी होती आणि त्या घुमटीच्या आत एक अनघड तांदळा होता. तिथे एक बाई बसलेली होती. श्रमकरी वर्गातली

ती बाई होती, तिच्या पोशाखावरनं ध्यानात येत होतं. तिला मी म्हटले की, हे काय आहे? ती म्हणाली, 'हीच न्हवका फिरंगाई! हे मूळ ठाणं आहे आणि ते बामणांनी पळवलेलं ठाणं आहे' म्हणाली. मग म्हटलं, 'तुम्ही कोण आहात आजी? 'मी मातंगी नाही का गं आवशे'! तिला आपली जातपात सांगायला काही शरम वाटली नाही. ती म्हणाली– मी मातंग समाजाची बाई आहे आणि मुळामध्ये ही आमची देवी आहे आणि ती बामणांनी तिथं पळवली आणि तिथं त्याला बक्कळ पैसे मिळायला लागले. आता इथे या देवीच्या दर्शनाला कुणीच येत नाही, तुमच्यासारखीच अशी एखादी बाई येते नाहीतर कोणी येत नाही. एखाद्या देवतेचं उदात्तीकरण करून ती देवता आणि तिच्या उत्पन्नाची स्थानं आपल्या स्वाधीन करून घेणे, हा एक संस्कृतीच्या प्रवासातला मोठा टपा आहे आणि 'लोकायत'मध्ये देवीप्रसाद चटोपाध्यायांनी आणि स. रा. गाडगीळांनी खूप विस्ताराने तो मांडलेला आहे. त्यातला एक माझा छोटासा अनुभव फक्त सांगते. या लोकमंदिरांचे मग जीर्णोद्धार होतात. कोकणामध्ये अशा आपल्याला बऱ्याच देवता दिसतील की ज्या ओबडधोबड होत्या एकेकाळच्या आणि मग त्यांचे जीर्णोद्धार केलेले आहेत आणि ते जीर्णोद्धार करताना त्या मंदिरातलं 'मंदिर'पण पूर्ण नाहीसे होऊन हरपलेले आहे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी की लोकपरंपरेतल्या काही गोष्टी आपल्या स्वाधीन करून त्याचे विपरीतीकरण हे अभिजन परंपरा बऱ्याच वेळेला कशी करते. 'अभिजात' असे ज्या वेळेला म्हणत असतो आपण त्या वेळेला ही अभिजात अशा प्रकारची संस्कृती नेमकं काय काय करते? आणि अभिजन परंपरा नेमकं काय काय करते? आपल्या लोकपरंपरेमध्ये देवतांचे निरनिराळे गजर असतात, म्हणजे जयजयकार असतात. उत्सवाच्या काळामध्ये वगैरे किंवा एरव्हीसुद्धा, भक्त इष्ट देवतेचा जयजयकार करतात. जेवायची पंगत बसली की कुणी कुठला तरी श्लोक म्हटला की मग शेवटी 'पार्वतीपते हर हर महादेव', विठ्ठलाचं भजन करायला लागलं की– 'विठ्ठल रखुमाई', रामाचं भजन करायला लागलं की– 'सीताकांतस्मरण जय जय राम' असे हे आपल्या परिचित गजर. आता या ठिकाणी जे सगळे गजर आहेत, याच्यामध्ये त्या देवतेच्या दांपत्याचा उच्चार आहे सगळीकडे. म्हणजे पार्वती आणि मग तिचा पती हर हर महादेव आहे, सीतेचा पती श्रीराम आहे, रूक्मिणीचा पती विठ्ठल आहे असे किती तरी आहेत. आता, असे गजर जर शोधून काढायचे म्हटलं तर खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. या सगळ्या देवतांच्यामध्ये नुसत्या एकेरी देवतांचा गजर कुठे आहे का? तो आता अलीकडे सुरू झालेला आहे एका देवाचा ते आपल्याला माहिती आहे.

आणि उत्तरेकडेसुद्धा तुलसीदासांनी 'तुलसी रामायण' लिहिलं त्या वेळेस तुलसीदासांच्या परंपरेमध्येसुद्धा 'सीयावर रामचंद्र की जय' अशा प्रकारचा तो गजर होता. आपल्याकडे 'सीताकांतस्मरण जय जय राम' असा आहे तो. या ठिकाणी आता त्या स्त्री देवतेचा उच्छेद करून टाकलेला आहे. असे आपल्याला अनेक ठिकाणी दिसते. या ठिकाणी स्त्रियांचा सन्मान होतो का, असा हा प्रश्न आहे. तेव्हा अभिजन परंपरा ही उदात्त परंपरा आहे, उच्च आहे, सुसंस्कृत आहे असे जे म्हटले जाते त्याला बाध देणाऱ्या अशा अनेक गोष्टी मला या संस्कृतीच्या प्रवासामध्ये, प्रत्यक्ष आचरणामध्ये अनेक पातळ्यांवर दिसतात. देवतांच्याही पातळ्यांवर दिसतात, आचरणामध्ये दिसतात. म्हणून लोकसंस्कृतीचा विचार करीत असताना आणि अभिजन संस्कृतीचाही विचार करत असताना तो एकेरी विचार करता येत नाही. त्याच्या पाठीमागे असलेली 'anthropology' - म्हणजे मानववंश- कसा चालत आलेला आहे- ते पहावं लागतं. जसं त्या सवतीच्याबाबतीतही सांगितले की, काळ बदलत आला, उत्पादनाची साधने बदलत आली तरीसुद्धा काही लोकांच्या श्रद्धा किंवा चालीरीती, रूढी या तशाच राहतात आणि काही अभिजनांच्या - म्हणजे सत्ताधारी व संपत्तीधारी लोकांच्या- हिताच्या सोयीने बदलल्याही जातात. समाजशास्त्राचा विचार त्या ठिकाणी करावा लागतो आणि या समाजशास्त्रात जाती-पाती, त्यांचे तिढे दिसतात.

अर्थशास्त्राचाही विचार करावा लागतो. लोकसंस्कृतीमध्ये विचार करत असताना आजपर्यंत अर्थशास्त्राचा विचार कुणीही केला नाही, माझ्या मते, तो अतिशय महत्त्वाचा विचार आहे. कारण आर्थिक स्तराशीच तुमचं सगळं जीवन बांधलेलं असते म्हणून अर्थोत्पादनाची साधने जशीजशी बदलतात तसतसं माणसाचं जीवन बदलतं हे मार्क्सने सांगितले आहे. हे अर्थशास्त्रातले तत्वं सगळं खरं आहे. परंतु नुसतं तेवढंच नाही. अर्थोत्पादनाची साधने, त्याच्यावरची मालकी यांच्या जोडीनेच मी त्याला आणखीन एक मुद्दा जोडते. त्याच्या विनिमयाचे अधिकार! विशेषत: स्त्रियांच्याबाबतीमध्ये- बायका अर्थोत्पादन जन्मभर करीत आलेल्या आहेत- म्हणजे अगदी रानात, शेतात काम करणाऱ्या, घरकाम करणारी बाईसुद्धा- अर्थोत्पादनच करत असते.

परवा एक गंमतशीर असा विनोद आला होता आणि डाव्या चळवळीतल्या बायकांनी तर हा मुद्दा मांडलेलाच आहे. ज्या घरगुती काम करतात- म्हणजे ज्याला आपण गृहिणी म्हणू, ज्या बाहेर जाऊन नोकरी-चाकरी काही करत नाहीत आणि मग पैसे मिळवत नाहीत म्हणून त्या स्वत:ला कमी मानतात; घरातले लोकही तिला

कमी दर्जाची मानतात. डाव्या चळवळीतल्या बायकांनी हे विचारायला सुरुवात केली, 'घरातला स्वयंपाक कोण करतं?' 'मीच करते!' स्वयंपाकाला जर तू बाई ठेवली तर किती पैसे घेतील? इतके-इतके घेतील. असं करत करत, कपडे कोण धुतं? मीच धुते! मग कपडे धुवायला बाई ठेवली तर इतके जातील, भांडी घासायला इतके जातील. मग हे सगळे पैसे जर तू वाचवत असशील किंवा बाहेर देत नसशील तर तू काय करते? 'To save money is to earn money', अर्थशास्त्रातले हे जे तत्त्व आहे की, 'पैसे वाचवणे म्हणजे पैसे मिळवणे' हे बायकांच्या लक्षातच आले नाही. तिच्या जगण्याच्या पाठीमागचे अर्थशास्त्र हे तिच्या लक्षातच आले नाही. म्हणून अर्थशास्त्राचा विचार हा सर्वांत महत्त्वाचा विचार आहे असे मला वाटते. म्हणून संस्कृतीचा अभ्यास करीत असताना- भले ती अभिजन संस्कृती असू देत की लोकसंस्कृती असू देत- तिचा सगळा प्रवास कसा कसा झालेला आहे; आदिम अवस्थेपासून ते आजपर्यंत समाजव्यवस्था कशी कशी बदलत आलेली आहे याचा समग्र अभ्यास गरजेचा ठरतो. म्हणजे समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि बाकीची शास्त्रे या सगळ्यांचा समन्वय केल्याशिवाय खऱ्या अर्थाने संस्कृतीचा अभ्यास करता येत नाही. विशिष्ट मंत्र-तंत्र आणि देवदेवता म्हणजे संस्कृती असत नाही. माणसाची जगण्याची जी रीत आहे आणि जगण्यासाठी आवश्यक असलेली जी सर्व साधने आहेत ती मिळून संस्कृती होते.

साहित्याची व्याख्या आपण पाहिली तर 'साहित्य' म्हणजे साधनं! तेव्हा लोकजीवनाच्या जडण-घडणीच्यासाठी असलेली जी सगळी साधने- भले ती आदिम अवस्थेतील असू देत, अनक्षर असू देत, ग्रामीण असू देत, शहरी असू देत, जुनी असू देत, नवीन असू देत- ही सगळी कायम आहेत आणि या सगळ्यांचा विचार केल्याशिवाय आपल्याला त्या संस्कृतीचा, त्या समाजाचा, त्या व्यक्तीचा विचार करता येत नाही. म्हणून हा सगळा विचार करत असताना अनेक संदर्भ लक्षात घ्यावे लागतात किंवा अनेक ज्ञानशाखांचा आपल्याला विचार करावा लागतो. म्हणजे त्याला अभिजात मराठीत आंतरज्ञानशाखीय- 'Interdisciplinary Study Approach' - म्हणतात. तेव्हा 'Interdisciplinary Study Approach' घेतल्याशिवाय कुठल्याही संस्कृतीचा पूर्णपणे विचार करता येत नाही- भले ती अभिजन संस्कृती असू देत किंवा लोकसंस्कृती असू देत. लोकसंस्कृतीबाबत विचार करताना समाजातील उच्चयावत जाती-जमातींचे उद्योग, व्यवसाय, रहाणीमान, त्यांचं खाणंपिणं, त्यांचे हवामान, इतिहास, भूगोल या सगळ्याचा विचार करावा

लागतो. माणसाचं जगणं हे काही तुमच्याजवळ असलेले केवळ पैसे ठरवत नाहीत. तुम्ही कुठल्या प्रदेशात राहता, तिथे उत्पादन काय होते, ती उत्पादने तुमचे राहणीमान ठरवत असतात. तुमचं खाणंपिणं ठरवत असतात, तुमचे कपडेलत्ते ठरवत असते. हा सगळा व्यापक विचार केल्याशिवाय ज्यांना आज आपण 'अभिजात' असे म्हणतो आहोत ते 'अभिजात' म्हणजे नेमकं काय आहे लोकसंस्कृतीचा हा प्रवास लक्षात घेतल्याशिवाय आपल्याला नेमकं कळेल असे मला वाटत नाही. म्हणून या सगळ्याचा विचार करणाऱ्या काही बाबी संस्थात्मक पातळीवर निर्माण व्हायला पाहिजेत.

त्याच्यासाठी काही सूचना कराव्याशा वाटतात. मराठी भाषेला जो अभिजात दर्जा मिळालेला आहे त्याच्यामुळे काही कोटी रुपये वगैरे मिळणार आहेत त्याच्यातून काय व्हायला पाहिजे? तर ज्या एका प्रदेशामध्ये ज्या निरनिराळ्या भाषा चाललेल्या आहेत– म्हणजे महाराष्ट्र घेतला तर नुसती मराठी तिथे नाही तर अनेक बोली तिथे आहेत– त्या अनेक बोलींचा अभ्यास करणारी अशी एक संस्था पाहिजे. इथे सीमाप्रदेश आहेत दोन भाषिक. त्या सीमाप्रदेशामध्ये दोन्ही भाषांच्या शाळा, महाविद्यालये आणि शिक्षणसंस्था पाहिजेत. त्या मुलांना कानडीमधून शिकवण्याची सुविधा असली पाहिजे. कन्नड-मराठी हा जो सीमाप्रदेश आहे त्या मराठी प्रदेशामध्ये कन्नड बोलणारे बरेच लोक असतील, तिकडच्या कन्नड भाषिकांमध्ये मराठी बोलणारी जी मुलं असतील त्या मराठी बोलणाऱ्या मुलांची मराठीमधून शिक्षणाची सोय व्हायला पाहिजे. म्हणून त्या सीमाप्रदेशांच्यामध्ये उभय भाषांची शिक्षण व्यवस्था शालेय स्तरावर, महाविद्यालयीन स्तरावर आणि संशोधनाच्या स्तरावरही व्हायला पाहिजे. त्यांच्या सोयी व्हायला पाहिजे आणि त्यांच्यासाठी शासनाने व्यवस्था करायला पाहिजे. म्हणजे हा सीमाप्रदेशातला लोकसांस्कृतिक अनुबंध भांडणापेक्षा, संघर्षापेक्षा संवादातून मिटायला पाहिजे.

अभ्यासातून संवाद शक्य होईल. हे होऊ शकते. असे झाले तर वर्षानुवर्षे भिजत पडलेले भाषावार सीमांचे प्रश्न सुटणे सुलभ होईल. राजस्थानमध्येच हा छोटासा प्रयोग झालेला आहे. म्हैसूर विद्यापीठाची 'मानस गंगोत्री' नावाची विद्यापीठाचीच एक शाखा आहे. तिथे लोकसांस्कृतिक विभाग हा स्वतंत्र आहे आणि त्या ठिकाणी 'लोकसंस्कृती' हा विषय घेऊन पदव्युत्तर शिक्षण घेता येते. म्हणजे एम.ए., पीएच.डी या पदवी लोकसांस्कृतिक विषयात घेता येतात. तिथे त्याला 'लोकवेद विभाग' असेच म्हटलेले आहे. तिथे म्युझिअम (वस्तुसंग्रहालय) आहे. दोन्ही संस्कृतींचे दर्शन घडवणारे असे अतिशय सुंदर अशा प्रकारचं म्युझिअम/वस्तुसंग्रहालय आहे.

केरळामध्ये त्रिवेंदमला अशा प्रकारचे एक वस्तुसंग्रहालय आहे तिकडचे सांस्कृतिक अनुबंध सांगणारे. अशा प्रकारची वस्तुसंग्रहालये आहेत. तेव्हा भाषावार प्रांतरचना जरी झालेली असली तरी सीमाप्रदेशामध्ये उभय भाषांमध्ये शाळांची सोय पाहिजे, महाविद्यालयांची सोय पाहिजे, संशोधनाची सोय पाहिजे आणि मुख्य म्हणजे वस्तुसंग्रहालयेही पाहिजे. तिसरी गोष्ट म्हणजे 'ग्रंथ प्रकाशन' हा मोठ्या प्रकारचा संशोधन प्रकल्प असावा त्या त्या उभय भाषिक प्रदेशामध्ये. कारण आपला देश हा विविधतेने नटलेला आहे. ही जी विविधता आहे ती विविधता अभ्यासपूर्ण रीतीने जास्त विकसित करण्यासाठी अशा प्रकारचे संशोधनात्मक ग्रंथ त्या त्या ठिकाणी जे निर्माण झालेले असतील ते ग्रंथ प्रकाशित व्हावेत. 'अभ्यासवृत्ती' ज्याला म्हणता येईल ती देता यावी. महाराष्ट्रामध्ये 'लोकसाहित्य समिती' होती. विस्मृतीमध्ये गडप झालेले चांगले ग्रंथ ती प्रकाशित करत असे. त्यांनी प्रकाशित केलेले ग्रंथ आहेत. पुढे ते सगळं बंद झाले आणि आता ते ग्रंथच मिळेनासे झालेले आहेत. आम्ही साहित्य संस्कृती मंडळाकडे मागणी केली आणि त्यांनी सांगितले असे काही ग्रंथ असतील तर आम्हाला सांगा, आम्ही प्रकाशित करू. ते साहित्य संस्कृती मंडळ चार ग्रंथ प्रकाशित करेल कदाचित. परंतु कायमसाठी ती 'लोकसाहित्य संशोधन समिती' होती तशा प्रकारची एखादी संस्था या प्रत्येक प्रदेशामध्ये निर्माण व्हायला पाहिजे. म्हणजे विस्मृत झालेले जुने दर्जेदार ग्रंथ पुन्हा उपलब्ध होतील.

सगळ्यात महत्त्वाची गोष्टं म्हणजे विद्यापीठांच्यावर दिवसेंदिवस शासकीय बंधने जास्त येत आहेत. कुलगुरूंच्या नेमणुका, कुलगुरूंनी नेमकं काय करायचे याचे आदेश शासनस्तरावरून येत आहेत. मी ज्या वेळेला विद्यापीठाशी संबंधित अशा व्यक्तींशी बोलते त्या वेळेस त्यांचे म्हणणे असे आहे की, काय करावे आणि काय नाही याची बंधने विद्यापीठांच्यावर घालू नयेत. एखादा शासकीय आदेश पटकन येतो आणि 'अमुक दिवशी अमुक दिवस साजरा करा' असे फर्मावतो. हे शासनाने सांगण्याची गरज नाही, त्या विद्यापीठांना ठरवू देत. ती विद्यापीठे ज्या प्रदेशात आहेत त्या विद्यापीठांचे अग्रक्रम, महत्त्व कशाला द्यायचे आणि कशाला नाही, ते त्या विद्यापीठांना, कुलगुरूंना, तिथल्या विभागप्रमुखांना ठरवू देत. त्यांच्यावर शासकीय बंधने, विशेषत: मध्यवर्ती शासकीय बंधने नसावीत! किमान बंधने असावीत. अशा प्रकारची मागणी विद्यापीठांच्याकडून होते आहे. आणि म्हणून ज्ञानक्षेत्रातले निरनिराळे प्रयोग निरनिराळ्या ठिकाणी व्हावेत आणि ज्ञान जास्त मोकळे व्हावे असे वाटत असेल तर शासकीय बंधने ही किमान असावीत. आंतरज्ञानशाखीय संशोधनासाठी

प्रत्येक विद्यापीठामध्ये एक विभाग असावा. किंबहुना ज्याला आपण 'मानव्यशाखा' म्हणतो त्या मानव्यशाखांचे विभाग दिवसेंदिवस संकुचित होत आहेत सगळ्यांच विद्यापीठांत. मानवी जीवन हे जास्त निरामय रहायचे असेल तर मानव्यशाखांच्यामधले अभ्यास हे जास्त बारकाईने आणि जास्त संवेदनशीलतेने व्हायला पाहिजेत. ते विभाग बंद न होता ते जास्त विकसित कसे होतील याच्यासाठी त्यांना मोकळीक देणे हे महत्त्वाचे आहे असे वाटते. तेव्हा अशा काही महत्त्वाच्या सूचना या संमेलनाच्या निमित्ताने, अनेकांशी पूर्व संवाद साधल्यानंतर एक निवृत्त शिक्षक म्हणून, एक समाज घटक म्हणून, एक मराठी भाषक म्हणून मला आवर्जून कराव्याशा वाटतात.

या निमित्ताने मला बऱ्याच गोष्टी मांडण्याची इथे संधी मिळाली, त्यांची अंमलबजावणी योग्य त्या पातळीवर त्यांची दखल घेऊन होईल अशी अपेक्षा करते, सगळ्यांना धन्यवाद देते आणि थांबते.

*(नवी दिल्ली येथे २१ फेब्रुवारी २०२५ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या '९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'च्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षीय भाषणाचे संपादित, संक्षिप्त रूप.)*

**या अंकातील लेखांचे संदर्भ :**


https://onu.delegfrance.org/ai-action-summit-10-and-11-february-2025
https://www.elysee.fr/en/sommet-pour-l-action-sur-l-ia
https://corp.oup.com/news/brain-rot-named-oxford-word-of-the-year-2024/
https://www.merriam-webster.com/slang/brain-rot
https://www.timeshighereducation.com/student/best-universities/digital-leaders-top-universities-digital-education
https://collegevidya.com/blog/what-is-digital-university/
https://nheri.org/research-facts-on-homeschooling/
https://nomadcapitalist.com/global-citizen/best-countries-for-homeschooling/

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*

*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,*
   (The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi)
   by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition,
   (in English and Marathi),
   by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,*
   (To Searches is Education), (in Marathi),
   by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,*
   by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh, Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron*
   by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-.
   Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,*
   Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath, Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अ‍ॅन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

**RATAN TATA : A Life, Thomas Mathew, HarperCollins Publishers India, Gurugram, Haryana, 2024, PP. XV + 668, Price - Rs. 1499/- .**

दिगंत लोकमान्यता प्राप्त केलेल्या व्यक्तिमत्वांच्या कर्तबगारीचे अनेकविध पैलू, प्रसंगोपात्त प्रसिद्ध झालेल्या लेखांच्या माध्यमातून जाणून घेणे हे रोमांचक असतेच. परंतु, अशा लोकोत्तरांची साक्षेपाने सिद्ध केलेली जीवनचरित्रे वाचणे हा अतिशय वेगळा आणि विलक्षण समृद्ध बनविणारा आनंदानुभव ठरतो. रतन टाटा यांचे समग्र जीवनदर्शन घडविणारा थॉमस मॅथ्यूलिखित प्रस्तुत ग्रंथ चरित्रग्रंथांच्या त्याच कोटीत जमा होतो. आपले खासगीपण रतन टाटा आयुष्यभर कसोशीने जपत राहिले. त्यांमुळे, रतन टाटा यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल नितांत आदर असणाऱ्यांना त्यांच्या जडणघडणीसंदर्भात, देश-विदेशातील बदललेल्या व्यावसायिक माहौलाशी सुसंगत असे रंगरूप टाटा उद्योगसमूहाला प्रदान करत असताना त्यांना कराव्या लागलेल्या संघर्षाबाबत, नफ्यापेक्षाही उद्योगधंद्यांच्या सामाजिक प्रस्तुततेला व योगदानाला अधिक महत्त्व देणाऱ्या त्यांच्या आगळ्या व्यावसायिक दृष्टीबाबत, आपली उत्पादने उत्कृष्टच असली पाहिजेत, असा ध्यास मनीमानसी बाळगत असतानाच त्या उत्पादनांना रंगरूप बहाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणाबाबत रतन टाटा यांच्या अंत:करणात वसणाऱ्या कर्त्या सजगतेबाबत पुरेशी व साधार माहिती असतेच असे नाही. थॉमस मॅथ्यू यांनी सिद्ध केलेला हा दस्तऐवज, म्हणूनच, वैशिष्ट्यपूर्ण शाबीत होतो. भारतीय प्रशासकीय सेवेतील सनदी नोकरशहा या नात्याने केंद्र सरकारातील संरक्षण मंत्रालयात तसेच अर्थविभागात प्रदीर्घ काळ कार्यरत राहिलेल्या मॅथ्यू यांचा रतन टाटा यांच्याशी जवळपास तीन दशकांचा अनुबंध राहिला. त्या संपूर्ण काळात रतन टाटा यांच्याशी वेळोवेळा घडलेला प्रत्यक्ष संवाद, रतन टाटा यांच्याबरोबर व्यावसायिक कारकीर्द व्यतीत केलेल्या टाटा उद्योगसमूहातील उच्चपदस्थांच्या मुलाखती, रतन टाटा यांचे मित्र व कुटुंबातील नातेवाईक यांच्याशी केलेली बातचीत यांद्वारे रतन टाटा यांच्या व्यक्तिमत्वासंदर्भात उत्क्रांत झालेली अंतर्दृष्टी व त्याच्या जोडीनेच विविध साधनस्त्रोतांद्वारे मेहेनतीने जमा केलेले अनेकानेक अपूर्व असे तपशील अशा औरसचौरस सामग्रीमुळे मॅथ्यू यांनी चितारलेले रतन टाटा यांचे हे जीवनचरित्र जितके रोचक तितकेच अभ्यसनीय बनते. रतन टाटा यांच्या एकंदरच कार्यसंस्कृतीद्वारे प्रगट होणारे त्यांचे निखळ माणूसपण नानाविध प्रसंगांद्वारे प्रकाशमान करणे, हे या ग्रंथांचे मुख्य व अनोखे वैशिष्ट्य ठरते. ■■

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**